म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

सन

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

म. ग्रं. सं. ठाणे
[वि]षय
[क्र]. नं.
१८६

आणि आपल्या मित्रांस दाखव.

# [भ्र]मनिरसन.

## भाग २ रा.

अथवा

श्रीमंत महाराज शिवाजीराव होळकर सरकार यांच्याविरुद्ध आलेल्या लेखांविषयीं

## दोन शब्द.

प्रसिद्ध करणार

शिवराम रामचंद्र गुप्ते.

बडोदें,

"बडोदा वत्सल" छापखान्यांत छापिलें.

१८९६.

# प्रस्तावना.

भ्रमनिरसनाच्या दुसऱ्या भागांत, वळवंतराव शिंत्रे वगैरे ज्या प्रभृतींस भाटचे यानीं अगदीं राजभक्तीचे पुतळे बनवून सोडिले आहेत त्यांचें खरें रूप लोकांपुढें ठेवावयाचें होतें. परंतु तितक्यांत भाटचे यांचें इंदूर संस्थान भाग २ या नांवाचें पुस्तक पाहण्यांत आल्यानें, प्रथम त्याचें निरसन करण्याचें योजिलें आहे. भाटचे यांच्या मतें विद्वान्, राजभक्त व गरीब अशा ठरलेल्या शिवाप्रसाद, सखाराम शिरसाळकर, रामराव वगैरे जे लोक इंदूर छावणींत इंग्रजांच्या हद्दींत दडून बसले होते, त्यांच्या कृतींची खरी हकीकत समजून त्यांस छावणींतून इंग्रज सरकारांच्या अधिकाऱ्यांनीं काढून दिलें आहे, ही बातमी सर्वांना कळून चुकली आहे, त्या अर्थीं भाटच्यांचे राजभक्त विद्वान् व मोठे लोक कोणच्या प्रकारचे असतील याची कल्पना कोणींही करूं शकतील. ज्यांना इंग्रज अधिकारीसुद्धां शोधून काढून हंकलून देतील त्यांची अंतरंगें किती दुष्ट असतील बरें ! ही अशीच मंडळी स्वतःचें पोट जाळण्यासाठीं खोटच्या कंड्या पिकवितात; असो. यापेक्षां जास्त महत्वाचा मुद्दा हा आहे कीं, भाटच्यांचे हातपाय आतां अगदीं गळाले आणि खोटें लिहिण्यांससुद्धां त्यांना तोंड राहिलें नाहीं. आणि त्यांनीं स्वतःचें तोंड लज्जेमुळें आतां खालीं घातलें आहे. भ्रमनिरसनाच्या पहिल्या भागास भाटच्यांनीं ९० पानांचें चोपडें ह्मटलें, परंतु त्यांना त्यांतील अमुक एक मुद्दा खोटा ठरवितां आला नाहीं.

भ्रमनिरसनाचा पहिला भाग लोकांस फुकट वांटला गेला असून त्याबद्दल लोकांस कांहीं पैसे पडले नाहींत अथवा पडणार नाहींत असें समजण्यास त्या पुस्तकांत पूर्ण आधार असतां, भाट्ये यांनीं आमचें पुस्तक " वांचकांचे पैसे फुकट जाऊं नये " अशा मुद्यावर, स्वतःच्या पत्रांतून साग्र उतरून घेऊन स्वतःच्या पोटाचा खळगा भरला आहे. भाट्यांची कृती व त्यांची समजशक्ती यांचा विचार करून त्यांच्या संबंधानें आह्मी जी भाषा वापरतों तिचा विचार केला ह्मणजे आह्मी कमी दोषास पात्र होणार आहों. भाटचे यानीं स्वतःच्या इंदूर संस्थानच्या २ भागांत काय लिहिलें आहे तें या पुस्तकाचें मनन झालें ह्मणजे कळून येईल.

शिवराम रामचंद्र गुप्ते

# भ्रमनिरसन.

## भाग २ रा.

### इंदूर संस्थान भाग २ ची प्रस्तावना व त्यांत असलेल्या इतर वर्तमानपत्रांनीं इंदूर संस्थान भाग १ यावर दिलेल्या अभिप्रायांची परिस्फुटता.

भ्रमनिरसनाचा १ ला भाग प्रसिद्ध झाला आहे आणि सत्यार्थ शोधणाऱ्या पुरुषांनीं भाटचे यांचा इंदूर संस्थान भाग १ ला आणि भ्रमनिरसन भाग १ ला ह्या दोहोंचें अवलोकन करून ऐतिहासिकदृष्ट्या आपल्या इष्टमित्रांस खऱ्या माहितीचा लाभ करून दिला असेल. भ्रमनिरसनाचा १ ला भाग प्रसिद्धीस आणल्यामुळें भाटचे यांचें नस्तें महात्म्य आह्मीं स्थापीत केलें आहे असें कित्येकांचें ह्मणणें आहे. परंतु आमच्या मतें भाट्यांचा इंदूर संस्थान भाग १ ला अथवा त्यांचें 'विक्षिप्त'पत्र ज्यांच्या वाचण्यांत येईल, त्यांस त्यांच्या कृतीचें खरें स्वरूप दाखविणें ह्मणजे दुष्टपणाची विशालता निदर्शनास आणून इतरांस सावध करणें होय. त्यासाठीं आणि "भाट्यांच्या लेखाविरुद्ध कोणी कांहीं ह्मणत नाहीं ह्मणून ते खरे असतील असें वाटतें." या तत्त्वावर जीं कांहीं वर्तमानपत्रें भाटचे यांच्या रडगाण्याचा झील ओढीत होतीं, त्यांना भाटचे यांच्या लेखांचें खंडण करून राज्यद्रोहासारख्या महत्पातकाचें परंपरेनें वांटेकरी होतांना वांचविण्याचा आमचा प्रयत्न होता. आणि केवळ एकपक्ष कळून ज्या वर्तमानपत्रांनीं इंदूर संस्थान भाग १ ला ह्या पुस्तकावर भाटचे यांस स्वतःच्या ग्रंथाच्या सर्व मान्यतेबद्दल गर्व वाहण्यास लाविलें होतें, त्यांस त्यांची चुकी दाखविण्याचा यत्न होता; आणि भ्रमनिरसन भाग १ ला पाहून मौन्यरूपें अथवा प्रसिद्धपणें लेख लिहून स्वतःची चुकी कबूल करून तीं पत्रें पापापासून शुद्ध झालीं आहेत. ज्या वर्तमानपत्रांनीं भाट्यांच्या पुस्तकासंबंधानें अभिप्राय दिले आहेत त्या लेखांवर आह्मी या खालीं टिका करतों.

---

### श्री 'सयाजी विजय', बडोदें, ता. २६–१०–९९.

यांत इंदूर संस्थान भाग १ ला यावर अभिप्राय दिला आहे त्यावर आह्मी ह्मणतों तें:—श्री 'सयाजी विजय' वर्तमानपत्रास भ्रमनिरसन भाग १ ला याची एक प्रत पाठविली गेली. परंतु तदनंतर त्यांनीं भ्रमनिरसनांतील अमुक गोष्ट

खोटी, असें बिलकूल लिहिलें नाहीं. त्याचप्रमाणें इंदूर संस्थान भाग १ ला याचें खंडण भ्रमनिरसन भाग १ ला या पुस्तकानें झालें नाहीं असेंही नाहीं. यावरून भ्रमनिरसन भाग १ ला पाहून इंदूर संस्थान भाग १ याजवर अभिप्राय देण्यांत त्यानीं जो उतावळेपणा केला त्याविषयीं त्यांना ख वाटली असावी असें चांगलें अनुमान होऊं शकतें. मौन्याला अर्धी कबुली समजतात; आणि श्री 'सयाजी विजय' वर्तमानपत्रकारांस दोन्हीं बाजू कळल्या असून जेव्हां ते गप बसले तेव्हां त्यांचें मौन्य त्यांच्या, इंदूर संस्थान भाग १ ला यावर, दिलेल्या अभिप्रायाबद्दलचा पश्चात्ताप व्यक्त करितें. ह्या वर्तमानपत्रकारांनीं भाव्यांच्या पुस्तकावर अभिप्राय देतांना एक मोठी चूक नव्हे तर स्वतःच्या कर्तृत्वांत खिळा ठोकून तें छिद्र जगापुढें मांडलें आहे. त्यानीं दिलेल्या अभिप्रायांत ते ह्मणतात कीं " श्रीमंत शिवाजीराव महाराजांनीं ब्रिटिश सरकारांत नांवाजलेल्या अशा माणसांच्या हातांत कारभार देऊन स्थीरस्थावर करण्याचा प्रयत्न करावा." भ्रमनिरसनच्या १ ल्या भागांत राजकीय प्रकरणाचें पूर्णज्ञान असल्यावांचून वर्तमानपत्रकारांनीं राज्यकीर्द आणि राज्यक्रांती या विषयांत आपलें मत देऊन स्वतःच्या ज्ञानाची क्रांती करून घेऊं नये, असें ठरविलें आहे तें येथें चांगलें जुळतें. पहा ! हें वर्तमानपत्र बडोदें येथें निघतें. बडोदें स्वराज्य आहे व तेथें ब्रिटिश सरकारांतून आणलेल्या अंमलदारांच्या हातीं कामें दिलीं गेलीं आहेत; तेथील महाराज हुशार आहेत; इतकेंच नव्हे तर त्यांनीं पुष्कळ प्रवास करून मुत्सद्दीपणा अवगत करून घेतला आहे. असें असत ब्रिटिश सरकारांतलि त्या नांवाजलेल्या अंमलदारांपैकीं कांहींनीं त्या महाराजांच्या स्वास्थ्यास व राज्यव्यवस्थेस किती धक्का पोंचाविला आहे हें वर्तमानपत्रांतून लोकांनां चांगलें कळतें. खुद्द श्री 'सयाजी विजय' पत्र बडोदें येथें असलेल्या ब्रिटिश सरकारांत नांवाजलेल्या अशा माणसांच्या कृतीविषयीं खेद प्रदर्शित करीतच आहे. ह्या गोष्टी वर्तमानपत्र कसें विसरतें ? शिवाय मोठा मुद्दा हा कीं, ब्रिटिश सरकारांत नांवाजलेल्या मनुष्याचे हातांत राज्याचा कारभार देण्यापेक्षां, आपल्याच राज्यांत नांवाजलेल्या कर्त्या पुरुषाचे हातीं तो देण्यांत, देशस्थितीरीतीचें त्याला पूर्णज्ञान असल्यानें, प्रजेचें हीत व राज्याचा भारदस्तपणा दोन्हीं उत्तम सांभाळतां येतें. हें 'सयाजी विजय' वर्तमानपत्रांनीं स्वराज्याची कळकळ बाळगण्यांत आतां तरी विसरूं नये. ब्रिटिश राज्यांत नांवाजलेल्या मनुष्या वांचून संस्थानिकांचा राज्यकारभार इतरांस करतां येत नाहीं, असें 'सयाजी विजया'चें ह्मणणें ग्राह्य केलें तर आमच्या देशांत इंग्लिश येण्यापूर्वीं मौर्ख्यच वास करीत होतें व विशेषतः संस्थानिकांच्या राज्यांत राज्यकारभारास

णी लायक राहत नाहीं असें ठरेल; आणि या विधानामुळें आमच्या प्राचीन आणि इतिहासास काळोखी लागूं पाहील. ह्या सर्व कारणावरून 'सयाजी विजय' कारांचें मत राजकीय विषयांत फार उतावळेपणाचें तरी खास आहे.

'व्यापारी', पुणें, तारीख ३–११–९९.

या पत्रकारांनीं इंदूर संस्थान भाग १ ला यावर अभिप्राय देण्यांत अशी कल्पना केली आहे कीं, भाटचे यांच्या पुस्तकांतील लेख बरेच दिवस प्रसिद्ध होत असून त्या विरुद्ध कांहीं एक बाजू पुढें आली नाहीं, तेव्हां हे लेख खोटे नसावेत. व दुसरी बाजू खुद्द महाराजांकडून पुढें यावयाला पाहिजे होती असा यांचा मानस दिसतो. भाटचे यांनीं छापलेली हकीकत इतक्याच कारणानें खरी असावी अशी यांची कल्पना आहे. त्यांनासुद्धां भ्रमनिरसन भाग १ ला ह्या पुस्तकाची एक प्रत पाठवून बरेच महिने झाले, तेव्हां त्यांची कल्पना खोटी ठरली आहे. इंदूरसारख्या सन्मानीय राज्याविषयीं भाटचे यांच्या सारखे नवख्या मनुष्यांनीं वर्तमानपत्राच्या नांवें वाटेल तशी खोटी हकीकत लिहिली, त्यांचें पुस्तक करून तें वर्तमानपत्रकारांस पाठविलें व त्या पुस्तकावर निरनिराळ्या वर्तमानपत्रकारांस अभिप्राय देण्याची वेळ आली किंवा प्रवृत्ति झाली, तरीपण एकही वर्तमानपत्रकार, देशसेवा, राष्ट्रहित, लोककल्याण, व समाज सुधारणा अशा मोठमोठ्या जबाबदारीच्या प्रकर्णांत देह झिजविण्याचा जो आव घालतात, त्या आवाच्या प्रमाणानें एकदा तरी इंदुरास जाऊन भाटचे यांच्या लेखांस किती प्रमाण आहे, हें पाहून आले नाहींत व आपआपल्या ठिकाणीं कल्पना करून भाटच्यांची ढोलकी वाजवितात हें खेदकारक आहे. भाटचे यांच्या इंदूर प्रकरणाच्या पुस्तकावर भाटच्यांस उतारे घेण्या इतके अभिप्राय देणाऱ्या वर्तमानपत्रकारांत, तन, मन आणि धन खर्चून देशसेवेसाठीं तत्पर असण्याची प्रतिष्ठा मिरविणारे अथवा राष्ट्राचे हितचिंतक ह्मणून बोलून दाखविणारे पुष्कळ पत्रकार आहेत; परंतु त्यांपैकीं इंदूर राज्यांत जाऊन सत्यशोधनाचा प्रयत्न केला आहे, असें एकही नांव पुढें येत नाहीं. मग अशीं वर्तमानपत्रें चालविणें पोट भरण्याच्या धंद्या पलिकडे विशेष मातब्बरीचें काय ह्मणून समजलें जावें ? 'व्यापारी' वर्तमानपत्रकारांनीं खरें शोधलें नाहीं आणि खुद्द महाराजांकडून दुसरी बाजू पुढें येईल ह्मणून वाट पहात बसले आणि ती बाजू त्यानीं पुढें आणली नाहीं ह्मणून कल्पना सृष्टींत भ्रमण करूं लागले, हें अयोग्य केलें नाहीं असें कोण ह्मणेल ?

'सत्यशोधक', रत्नागिरी, तारीख ३–११–९९.

ह्यांनीं दिलेल्या अभिप्रायांतसुद्धां त्यांची इच्छा भाट्यांच्या विरुद्ध बाजूचें ज्ञान

करून घेण्याची दिसते. त्यानीं इंदूर संस्थान भाग १ ला ह्या पुस्तकाच्या सत्यतेबद्दल मत मुळींच दिलें नाहीं.

'सुबोधसिंधु', खांडवा, तारीख ६–११–९५.

या वर्तमानपत्रांनीं मात्र माट्यांची पाठ यथेच्छ थोपटली आहे. इंदूर प्रकरणांत 'विक्षिप्त'कार व 'सुबोधसिंधु'कार उभयतां आवळे जावळे भाऊ आणि तेही एकच नाडीचे व गणाचे आहेत. खांडवा, इंदूर पासून अगदीं जवळ आहे व 'सुबोधसिंधुकार' स्वतःच्या वर्तमानपत्राच्या नांवाची जी थोरवी मिरवितात, त्या मानानें त्यांनीं इंदुरास जाऊन तेथील राज्यकारभाराचा अनुभव घेऊन नंतर माटचे यांस नटाच्या बांसावर चढविलें असतें तर योग्य होतें. देशाची सेवा करणारे हे पत्रकार अशा महत्वाचे कामांत, रेल्वेचे चौदा आणे खर्चून डोळ्यांनीं पाहून मग स्थितीचें खरें स्वरूप लोकांपुढें ठेवण्याचें मुद्दाम वर्जण्यामुळें, खरें कळून घेण्याची स्वतःमध्यें बुद्धि नाहीं, असें स्थापीत करण्यापलीकडे, स्वतःची कुत्सित बुद्धि व्यक्त करितात.

'चिकित्सक', बेळगांव, तारीख ६–११–९५.

माटचे यांचें पुस्तक बरें आहे, अशा विषयीं यांच्याही अभिप्रायांत स्वच्छ उल्लेख नाहीं. तथापि ते माटच्यांच्या व त्यांच्या इंदुराहून तथ्य बातमी देणारांच्या धैर्याची स्तुती करितात. ही स्तुती करण्यांत, माटचे यांच्या पुस्तकांतील तथ्य बातमी कोठली, हें त्यानीं ठरवून टाकलें असतें तर योग्य होतें. लांबलचक अभिप्रायानें वर्तमानपत्राची जागा अडविण्यापेक्षां मुद्देसुद रीतीनें असें ठरविणें वर्तमानपत्राचें कर्तव्य होतें. या पत्रकारांनीं ह्मटलें आहे कीं " देशसेवेस्तव 'विक्षिप्तकारानीं' हिंमत केली त्यास हातभार लावणें आमचे कर्तव्य. " परंतु देशसेवेची व्याख्या 'चिकित्सक' पत्रकारांस कळती तर माटचे यांच्या दुष्ट कृतीला हातभार लावण्याची त्यानीं हिंमत केली नसती.

'शुद्ध वऱ्हाडी', तारीख ७–११–९५.

'मधुवृत्त', तारीख ९–११–९५.

ह्या दोन्हीं पत्रांच्या अभिप्रायांत माटच्यांच्या पुस्तकाच्या सत्यतेबद्दल कोठेंही उल्लेख नाहीं.

'अरुणोदय', ठाणें, तारीख १०–११–९५.

या पत्रकारांनीं 'विक्षिप्त'पत्राची योग्यता किती आहे, हें चांगलेंच दाखविलें आहे. 'विक्षिप्त'पत्र प्रसिद्ध नाहीं व महत्वाचे नाहीं, असें त्यांच्या अभिप्रायांतील "मुंबईस 'विक्षिप्त' नांवाचें एक पत्र निघत असतें " या वाक्यानें दिसून येत आहे. त्याचप्रमाणें पुस्तकांत माटचे यांनीं पुस्तक ह्मणून कांहीं नवीन लिहिलें नाहीं, तर 'विक्षिप्त' पत्रांत येणारे लेख

प्रसिद्ध केले आहेत असेंही त्यानीं ह्मटलें आहे. व भाटचे यांच्या बिभत्स भाषेबद्दल त्यांना दोष दिला आहे. इतकेंच नव्हे तर भाटचे यांस त्यांच्या अशा कृतीबद्दल शिक्षा झाली पाहिजे, ती होण्यास दुसरी बाजू बाहेर येत नाहीं ह्मणून त्यांस अधिकच वाईट वाटलें. 'अरुणोदय'कारांस भ्रमनिरसनाची एक प्रत पाठविली गेली आहे. आणि त्याविरुद्ध त्यांचें कांहीं ह्मणणें नाहीं ह्मणून भाटचे यांच्या लबाडीविषयीं त्यांची खात्री झाली आहे असें मानण्यास आधार आहे.

'न्यायसुधा', तारीख ११-११-९५.

या पत्राच्या अभिप्रायांत भाटचे यांच्या लेखांच्या सत्यतेविषयीं उल्लेख नाहीं. मात्र भाट्यांच्या लेखाविरुद्ध कोणताही लेख प्रसिद्ध झाला नसल्यामुळें त्याच्या बुडाशीं कांहीं तरी सत्य असलें पाहिजे असें या पत्रकारांना वाटतें. परंतु भ्रमनिरसनानें त्यांचा हा भ्रम दूर केला आहे असें ह्मणतां येईल. या वर्तमानपत्रकारांनीं भाट्यांच्या पुस्तकांतील भाषेवरून त्यांची सभ्यता कोठल्या प्रकारची आहे ती कळविली आहे. त्याबद्दल भाट्ये यांस लज्जा वाटली असेल तर या वर्तमानपत्रकारांचा त्यांच्यावर मोठा उपकार ह्मणावयाचा.

'विद्यार्थिमित्र', पुस्तक १ अंक ९.
'उद्योगवृद्धी', तारीख २१-११-९५.
'शिक्षक', तारीख ११-१२-९५.

वरील तिन्हीं पत्रांतील अभिप्रायांत, वर्तमानपत्रकारांची इच्छा इंदुरची खरी स्थिति काय आहे ती समजण्याची दिसते; आणि भ्रमनिरसन पाहून ही त्यांची इच्छा पूर्ण झाली नाहीं असें मानतां येणार नाहीं.

---

भाटचे यानीं स्वतःचें इंदूर संस्थान भाग १ ला हें पुस्तक लोकमान्य झालें आहे असें दाखविण्यास इंदूर संस्थानच्या दुसऱ्या भागांत प्रस्तावनेच्या मागून ८ पृष्ठें वरील अभिप्रायानींच भरलीं आहेत. परंतु त्यांना अनुकूल असा 'सुबोधसिंधु' पत्राशिवाय एकही अभिप्राय त्यांत नाहीं. शिवाय त्या तेरा अभिप्रायांत बहुसमाजास मानवलेलीं व राजकीय विषयावर लिहितां येतें अशी काय तीं दोनच वर्तमानपत्रें 'अरुणोदय', ठाणें व 'न्यायसुधा', नागपूर हीं होत. त्यांतून आणि 'केसरी', 'सुधारक', 'नेटीव ओपिनियन', 'ज्ञानप्रकाश', 'मुंबईवैभव', 'इंदुप्रकाश', 'सुबोधपत्रिका' व अशाच भारदस्त व लोकमान्य वर्तमानपत्रांतून, भाट्ये यांच्या पुस्तकावर थोडासा तरी अनुकूल अभिप्राय आला नाहीं, या वरून त्यांचें पुस्तक लोकांनां किती मानवलें असेल याचीही कल्पना वाचकांनीं करावी. अभिप्रायांची संख्या जास्त वाढविण्यासाठीं, भाटचे

यानीं स्वतःच्या छापखान्यांत इंदूर संस्थान ह्मणून जें पुस्तक छापिलें तें छापण्याच्या अगोदर कांहीं वर्तमानपत्रें स्वतःच काढलीं असतीं तर गुळाचा गणपती व गुळाचा नैवेद्य या न्यायाप्रमाणें अभिप्रायांची संख्या आणखी जास्त दाखवितां आली असती. परंतु त्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, " जें सारें नुसतें चकाकित दिसें तें सर्व सोनें नसे. " असे अभिप्राय जमविण्यापेक्षां लोकमान्य झालेल्या दोनच वर्तमानपत्रांचे अभिप्राय घेतले असते तर पुष्कळ चांगलें होतें. हजारों स्त्रिया एका खोलींत कोंडल्या ह्मणजे जसा पुरुष बनत नसतो त्याच प्रमाणें भाटचे यांनीं जमविलेल्या अभिप्रायांनीं त्यांच्या लेखांचें चऱ्हाट, पुस्तक ठरत नाहीं. येथ पावेतों इंदूर संस्थानच्या दुसऱ्या भागाच्या प्रस्तावनेसंबंधानें टिका झाली. आतां भाटचे यांच्या लबाडीचें दिग्दर्शन करण्यासाठीं त्यांच्या इंदूर संस्थान भाग २ रा यांतील प्रत्येक पृष्ठांत जें लिहिलें आहे त्यांतून एकेक मुद्दा घेऊन त्याची परिस्फुटता करतों ह्मणजे वाचकांस दोन्हीं पक्षांची साम्यता करण्यास बरें पडेल.

इंदूर संस्थान भाग २ रा. पृष्ठ १ ते २ यांत श्री. शिवाजीराव होळकर शुक्रवार पासून वाड्याबाहेर पडूं लागले आणि छावणींत डाक्टर कॅलिकॉटच्या बंगल्यावर एक घटकाभर बसले होते. एक लाख पांच हजारांच्या नोटा प्रत्येकीं एक-हजार प्रमाणें रेसिडेन्ट साहेबांना मिळण्याकरितां त्यांच्याकडेस पाठवून दिल्या व त्याबरोबर एक चिठ्ठी पाठविली होती, ती परत मिळण्याविषयीं महाराज काळजींत आहेत. हा मजकूर आहे. भाटचे यानीं या दोन्ही गोष्टी " असें कळतें " व " ह्मणतात " या आधारावर खरडल्या आहेत. यांचें स्वतःचें खात्रींचें ह्मणून वरील बातमींत कांहीं नाहीं. आतां त्यांच्या या बातम्या खऱ्या आहेत असें ग्रहीत करून विचार करूं.

महाराज छावणींत गेले व डा. कॅलिकॉटच्या येथें गेले. यांत बरें काय आणि वाईट काय? आणि त्यावर दोन पानें भरण्याची जरूरी ती काय? महाराजांच्या फिरण्या बसण्यावरच ल्याहावयाचें असेल तर प्रातःकाळीं उठून तोंड धुतलें, फिरावयास गेले, जेवले, पाणी प्याले, कपडे बदलले, स्नान केलें अशा व्यवहाराच्या हजारों गोष्टी ल्याहाव्या व शेवटीं "ह्मणतात" ह्मणून ल्याहावें! वाहवा भाट्ये! पुस्तक **फार मोठें** करण्याचें कसब आपणांस खूब साधलें आहे!! भाट्ये! तुह्मीं शिवाजीराव महाराजांची वाटेल तशी निंदा करतां तरी पण त्यांची निंदा तुमचें व तुमच्या कुटुंबाचें पोट भरण्यास कारण होत आहे. परंतु अशा रीतीनें राजद्रोही होऊन लोकांकडून पुस्तकांच्या नांवें पैसे उपटून पोट जाळण्यांत शेवटीं तुमच्या शरिराच्या प्रत्येक छिद्रांत **किडे पडतील**

हें खूप समजा. राजद्रोही लोकांचा अंत हा असाच!! महाराजांनीं नोटा पाठविल्या असल्यास त्या कांहीं चांगल्या कामासाठीं असल्या पाहिजेत. खुद्द-भाटचे यांस त्या अमूक कामाकरितां पाठविल्या असें आजपावेतों ह्मणतां येत नाहीं. शिवाय या गोष्टींत बरें आणि वाईट काय आणि तें सामाजिक कसें होतें तें मुळींच निघत नाहीं. ज्याच्या निराकरणार्थ आपणांस प्रत्यक्ष पुरावा मिळत नाहीं त्याचा निर्णय करण्यास स्थितीपरत्वें शोभणारा साधार अनुमानीक पुरावा घेतला पाहिजे. महाराजांनीं पाठविल्या असल्यास, त्या नोटा कोठल्या तरी सार्वजनिक, धार्मिक अथवा एखाद्या पाव्हण्याच्या स्मारकाकरितां पाठविल्या असाव्यात. व्हाइसरॉय साहेब इंदुरास येणार होते परंतु त्यांना कामाच्या अडचणीमुळें इंदुरास येतां आलें नाहीं ह्मणून त्यांच्या पाहुणचारासाठीं खर्च करण्याची रकम निराळी काढली गेली असेल आणि जी ज्या कामाप्रित्यर्थ अर्पण केली ती दुसऱ्या कामाकरितां घेऊं नये ह्मणून तिचा विनियोग येणाऱ्या पाव्हण्याच्या इच्छेनुरूप एखाद्या सार्वजनिक कामांत करण्यासाठीं बडेसाहेबांकडेस ती रक्कम पाठविली गेली नसेल असें कशावरून समजावें? परंतु हीं विधानें नोटा पाठविल्या गेल्या अशी कल्पना केल्यावरच शोभतात. आणि जर नोटा खऱ्याच पाठविल्या गेल्या असतील तर त्यांत हेतु आणखी कांहीं तरी विशेष भूषणास्पद असला पाहिजे यांत संशय नाहीं.

पृष्ठ २ आणि ३ यांत रा. ब. वेदरकर इंदुरास गेले परंतु ते दसऱ्याच्या स्वारींत दिसले नाहींत; त्यांनीं महाराजांची भेट घेण्याकरितां तीन वेळ निरोप पाठविले परंतु महाराजांनीं त्यांना सांगून पाठविलें कीं, नानकचंदजीपासून चार्ज घेऊन त्यांनीं तुमच्या मागें किती मोकद्दमे फैसल केले त्याचा रिपोर्ट करा, नंतर भेट घेऊं. दुसरे दिवशीं महाराजांची व त्यांची भेट झाली; ते लवकरच परत जातील. ६ महिन्याकरितां आले आहेत. हा मजकूर आहे. ही सर्व बातमी सुद्धां "ह्मणतात" याच आधारावर लिहिली आहे. शाबास भाटचे उर्फ गटार यंत्राधिपती! यांत तरी तुह्मी कोठली सार्वजनिक गोष्ट लिहिली?

पृष्ठ ३ व ४ यांत स्पेशल जज्ज रानडे यांनीं प्रेमरतन यांजवर आठ हजारांची डिक्री केली ती अन्यायानें केली; दाव्याचें काम एका दिवसांत आटोपलें; रा. रा. रानडे यांस मुरजी सुरजमल मोदी यांचें घेणें वसूल करण्यास स्पेशल अधिकार दिला; असें आहे. ही बातमी लिहिण्यांत मात्र "ह्मणतात" व "कळतें" नाहीं. प्रेमरतन यांजवर अन्यायाची डिक्री झाली तर त्याला अपील करण्याचा मार्ग मोकळा होता तो त्यानें स्विकारला पाहिजे होता अथवा निदान त्याचें अपील घेतलेंच जात नाहीं असें

भाटचे उर्फ कज्जेदलाल यानीं तसा हुकूम त्याच्या नंबर तारखेसह दाखविला पाहिजे होता. स्पेशल जज्ज रानडे यांच्यावर पुष्कळ अपील कोर्टें आहेत. त्याचप्रमाणें रा. रानडे यांस भुरजी सुरजमलचें लोकांकडेस असलेलें घेणें वसूल करण्याचा अधिकार नवीन दिला गेला नाहीं. त्यांच्या पूर्वींच्या स्पेशल जज्जांसही तो अधिकार होता; हें घेणें वसूल करणें स्पेशल जज्जांच्या कामांतील मोठा भाग आहे. हा अधिकार नवीन दिला तर त्याचा नंबर तारखेचा हुकूम दाखविण्यास भाटचे कां लाजले ?

पृष्ठ ९ ते १९ पर्यंत महिदपुरीं सदाशीव मार्तंड नांवाच्या सरकारी दुकानचे मुनीम बापुजी नारायण यांचा मुकद्दमा दिला आहे. यावर विचार करतां बापुजी नारायणाच्या मोकदम्यांत अपिलें झालीं आहेत आणि त्याचा निकाल अपील कोर्टांत होईपावेतों स्वतःचें मत लिहिणें आह्मी रास्त समजत नाहीं. इंग्रज सरकारच्या राज्यांतमुद्धां मान्य झालेले असे न्यायाधिकारी इंदूर येथें आहेत. न्यायमूर्ति मि. धुरंधरसारख्या न्याय धुरंधर चिफ् जस्टिसांच्या न्यायव्यवस्थेला यकःश्चित भाटचांनीं दोष देऊं ह्मटलें तर कोण ऐकतो ! कोठल्याही न्यायाधिकारींविरुद्ध बोलण्यापूर्वीं भाटचे यानीं न्याय समजण्याची स्वतःची योग्यता लोकांस सिद्ध करून दिली पाहिजे. मोर एल् एल् बी. च्या हलकट पुस्तकाधारें तोंडाची वाफ दवडणें ह्मणजे जगांत स्वतःच काय तो शहाणा ह्मणण्यासारखें होय.

पृष्ठ १९ ते १९ पावेतों रा. ब. बेदरकरांच्या कारभारावर टिका आहे, त्यांत बेदरकर यांना त्यांच्या पूर्वींच्या कारभाऱ्याप्रमाणेंच अधिकार आहेत. ते लोभांत पडले आहेत व चैन भोगण्याकरितां इंदुरीं राहिले आहेत. ते मागच्या कारभाऱ्याप्रमाणें जोरानें काम करीत नाहींत. दिवाण बहादूर आर. रघुनाथराव व रावबहादूर किर्तने यांच्याकडेस, महाराजांचे हुकूम महाराजांच्या सहीनें जात होते व बेदरकरांकडेस महाराजाजवळच्या कारकुनांच्या सह्यांच्या चिठ्ठ्या जातात. रा. ब. बेदरकर अशा हुकुमाविरुद्ध कांहीं बोलत नाहींत. महाराजांनीं बदललेल्या व नोकरींतून वजा केलेल्या कारकुनांस बेदरकर न्याय देत नव्हते ! एक कारकून किंवा शिपायाची बदली किंवा बहाली बडतर्फी बेदरकर करूं शकत नव्हते. महाराजांनीं लक्ष पुरविलें नाहीं अशीं कामेंसुद्धां बेदरकर करूं शकले नाहींत; परंतु बेदरकरांना एकीकडेस ठेवून गुप्ते साहेबांनीं धैर्यानें व अगत्यानें तीं कामें केलीं आहेत व त्यांनीं आपल्या ज्ञातीचे ४ वर्षांत शंभरा जवळ जवळ लोक इंदूर इलाख्यांत नोकरीस लाविले आहेत. त्यांपैकीं महाराजांच्या मंजुरीनें दहा पांचच असतील. त्याही कामांत बेदरकर बोलूं शकले नाहींत, असें लिहिलें आहे. या लिहिण्याचा विचार

करण्याकरितां एक वाक्य बस आहे. " एक कारकून किंवा शिपायाची बदली किंवा बहाली व बडतर्फी आमचे रावबहादूर करूं शकले नव्हते " भाटचे याची खोटें लिहिण्याची ही कोण शर्थ !!

पृष्ठ १९ ते २१ पर्यंत लिहून आलेला मजकूर ह्मणून जागा अडविली आहे. परंतु त्यांत महाराज अन्यायी आहेत या मोघम व पुनः पुनः तेंच्या तेंच लिहिण्या पलिकडे कांहीं नाहीं. कोठल्या उदाहरणावरून त्यांना तसें ह्मणावें याबद्दल एकही गोष्ट नाहीं.

पृष्ठ २१ ते २३ पर्यंत भाटचे यानीं चोर लोकांनीं आपापलीं कृष्णकर्में छपवून साव बनण्यासाठीं 'विक्षिप्तांत' आपली थोरवी गाऊन महाराजांस दोष देण्यासाठीं इतरांस पैसे न देतां स्वतःसच अथवा स्वतःकडून खुलासा करवून घेऊन मग स्वतःच्या ठरीव अडत्यांस पैसे भरावे. उगाच कोणा भलत्याच्या हातीं पैसे जाऊं नये ह्मणून लांबच्या लांब उपदेश लिहिला आहे. 'विक्षिप्तांत' इंदूर प्रकर्ण येत गेल्यानें बिचाऱ्या भोळ्या लोकांस फसविणारे लोक फार झाले, हा व कायतो भाटचे यांच्या कृतींचा लोकांवर परिणाम झाला. आतां इतरांस चोरीचा माल न मिळतां स्वतःच्याच घरीं सर्व माल यावा ह्मणून भाटचे स्वतःच्या रामोशी अडत्यांची ओळख लोकांस करून देण्यासाठीं " आमचा बातमीदार वेगळाच असून तो वजनदार गृहस्थांपैकीं एक आहे " अशी खूण देतात. या वाक्यानें ज्यांच्या येथें असे तर्कटी लोक एकत्र जपतात तो व शरिरानें वजनदार हा खुलासा त्यानीं करून दिला असें आह्मांस वाटतें. " पाण्यामध्यें मासा झोंप घेतो कैसा । जावें त्याच्या जन्मां तेव्हां कळे ॥ " या उक्ती प्रमाणें भाटचे यांचे लेखांचें खरें रूप ओळखून बिचाऱ्या गरिबांच्या पैशाचें रक्षण करण्यास आणि त्यांनां राजद्रोहाच्या पापांतून वांचविण्यास, आह्मांसही भाटच्यांचें सुभाषित समजण्या पुरतें तें शिकावें लागतें ! ज्यांच्यावर खरा जुलूम होईल त्यांनां दाद मागण्याचा खरा मार्ग माहीत आहे आणि इंदुरास जुलूम झाला तर तो पाहण्यास इंग्रजी अंमलदार लांब नाहींत असें असतां लोकांस लबाडापासून वांचविण्याचा बहाणाकरून भाटचे यानीं असें मोठें चऱ्हाट वळलें त्यांत त्यांचा हेतु वर दाखविला तोच आहे हें खास होतें.

पान २३ ते ४० यांत इंदुरास रा. रा. महादेव मोरेश्वर इं. म्यानेजर सरकारी छापखाना यांनीं एक जाहिरात उर्दु भाषेंत छापली तिचा उतारा व तिजवर भाटचे यानीं स्वतःच्या अर्थशास्त्राचा उपयोग करून अकलेचे तारे तोडले आहेत. या साठीं ती जाहिरात साग्र उतरून घेऊन तिचा विचार करणें अवश्य आहे.

श्री.

# जाहिरात.

## कामवालोंके अमाल रीयायाको जाहीर होनेके लियें :—

बाज बाज कामवालोंने बेपारीयोंके साजीससे सुतजंतर और कापडखाना और कोठी और साहागीर्दिपेशा और ईंजनेरी वगैरा कारखानेमे सरकारी रुपयेका नुकसान कीया और कराया ये जाहीर हे.

हातीके बराबर गलती और सुईके बराबर चौकसी इस तरहसे सुतजंतर और कापडजामदारखाना और कोठी इंजनेरी वगैरे महकमेमे सरकारी लाखों रुपयेका नुकसान होते हुवे कामवालोंनें उस तरफ बिलकुल देखा नहीं बलके कामवालोमेसे कोई येखादे कामवालेने नजर देकर और थोडीसीभी तसदी लेके सरकारी नफा और नुकसानके तरफ देखना च्याहीये था ये इन कामवालोंके हातसे हरगीज बना नहीं और अगर ओ देखते तो उनपर हरामखोरीका इलजाम आने नही पाता ओर सरकारी नौकरी ईमानसे की ऐसा जाहीर होता और इस सबबसे खुदाके और आपने मालीकके सामने तनखाका रुपया मुफत खानेका दाग न लगता.

बडे बडे कामवाले हुशीयार होकर सरकारी नुकसान होते हुवे उस बाबत उनोने ख्याल करना था ओ उनोने कीया नही और नुकसानके बाबद कुछ बंदोबस्तभी कीया नही इतनाही नही बलके हुजूर के पेशीमे नकूच नकूच काम भेजते थे और ये सरकारी रुपयेका नुकसान होते हुवे हुजूरको उसका इत्तलाभी नहीं कीया. इस हालतमे ये सरकारी नुकसान जो हुवा सो उन कामवालोसें क्यों नहीं भरलेना चाहीये.

शिवाय इसके बिच्यार करते हुवे एकंदर काररवाइसे ऐसा पाया जाताहेके अमोलकचंद बजाजके तरफसे और रामभाऊ इंजिनियर और वल्लीभाई बोहरी इससे बाज बाज कामवालोंको कुछ फायदा पोंहच्या नहीं होगा ये बात खियालमे आने माफक नहींहे.

कुछ कुछ कामवालोंनें उपर लिखे हुवे महकमोमे सरकारी नुकसान किया इस बारेमे हुजूरके हुकूमसे उनपर गलती लगाई गई. इस लियें ईन कामवालोंनें और दो तीन बदमाश वकील वगैरा निकाल दिये हुवे झुटे जालसाज लोगोंनें मिलकर अखबारोंमें अपनें मालीकके खिलाफ झुटी खबरें लिखतेहें. और जबके कामवालोंनें उस झुटे खबरोंके जवाबमे सच्या हाल लिखना च्याहियेथा, लेकीन नहीं लिखते है और न लिखना चाहतेहे. उससे ये सबुत होता हेके ये बदमाश लोगोंका अखबारोंमे लिखना इन कामवालोंके सराकतसे हे ये जाहीर हे. नही तो इन कामवालोको ऐसा

[stamp]

च्याहीहेथाके जबके अपने मालिकके बराखिलाफ झुटी झुटी बाते जो लोग छपावातेहे उनके बराखिलाफ जवाबमे मालीकके तरफसे लिखना इनको लाजीमथा. सायदके आगे पिछे अपने किये हुवे बुरे कामोका नतीजा अपनेको भुगतना पडेगा. और जो सरकारी रुपयेकी नुकसानी हुईहे ओ भरदेना पडेगी इसलिये अपन आगे होकर अपने तरफसे अखबारोके जरीयेसे अपनें मालीककी झुटी बदनामी छपानेका कसद कर रहेहें, उसका सबब ये हे के मालीकका मू बंद करनेसे अपने उपर आये हुवे इलजामके बारेमे मालीक अपनेंसे आगे कुछ बोल न सके. इस लिये इन कुछ कुछ कामवालोका कसद नहीं होगा येह बात मुमकीन नहीं.

कामवाले ये रहीस लोगोंकी आंखे और बाजु हे; इनके जरीयेसे रहीस लोग अपने रीयायाको इनसाफ देते हे क्यों के ये मुमकीन नहीं हे के रहीस खास दिवानी, फौजदारी, सायर, काळी वगैराके सब काम जातसे देख सके; इस लिये कामवालोके उन उन कामोका जीमेंवार करके और उनको माकुल तनखा देकर अनेक जरीयेसे रहीस अपने रयतको इनसाफ दिलवाते हे. और ये काम कामवाले तनखा लेकर बराबर करते नही और उस सबबसे अपनी बदनामी करवाके मालीककोंभी उस बदनामीमे हीसेदार करना च्याहतेहें. और ईसीतरहसे लोगोकों इनसाफ न मिलते हुवे और सरकारी काममे रुपयेका नुकसान करवाते हे. उस तरफभी ख्याल न करके मालीकसे जाहीर नही तो पोसीदा दुषमनी करनेमे कसर करते नही हे.

मालीकका बदमासोको सजा देना और इनसाफसे चलना और रीसवत नहीं खाना और नही खाने देना ये सब बाते कामवालोंको पसंद नही पडनेके सबबसे मालीकके मगजमे कुछ फरक हुवाहे ऐसी झुटी बातें जाहीर करते हें; और अखबारोके जरीयेसे करवाते हे. मीसाल एक साहुकार और दस च्योर हो तों उस साहुकारको च्योर बनानेका कसद करते हे. और आगे पीछे मालीकके तरफसे अखतीयारात निकालके और आपने हातमे लेनेका कसद करनेका इरादा करते नही होंगे ये बात मुमकीन नही. जबके अखतीयार निकाला तब सब रीयासतका खजाना अपने हातमे रहनेके लिये ये सब बाते की गई हे.

ईन सब बातोको देखते हुवे ऐसा पाया ज्याता हे के हालमे जो झुटी झुटी खबरे निकाले हुवे वकील लोग छपवाते हे इसमे इन कामवालोंकी सराकत होना च्याहीये. ये बात कुछ कुछ बातोंसे जाहीर होती हे. रियासतके बुरे भले इंतजामके बारेमे जो कुछ इनको मुनासब मालुम हो सो लिखते तों उसका इतना फीकर नही. लेकीन एक बडी बात अंदेसेकी, बहुतसी छपी हुई बातोमे येहे के महाराजा साहेबके

मगजमे कुछ फरक आया हे. इन सब बातोका खीयाल करते हुवे ऐसा पाया जाता हे के जीस हालतमे मालक हुशीयार होके अपने तावेदार लोगोके अछे बुरे कामके उपर जबके मालीककी निगा हे ईस हालतमे, जो नेक तावेदार हे वो मालीकसे इमानदारीसे रहेकर आपना रीजक मिलाते हे; और जोके बदमास और नमक हराम हे उनको अपनी येबजुंई करनेवाला मालक कोई हालतमे पसंद हो नही सक्ता.

जैसेके और रियासतोमे कामवाले लोगोंके हातमे अखतीयारात होते हैं और हे वैसी हालत यांहा न होंनेके सबबसे इन येहलकार लोगोकों फायदा नहीं होता हे और अगरचे हुवा तो ओ हजम होना मुशकील होता हे इस लीये इन येहलकारान लोगोके पेटमे दरद होता नही होगा ये बात हरगीज मुमकीन नही हे.

दरबारसे सरकारी पैसेकी नफा नुकसानके बाबदमें कागजात आते हे सो दीवाण कचेरीके पेशकार बोहोत दीनतक दबाकर मालीकके सामनें सीरफ छोटे छोटे काम लाते हें ईस लीये ये भले लोग ईन बदमासोमे मीले नही होंगे ये पाया ज्याता नही.

इन सब बातोकी बुनीयाद जनरल बापुसाहेब ये हें ऐसा कहेनेमे कुछ हरज नहीं दिखता. क्यों के जबसे ये शक्स आये हें तबसे नये कामवालेमे और मालीकमे नाइत्तफाकी डालकर इन सबोंकों बेवकुफ बनाकर आप खुद हुशीयार बननेका इनका इरादा नही होगा ऐसा नही कहा जाता हे.

युरोपमे सोशालीस्ट और ॲनरकीस्ट ( राजद्रोही और रहीसके खिलाफ ) ऐसे फिसादी होते हे लेकीन हिंदुस्थानभीं इन लोगोसे बच्या नही हे.

जेसे येक जमाआतके सरगीरो जनरल बापुसाहेब हे वैसेही दुसरे जमाआतके सरगीरो किसनराव मुळे हे. किसनराव मुळेने और उनके येक फारसी दोस्तने पेशतर सन १८८४ इसवी सालमे अखबारोमे झुटी खबरे छपाइथी उस परसे ये खास पाया जाता हे के अभी हालमे जो 'पायनीयर' अखबारमे झुटी खबर छपी हे वो इनोने छपवाई होगी इसमे कुछ शक नही हे.

जनरल बापुसाहेबका गुरंदा जेसे बलवंतराव बुटी था वैसा मेहसरके येक मुकदमेमे वकील था वो नही होगा ऐसा खियालमे आता नही; और कभी कभी इनके तरफसे उसको खरचभी पोहोंचता होगा.

सुतजंतर कारखानेमे अमोलकचंद बजाजका रुइ बेचना और कपडा लेनेका तालुकथा वोही अमोलकचंदका ब्याही तिलोकचंद जीससे बापुसाहेब जनरलका लेन देन होनेसे इसबाबदमे सब ठिकरा इनके सिरपर फुटताहे.

कुछ कुछ हुजुर अंगरेजी दफतरवाले और कुछ कुछ दरबार आफीस मोतीबंगलेके एहलकारान इस करममे सरीक होना चाहीये. ये बात बोहोतसे बातोपेसे पाइ जाती है.

ये बडी आफसोसकी बात हे के मालीक आपने काबुभर जीतना उनसे बनसकताहे उतना काम करके ओर रीयायाको आराम देनेमे और ईनसाफ देनेमे कसर नही रखते; लेकीन ये कमबखत कामवालेका सरकारी पैसेका नुकसान करके मालीकको तखलीफ देना ओर रीयायाको बरवक्त ईनसाफ नदेना ओर उस सबबसे उनकों तखलीफ पोहचना ओर अखीरमे अपनी और मालीककी बदनामी करवाना बदले लेनेनेकनामीके ये बेहतर समझते हे.

दस कामवाले मीलकर येक मालीक उलट और सुलट बाते समजाकर मालीकको धोकेमे डालनेका काम सहेज कर सकते हे; और वो उनको याद हे. लेकीन ऐसा काम करना उन कामवालोको लाजीम नही हे; ऐसा करनेसे वो नीमकहराम होते हे. और सरकारी बडे बडे कामोमे दीकूते आकर उसका फेसला न होते वैसाही पडा रहता हे.

और लोगोंकोंभी वक्तपर इनसाफ मीलता नही. और इस सबबसे वो आपको और अपने मालीकको बदनाम करते हे.

इंदूर, तारीख ९ माहे अकटोंबर सन १८९५ इसवी.

महादेव मोरेश्वर,
इं० म्यानेजर सरकारी छापखाना.

जाहिरात उर्दु मार्फत आहे तरी ती समजण्यासारखी आहे आणि तिजसंबंधाच्या विवेचनावरून ती जास्त समजणार आहे. त्यांतील १।२।३ कलमासंबंधीं विचार केला तर जामदारखाना, कोठी व इंजनियरींग हे कारखाने कसे असतात हें ज्यांना कळतें, त्यांनां या कारखान्यांतील एखाद्याही नोकरानें अप्रामाणिक गडबड केली नाहीं असें मानतां यावयाचें नाहीं. अप्सरांनां मोहून जाणारे नाहींत, असे ऋषी बोटावर मोजण्या इतके तद्वतच कारकुनी कसब लढविणारे नाहींत असे नोकर वरील कारखान्यांत सांपडावयाचे, असें ह्मटलें असतां अतिशयोक्ती होणार नाहीं. अपराधाबद्दल नोकरांस धन्यानें शिक्षा करविली नाहीं ह्मणून त्यांनीं अपराध केलेच नाहींत असें ठरावणें चुकीचें आहे. दयाळू यजमान नोकराचे बरेच अपराध क्षमा करतो ह्मणून त्या क्षमेचा उपयोग नोकरांनीं स्वतःचे अपराध छपविण्यास करावयाचा नाहीं. चोरींतील मुद्देमाल सांपडला नाहीं अथवा चोर हातीं आला नाहीं ह्मणून चोरीच झाली नाहीं

असें ह्मणणें शोभत नाहीं तद्वत यदाकदाचित् वरील कारखान्यांत चोरी करणारे लोक सांपडत नाहींत अथवा सांपडून त्यांनां इतर लोकांस कळण्याइतकी शिक्षा केली नाहीं ह्मणून झालेल्या नुकसानीवरून पुनः तसे प्रकार न घडण्याविषयीं जर कोणी स्वतःचे उद्गार प्रदर्शीत करील तर त्यांत त्यांजकडे कांहीं एक दोष नाहीं. उलट त्या उद्गारावरून नोकरांनी आपापलें वर्तन नीट ठेवण्यास जपलें पाहिजे असें शिक्षण घेतां येतें. आपलीं मुलें चांगलीं निघावीं ह्मणून जर एखादा पिता स्वतःच्या मुलांस वाईट कामें करूं नये ह्मणून निरनिराळीं विधानें मांडून त्यांस उपदेश करूं लागला तर त्याबद्दल त्याला वाईट कसें ह्मणावें ! जाहीरातींत वरील तीन्ही कलमांत, लोक वाईट कामें करतात व वाईट कामापासून झालेलें सरकारी नुकसान त्यांच्याकडून कां भरून घेऊं नये असे उद्गार आहेत; आणि त्या उद्गारावरून नोकर लोकांनीं आपापलीं कामें विशेष सावधगिरीनें करावीं असें चांगलें शिक्षण घेतां येतें. ज्यांच्या वाईट कामाचा परिणाम ज्या एक्या व्यक्तीच्या नुकसानीस कारणीभूत होतो त्या व्यक्तीनें स्वतःच्या नुकसानीबद्दल उद्गार काढूं नये असें भाटचे याचें मत दिसतें; आणि असें विधान पुरावा तोडून सुटण्याचें कसब चोरांस शिकवितें. आरोपीस संशयाचा लाभ देऊन न्यायाधिशानें सोडलें ह्मणून त्यानें स्वतःच्या निर्दोषीपणाबद्दल फुशारकी मारावी काय ? कलम ४ यांत अमोलकचंद बजाज, रामभाऊ इंजिनियर आणि वल्लीभाई बोहरी या तिघांविषयीं उद्गार आहेत. त्या लोकांपैकीं रामभाऊ इंजिनीयरांस भाटचे यानीं अत्यंत प्रामाणिक, निस्पृह व स्वकर्मदक्ष, पापभिरू आणि स्वामीभक्त गृहस्थ ठरवून त्यांच्या तोडीचा मनुष्य साऱ्या इंदूर संस्थानांत नाहीं असें लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु रामभाऊंची अशी प्रसंशा करण्यास भाटचे यांना, त्यांच्या गुणाबद्दल देण्यास एकही उदाहरण सांपडलें नाहीं. या वरून ज्याचा स्वतःशीं संबंध नाहीं अशा व्यक्तींची तारीफ करण्यास भाटचे यांना जितका आधार सांपडला असेल व जितकें कारण घडलें असेल त्याच्यापेक्षां सहस्त्रपट अधिक आधार व कारणें ह्या व्यक्तींचा संबंध महाराजांच्या इंजिनियरींगसारख्या अन्नछत्री कारखान्याशीं असल्यानें, रामभाऊ वगैरेच्या वर्तनाविषयीं संशयी उद्गार काढण्यास जाहिरात प्रसिद्ध कर्त्यास आहेत हें कोणीही कबूल करील. वल्लीभाई बोहाऱ्याचा संबंध इंजिनियरींगशीं नेहेमीं कंट्राक्टाचा आहे असें खुद्द भाटचे ह्मणतात; याचा विचार केला तर सुधारणेच्या अति उच्च शिखरीं पोंचलेल्या राष्ट्रांतील इंजिनियरींग खातें व त्यांतील कंट्राक्टर्स यांची घालमेल ज्यांनां त्या राल्याची पूर्ण माहिती असते त्यांनां विचारली ह्मणजे इंदूर संस्थानच्या इंजिनियरींग

कारखान्यांत इंजिनियर व वक्षीभाई उभयतां, पाण्यानें भरलेल्या तलावाचे किनाऱ्यावर तान्हेनें तडफडून मेले असतील असें कधीं तरी वाटेल काय ? कलम ९ ते १० यांत स्वतःच्या राज्याची स्थिति पाहून राजा आपल्या नोकरांस उपदेश करितो तद्वत् जाहिरनामा प्रसिद्ध कर्त्यांनीं नोकर लोकांस इंदूरची सांप्रत स्थिति लक्षांत घेऊन उपदेश केला आहे. आणि स्थिति जाणून उपदेश करण्याचें वाटेल त्या सत्पुरुषाचें काम आहे. या कलमेंत उपदेश ह्मणून जो भाग आहे तो खोटा आहे असें दाखविणें प्रतिपक्षाचें काम होतें; परंतु तें सोडून भाटचे यानीं नालागू वडवड केली आहे आणि स्वतःची लेखणी पुष्कळ विटाळली आहे मात्र कलम ७ यांत भाटचे यानीं राजाराम विश्वनाथ व गोविंद चिंतामण भाटचे यांचीं उदाहरणें दिलीं आहेत. त्यांची हकीकत भाटचे यानीं निराळी दिली आहे त्याचा विचार आमच्याकडून निराळा होणार आहे, तेंव्हां येथें त्याविषयीं थोडक्यांत लिहून उगीच जागा अडवून भाटचांच्याप्रमाणें पुस्तक मोठें व जाड करण्याची आमची इच्छा नाहीं. १० व्या कलमांत महाराजांस खऱ्या महत्वाचीं कामें दाखविण्यांत येत नाहींत, असा मजकूर आहे तो सप्रमाण सिद्ध करण्यांत येणार आहे, त्यावरून वाचकांची खात्री होईल कीं, तें कलम अगदीं रास्त आहे. महाराज शुक्रवारीं व मंगळवारीं कामें पहात नाहींत ह्मणून भाटचे यानीं ह्मटलें आहे हें अगदीं खोटें आहे. प्रजेचें कल्याण करण्यांत महाराजांना कोठल्याही ग्रहांची हरकत नसते. त्यांना स्वतःचीं खासगत कामें करण्यास जर मुहुर्ताचा विचार असेल तर त्याचा दोष समाजव्यवस्थेकडेस व शास्त्रमहत्वतेकडेस आहे. महाराज आर्य आहेत आणि आमचा आर्यधर्म बुडूं नये अशी आह्मां आर्यांची इच्छा आहे. सण, वार, नक्षत्र, ग्रह इत्यादि ज्योतिषमहात्म्य एकट्या भाटचांच्या ह्मणण्यानें कसें नाहिसें होईल ?

११ वी कलम—जनरल बापूसाहेब नांवांच्या अंमलदाराविषयीं आहे आणि ता. २० आगष्ट १८९९ च्या श्री. होळकर सरकार ग्याझीट नंबर १० अंक ४७ यांत त्यांच्याविषयीं जो जाहीरनामा आहे त्यांत महाराजांनीं काढून दिलेल्या मनुष्यांस, त्यांनीं नोकरीस ठेविलें असें नांव निशीनें प्रसिद्ध झालें. त्या वरून वाचक या कलमाचा विचार करतील. राजाच्या आज्ञेविरुद्ध वागणें आह्मी भयंकर पाप समजतों. अमूक माणसें काढून दिलेलीं होतीं हें आह्मांस माहीत नव्हतें, असें जनरल बापूसाहेब कदापि ह्मणूं शकणार नाहींत कारण नव्या माणसांस नोकर ठेवतांना तूं पूर्वी कोठें होतास हा प्रश्न विचारणें अगदीं साहजिक व स्वाभाविक आहे. जनरल बापूसाहेबांच्या हुषारीस व विशेषतः ते जनरल होते या साठीं हे दोन्ही धर्म त्यांना चांगले अवगत असले

पाहिजेत. त्यांतून चाबूकस्वाराची माहिती, बापूसाहेब स्वतः स्वार असून घोड्यांस विसंबणारे नसल्यानें त्यांना अवश्य असलीच पाहिजे. त्यावरून त्यांच्याविषयीं कलम १० तले उद्गार निघण्यास कारण घडलें असावें.

जाहिरातींतील १२ व्या कलमावर टीका करतांना भाटचे यानीं मि. मुळे यांची तारीफ केली आहे व महाराजांस दोष दिला आहे. मि. मुळे यांची तारीफ करण्यांत भाटचे यानीं ह्मटलें आहे कीं त्यांचे खरें कोणतें व खोटें कोणतें हें मात्र कधींच कोणास ओळखतां यावयाचें नाहीं. व आपल्याविरुद्ध वरिष्ठाकडेस बोभाट न जाऊं देणें व न जाणें हेंच न्यायानें वागण्याचें मुख्य तत्व ते समजतात. भाटच्यांच्या या सरटिफिकेटावरून मि. मुळे यांच्याविषयीं उर्दू जाहिरातींत जें लिहिलें आहे तें किती खरें व किती खोटें असावें हें कोणांसही समजण्यासारखें आहे यासाठीं आह्मी आमचें मत देत नाहीं.

१४ वें कलमांत जनरल बापुसाहेबाविषयीं लिहिलें आहे; त्याचें खंडण करणें त्या व्यक्तींचें काम असतां भाटचे यानीं तें करूं पाहिलें आहे. परंतु त्यांत ते किती फसले आहेत हें जाहिरातींतील कलम १० व त्यावर भाटचे यांच्या पुस्तकांतील त्यांचें १३ वें कलम पाहिलें ह्मणजे समजण्यांत येईल. जाहिरातींतल्या १५ व्या कलमांत जनरल बापूसाहेब व तिलोकचंद या उभयतांच्या एक थैलीचा संबंध दाखविला आहे त्यांत खोटें काय आहे हें भाटचे बोलूंच शकले नाहींत.

१६–१७–१८ हीं कलमें नोकर लोकांस उपदेशांचीं आहेत व त्यावर हलकट मंडळींत दिलें असतां शोभणारें उदाहरण देऊन भाटचे मौन्य धरतात. शेवटीं एकीकरणाच्या शेवटच्या पॅरॅग्राफांत भाटचे ह्मणतात "अर्थात रयतेस न्याय मिळत नाहीं ही गोष्ट खरी ठरते व ती महाराजांसही कबूल आहे." आह्मी ह्मणतो कीं या वाक्यांतच महाराजांची इच्छा प्रजेस न्याय मिळत जाण्याची आहे असें भाटचे कबूल करतात आणि यामुळें भाटचे यानीं महाराजांस अन्यायी वगैरे ह्मटलें आहे तें सर्व त्यांच्याच वाक्यानीं खोटें ठरतें. ज्यांची इच्छा प्रजेस न्याय मिळावा अशी असते ते अन्याय कदापि करणार नाहींत असा मनुष्य स्वभावाचा मोठा सिद्धांत आहे. कारण क्रिया बहुतांशीं इच्छेचें चित्र होय.

पृष्ठ ४१ ते ४७ पावेतों एक इस्तिहार ह्मणजे जाहीरनामा आहे तो येथें अक्षरशः उतरणें योग्य वाटतें.

श्री.

# इस्तिहार.

## बापुसाहेब जनरल व बालमुकंदजी जनरल आदिकरून कामवाल्यांची हकिकत.

पूर्वीच्या इस्तिहारामध्यें बऱ्याच कामवाल्यांची नांवें आलीं नाहींत, तीं आह्मीं याच करितां उघड केलीं नाहींत कीं, अझून तरी त्यांनीं उमजून मालकाविषयीं ज्या ज्या लबाड गोष्टी वर्तमानपत्रांतून लिहून येत आहेत व गव्हरमेंटच्या कानावर जात आहेत त्या बदमाष लोकांनींच रचल्या असून खोट्या आहेत. याजविषयीं वर्तमान-पत्रामध्यें त्यांचे प्रत्युत्तरीं जी वदनामी रीयाषतीची आहे तीच मालकाची आहे व तीच कामवाल्यांची आहे असें यांनीं आपले मनांत समजून, मालकांचे तर्फे मजकूर लिहिला पाहिजे होता, तसें यांनीं केलें नाहीं. ह्मणून पूर्वीचे इस्तिहारामध्यें कोणकोणते महकम्यामध्यें कोण कोणत्या कामवाल्यांनीं नुकसान केलें व करविलें त्यांचीं नांवें उघड केलीं नव्हतीं, तीं आतां उघड करणें भाग पडलें आहे. कामवाले आपले दोष छपवून मालकांचे दोष बाहेर काढणार त्यांचे पूर्वींच आह्मीं ही खबरदारी घेत आहों व हे लोक मालकांचेविरुद्ध मजकूर दुसऱ्याकडून छापवितात तसें न करितां आह्मीं यांची हकीकत प्रत्यक्ष रीतीनें देत आहोंत.

फार लांबलचक लिहिण्यापेक्षां आमचे रयतेस थोडक्यांत जाहीर होण्याकरितां, हे सर्व कामवाले मालकांशीं कशा तऱ्हेनें वागतात याची हकीकत आह्मीं देत आहोंत ती येणेंप्रमाणें:—

यांच्या जमातीमध्यें कोण कोण लोक सामील आहेत तें कळविणें अवश्य आहे, याजकरितां खालीं लिहिल्याप्रमाणें त्यांचीं नांवें दिलीं आहेत तीं:—बालमुकुंद जनरल, किबे यांचे धाकटे पातींतील मंडळी, कृष्णराव मुळे व यांचा एक फारशी मित्र, रामप्रताप हरबिलास, बळवंतराव शिंत्रे, लखमिचंद राठी, गुप्ते साहेब, धुरंधर साहेब, गणपतराव केशव, नरसोपंत किरकिरे, दायमबक्ष, अबदुल अजीज, विठ्ठलदास लखाणी, किबे साहेबाकडील एक मास्तर आदिकरून मंडळी एका पार्टीची असावी असें अनु-मान करण्यास बहुतेक कारणांवरून वरीच बळकटी येते.

तसेंच दुसऱ्या पार्टीमध्यें जनरल बापूसाहेब, सर दादासाहेब, बाबा वकील, किबेसाहेब यांचे मोठे पातींतील मंडळी, तिलोकचंद हाबले काबलेवाला, अमोलकचंद बजाज ही सर्व पेंढारगर्दी असावी हें अनुमान बऱ्याच गोष्टींवरून सिद्ध होत आहे.

तिसरे पार्टींत खुमानसिंगजी बक्षी, मुनशी राय नानकचंदजी, लाला विशेशरनाथ वकील साहेब, बळवंतराव पांडुरंग ही मंडळी आहेत. यांपैकीं पहिल्या पार्टिच्या मंडळीच्या मालकाशीं विरोध करण्याच्या कृत्या गुप्त रीतीनें चालतात व दुसरे पार्टिच्या मंडळीच्या कृत्या अगदीं उघड रीतीनें चालतात, इतकाच काय तो यांच्यामध्यें फरक आहे. व तिसरे पार्टिची मंडळी आंतल्या गांठीची असल्यामुळें व यांचीं सर्व खलवतें छावणींत होत असल्यामुळें ही पार्टी कांहीं इकडे व कांहीं तिकडे आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

एकंदरींत पाहतांना या तिन्हीं जमातींपैकीं कांहीं कांहीं लोकांचा हेतु स्तुत्य नसून मालकाचें नुकसान करून आपल्या मालकापेक्षांही मोठमोठ्या लोकांची मेहेरबानगी मिळविण्याकरितां त्यांचे प्रयत्न हमेषा ज्यारी असतात. ही हकिकत पुष्कळशा गोष्टींवरून उघड होत आहे. असें न करितां ज्यामध्यें मालकांचें व रियाषतीचें हित आहे त्या गोष्टींकडे लक्ष देऊन सर्वांनीं मिळून एक विचारानें काम करणें, तें न करितां उलट यांचा आपसांतच बेबनाव असून अशी चढाओढ चालली आहे कीं, पाहूं बरें कोणाचे हातून राज्याचें नुकसान ज्यास्त होतें. अशा तऱ्हेच्या निमकहराम कामवाल्या लोकांमध्यें वैषम्य असल्यामुळें ज्या रियापती आज अस्तित्वांत नाहींत त्या रियापतीचे हे परिणाम होण्यास अशा तऱ्हेचेच लोक कारणीभुत झाले असावेत. हिंदुस्थानांत आतां रियाषती थोड्या राहिल्या आहेत ही गोष्ट खूप लक्षांत ठेवून त्या रियापती बरेच दिवसपर्यंत चालून त्यांचे हक्क बरेच दिवसपर्यंत कायम रहातील अशा रीतीनें कोशीस केली पाहिजे. याजकरितां या सर्व भल्या मनुष्यांना हीच प्रार्थना आहे कीं, निदान पुढच्याकरितां तरी ज्यामध्यें मालकाचें व राज्याचें हित आहे अशा कामाकडेस लक्ष देऊन व एकमेकांच्या अंगावर कामाची लोटालोट न करतां त्या कामाचे अंजामाकडेस लक्ष देऊन सर्वांनीं चालावें. जेव्हां अगदीं निकरावर गोष्ट येऊन पोहोंचली तेव्हां ही हकिकत आह्मांस लिहिणें भाग पडलें.

कारभारी साहेब यांची तऱ्हा पाहतांना "पानीका रंग कैसा कीं जिसमें मिलावे वैसा" अशी आहे, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे.

जनरल बापूसाहेब, जनरल बालमुकुंद, कृष्णराव मुळे आदिकरून कामवाल्यांसारखे बरेच लोक पूर्वीं जीं राज्यें गेलीं आहेत त्यांत असल्या वांचून त्या राज्यांचा अशा तऱ्हेचा विपरीत परिणाम झाला नसावा.

जनरल बापूसाहेब यांच्या, मालकाशीं विरोध करण्याच्या कृत्या अगदीं उघड उघड असल्यामुळें निमकहरामीपणाचे डागास हे पात्र होतात, व यांचे संगती

पासून दुसरे कामवाल्यांचेही मतींत फरक होऊन तेही निमकहरामीपणा करण्यावर कमरा बांधितात अशी यांची कृती आहे. या करितां पुढचेसाठीं तरी यानीं आपलें वर्तन सुधारून हा आपला डाग काढून टाकावा.

यांना एकदां येथून घालवून दिलें होतें तेव्हां इतर लोकांप्रमाणें येथें पुन्हा परत येण्याकरितां यानीं आह्मांस कधींही अर्ज केला नाहीं व आमचे येथून काढून दिलेल्या नोकरांपैकीं अबदुल्ला चाबुकस्वार, शेरअली व बापुराव वगैरे इसम यानीं आपलेपाशीं नोकर ठेविले होते.

येथील कांहीं कामवाले व येथून कांहीं काढलेले लबाड गांवठी वकील लोक एकमत करून आपले मालकामध्यें व बडेसाहेब यांचेमध्यें वांकडें पाडण्याचा प्रयत्न करितात; तसेंच हे लोक मोठ मोठ्या राजघराण्यांत आपसांत तंटे उपस्थित करून त्यापासून आपला फायदा करून घेतात. परंतु एखाद्या राजघराण्यांतील मुख्य पुरुष चांगला समजदार व हुशार असला ह्मणजे तेथें या लोकांचें कांहीं एक चालत नाहीं ह्मणून याजविषयीं त्यांस फार विस्मय वाटत नसेल असें ह्मणतां येत नाहीं. या लोकांचा आणखी एक मोठा धंदा असा आहे कीं, मालकांचे नोकरांस मालकांची नोकरी बरोबर करूं नये ह्मणून शिकवावयाचें व त्याबद्दल मालकांनीं त्यांस शिक्षा केली ह्मणजे त्यांजकडून बडेसाहेबांकडे अर्ज देववावयाचे व असें करण्याबद्दल त्यांस लांचही देण्यास हे लोक चुकत नाहींत व अशा रीतीनें मालकामध्यें व बडेसाहेब यांचेमध्यें वितुष्ट पाडण्याचा हरामखोरीचा धंदा हे वर सांगितलेले लोक करितात व जनरल बापूसाहेब हे ह्या सर्व कृत्यांची जड आहे.

या सर्व कामवाल्यांस आह्मीं वाईट लागण्याचीं कारणें आहेत तीं खालीं लिहिल्या प्रमाणें:—

श्रीमंत कैलासवासी मोठे महाराज साहेब यांचे छत्रीच्या पायाचें काम झालें आहे त्यांत जितके रुपये खर्च झाले आहेत तितके त्या कामास खरोखर लागले आहेत किंवा नाहीं याजबद्दल कारभारी साहेब व नायब कारभारी साहेब यांस तपासणी करण्या करितां सांगितलें होतें परंतु त्यांनीं मालकाचें नुकसान झालें तरी बेहेतर आहे परंतु ठेकेदारांचें नुकसान होऊं द्यावयाचें नाहीं या हेतूनें आपलें मत असें दिलें कीं, सदरहु कामाकडेस जितके रुपये खर्च झाले आहेत तितके रुपये बरोबर लागले आहेत.

कोठींतून जें सामान दिलें जात होतें त्याबद्दल तपास करितां असें नजरेस आलें कीं, खरोखर जितकें सामान खर्चास पाहिजे त्याच्यापेक्षां पुष्कळच ज्यास्त

सामान खर्ची लिहिलें जात असे. या प्रमाणें बचत राहिलेलें सामान चोरीस जात होतें व याजबद्दल तपासणी करण्याचें काम फडणिशींतील श्रीपतराव वगैरे ज्या कारकुनांचें होतें त्यांचे व दिवाण कचेरींतील कांहीं भल्या लोकांचेंही यामध्यें बरेंच अंग असावें.

मुनशी राय नानकचंदजी व बळवंतराव पांडुरंग व नानाजी केशव या त्रिवर्गांनीं मालकापुढें आपली इमानदारी दाखविण्याकरितां सन १८९२ इसवी सालांत लालबाग मुक्कामीं कोठीमध्यें जास्त खर्च झालेला, कमी करण्याकरितां कागद हुजूर दाखविला होता, तो यांचे पथ्यावर न पडतां त्यापासून त्यांना तो प्रतिकूल पुरावा झाला आहे. कारण शामराव नारायण नायब दिवाण यांचेवेळेस कोठीच्या व फडणिशीच्या लोकांनीं मिळून शामरावजीची बदनामी करण्याकरितां, जो ज्यास्त खर्च एक दोन वर्षांत वाढविला होता, तोच या त्रिवर्गांनीं कागद दाखवून कमी करविला. वस्तुतः व्याहाड्यामध्यें जो ठराव होता, त्यामध्यें कांहीं एक कमी झालें नाहीं. फक्त वर लिहिल्याप्रमाणें जो मध्यंतरी जास्त खर्च वाढवून दिला होता तोच कमी केला गेला व पूर्वींचे खर्चा इतकाच कायम ठेविला गेला. अशा तऱ्हेचीं या कामवाल्यांचीं इमानदारीचीं कृत्यें आहेत.

मालकाविषयीं वर्तमानपत्रांत खोट्या खोट्या गोष्टी लिहून आल्या होत्या, त्याबद्दल जबाब देण्याकरितां कृष्णराव मुळे आदिकरून कामवाल्यांस सांगितलें असतां त्यांनीं असें सांगितलें कीं, ज्या अर्थीं बडेसाहेब आपले मित्र आहेत व ते लाट साहेबांकडेस आपणाविषयीं चांगले रिपोर्ट करीत आहेत, त्या अर्थीं वर्तमानपत्रांत जरी लिहून आलें तरी कांहीं हरकत नाहीं. तीं कुत्रीं आहेत. त्यांचें भुंकण्यांत कांहीं अर्थ नाहीं. परंतु बडे साहेब यांचे रिपोर्ट फक्त त्यांस व लाट साहेबांसच माहित असतात व वर्तमानपत्रांतील मजकूर सर्व लोकांस कळतो. या करितां मालकांची वर लिहिल्याप्रमाणें खोटी समजूत करून या कामवाल्यांनीं मालकाविरुद्ध वर्तमानपत्रांत लिहून आलेल्या खोट्या मजकुराचे प्रत्युत्तरीं जबाब लिहिले पाहिजे होते तसें केलें नाहीं, अशा तऱ्हेचीं हीं यांचीं स्तुत्य कृत्यें आहेत.

या सर्व कामवाल्यांचीं वर लिहिलेलीं कृत्यें पाहून, परमेश्वरानें बुद्धि, साधन व ऐश्वर्य हीं लोकांचें व राज्याचें हित जसें पाहिजे तसें करण्याकरितां दिलीं असतांही प्रजेची सेवा आपले हातून व्हावी तशी न झाल्यामुळें व बापूसाहेब जनरल आदिकरून निमकहराम कामवाले लोकांची मालकास पागल बनविण्याची खटपट सिद्धीस जाण्याच्या पूर्वींच, राज्याचें काम कोणाच्या तरी अंगावर टाकून आपण स्वस्थ

ईश्वराचें नामस्मरण करीत, राहिलेले आयुष्याचे दिवस घालवावे अशी इच्छा होते, ती सर्वांस जाहीर व्हावी.

इंदूर,<br>ता. २५ आक्टोवर<br>सन १८९५ इसवी.

हुकूमावरून,<br>**जनार्दन अनंत थत्ते,**<br>म्या. स. छापखाना.

यावर भाव्ये ह्मणतात कीं वरील मजकूर वाचून कोणाही मनुष्यास महाराज साहेब नुसते वेडे झाले असें वाटण्याऐवजीं वेड्यांचे पीर बनले आणि बडबड करीत आहेत असें निःशंकपणें ह्मणतां येणार आहे. ज्यांना आपल्या अधिकारांची किंमत समजत नाहीं परंतु वाटेल त्या शब्दांनीं आपल्या कामगार लोकांची निरर्थक निर्भत्सना करणें मात्र समजतें त्या शिवाजीराव महाराजांनीं आपल्या आयुष्याचे राहिलेले दिवस, जाहिर केल्याप्रमाणें खरोखरंच ईश्वर चिंतनांत घालविल्यास बिलकूल वावगें नाहीं. त्यांनीं सुखानें व आपल्या राज्याचें काम आपल्या पुतण्याचे माथीं मारून, कृतकर्मांचा पश्चात्ताप करण्याकरितां प्रयाग किंवा ब्रह्मावर्त अगर अन्य एखाद्या तीर्थस्थानीं जाऊन खुशाल रहावें व जो आजपर्यंत स्वतःच्या कारकिर्दींत जुलूमाचा झेंडा लावून हजारों लोकांचें नुकसान केलें व छल केला त्या पापाच्या क्षालनार्थ दानधर्म वगैरे करण्याचा क्रम ठेवून आणखी दुसरे जे शास्त्र संमत उपाय कांहीं असतील तेही करीत रहावें. असें करण्यापासून थोडें बहुत तरी, अंतःकाळीं लोकांचें अंतःकरण द्रवलें जाईल व बरें झालें, एकदांची पिडा गेली, असे शब्दही कोणाच्या तोंडून निघावयाचे नाहींत बाकी राजगादीवर राहून अधिकाराच्या जोरावर निमकहराम शब्दांसारख्या हजारों शब्दांनीं युक्त असे शेंकडों जाहिरनामे जरी प्रसिद्ध केले आणि धुतल्या तांदुळांसारखे आपण निर्दोषी आहोंत ह्मणून डुग्गी पिटविली तरी महाराजांचें उजळ तोंड, निष्कलंक वर्तन, सुस्वभाव हीं कधींही होणार नाहींत. उलट पुढें न येणाऱ्या गोष्टी प्रसिद्धपणानें जगापुढें मांडण्यास मात्र कारण होणार आहे. आमचें पत्र लहान पडलें त्यामुळें अगदीं थोडक्यांत असें महाराजांचें जुलूमी प्रदर्शन आह्मीं मांडीत असतों. त्यांच्या अत्यंत जुलूमाचे मासले अजून पुढेंच यावयाचे आहेत. ज्या वेळीं बळवंतराव शिंत्रे यांच्यावर खुद्द महाराजांनीं वृथा पाखडलेली आग वाचकांपुढें आह्मीं मांडूं त्यावेळीं प्रत्येक व्यक्तीच्या तोंडून या शिवाजीराव महाराजांची, संभाजी छत्रपती सारखी विटंबना करून त्यांस इहलोकच्या जंजालांतून मुक्त करावें असेच खास उद्गार निघणार आहेत. पूर्वकालीं अपराध्याला हत्तीच्या पायांला बांधून जशी त्याची चंपी करून सोडीत असत, तद्वत् महापराधी जे आमचे हल्लींचे श्रीमंत होळकर महाराज यांची चंपी होईल

तर त्यांच्या राष्ट्रापैकीं निदान एकासही दुःख होईल असें आह्मांस तर वाटत नाहीं. ईश इच्छेप्रमाणें सर्व कांहीं होणार आहे.

आजच्या इस्तिहारांत महाराजांनीं आपल्या बहुतेक कामगारांस निमकहराम ह्मणून सोडले आहेत; परंतु त्या नामावळींत कित्येकांचीं नांवें आलेलीं दिसत नाहींत. तेव्हां त्यांचा महाराजांना विसर पडला ह्मणावा किंवा ते महाराजांच्या मर्जीप्रमाणें व समजुतीप्रमाणें इमानें इतबारें नोकरी करणारे असून जी हुजूर ह्मणणारे कुलकुलते आहेत तें कळणें अवश्य होतें. ते कामगार तर प्रसिद्ध आणि मुख्य कामवाल्यांपैकींच आहेत ह्मणून लोकांच्या माहितीकरितां आह्मी त्यांचीं नांवें येथें सादर करतों.

१ केशवराव धोंडदेव, जिल्हा जज्ज.

२ नाथूराम भैरजी, सिटी माजिस्त्रेट.

३ आर. नरसिंगराव, सेकंड जज्ज सदरकोर्ट.

४ निळकंठराव रानडे, स्पेशल माजिस्त्रेट.

५ गुलाबचंदजी कावराजी.

या पंचकडी संबंधानें जातां जातां महाराजांनीं आपला शेरा काय तो पुढील जाहिरनाम्यांत तरी ठोकून देण्यास न चुकावें एवढी प्रार्थना आहे.

जाहिरनामा पाहून महाराजांस शिव्या देण्यापलिकडे भाटच्यांस कांहीं सुचलें नाहीं. खरें पहातां या जाहिरनाम्यानें ऐतिहासिकदृष्ट्या पुष्कळ गोष्टी कळून येण्यासारख्या आहेत. पहिल्या पॅरॅग्राफांत श्री. शिवाजीराव महाराजांच्या मनांत रियाषत, कामगार वगैरे कोणा विषयींच दुजाभाव नाहीं असें साफ आहे. इतकेंच नव्हे तर कामदारांची सुद्धां बदनामी ते चाहत नाहींत असें त्यांत साफ आहे. परंतु जेव्हां वर्तमान पत्रांतून महाराजांच्या विरुद्ध खोटे नाटे लेख आले आणि ते लेख असे आले कीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध कामदारांशीं पोंचत होता अथवा त्या हकीकतींच्या खोटेपणाबद्दल कामदारांनीं परिस्फुटता केली पाहिजे होती, तीजविषयीं कोणी कांहीं विचार केला नाहीं, आणि ते लोक गप बसले तेव्हां त्या कामदारांचे मौन्य, वर्तमानपत्रांतील वाष्फळ गोष्टींस अनुमोदन आहे असें लोक मानतील, यामुळें राज्यांत खाण्यास इतके लोक असतां व वर्तमानपत्रांचे कांहीं कांहीं लेख कामदारांपैकीं कित्येकांच्या कर्तव्य संबंधांत व्यक्तिनिष्ट येत असतां, ते स्वतःचें वर्तन निर्दोषी ठरविण्यास तयार होत नाहींत, असें जेव्हां ठरत चाललें तेव्हां हा जाहिरनामा पुढें आला, असें या जाहिरनाम्यावरून सहज दिसतें. लक्षावधी रुपये खाणारे कामगार लोकांपैकीं एकानेंही अशा खोट्या लेखासंबंधानें

परिस्फुटता करून, खरी बाजू पुढें आणली नाहीं तेव्हां श्री. शिवाजीराव महाराजांनीं स्वत: असा जाहिरनामा पुढें आणिला असता तरी योग्यच होतें. हजारों ताबेदार असतां त्यांच्या वाईटपणाची जबाबदारी जेव्हां एकट्या यजमानावर येऊन पडते त्यावेळच्या त्यांच्या स्थितीची कल्पना करून, महाराजां तर्फे हा जाहिरनामा बाहेर आला असें पाहिलें ह्मणजे महाराजांच्या कामदारांची राज्यभक्ति निराळ्या स्वरूपाची दिसल्यावांचून राहत नाहीं. कामदार लोकांस त्यांची कर्तव्यता बजावण्यास चांगली संधी दिल्यानंतर हा जाहिरनामा प्रसिद्ध झाला आहे, आणि तो महाराजांच्या हुकुमानें झाला आहे असें मानून चाललों ह्मणजे तर त्यांतील हकीकतीचा विचार करण्याचा इतरांस हक्क पोंचत नाहीं. त्यांत ज्यांचा ज्यांचा संबंध आहे ते महाराजांच्या पदरचे सरदार व कामदार आहेत व त्यांची स्थिति महाराजांस जी कळली ती त्यांनीं प्रसिद्ध केली, यांत त्यांचा हेतु त्यांना यथायोग्य शासन करण्यापेक्षां त्यांना सुधारण्याचा होय असें मानतां येतें. तसें नसतें तर श्री. शिवाजीराव महाराजांनीं त्यांस शासनेंच केलीं असतीं. या जाहिरनाम्यांत कामदारांनीं पक्षाभिमान वाढवूं नये आणि राजांच्या, विशेषत: रियासतीच्या कल्याणाविषयीं जागृत राहवें, निदान स्वामिभक्तीस जागृत राहवें, असा उपदेश घेण्यास पुष्कळ जागा आहे. हिंदुस्थानांत फाजील विचार स्वातंत्र्यानें स्वामिभक्तीची राखरांगोळी केली आहे; आणि यामुळें स्वपणा राहिलाच नाहीं ह्मटलें तरी चालेल. भाटचे वाटेल तसे व्यक्तिनिष्ट लेख लिहितात आणि त्यांविषयीं उल्लेख करण्यास जागा असतां महाराजांच्या नोकरांतून कोणी तयार होत नाहीं, यावरून महाराजांच्या नोकरांची स्वामिभक्ति व स्वपणा कोठल्या प्रकारचा आहे तो चांगला दिसून येतो. यजमान लहान असोत किंवा तरुण असोत, त्यांचा अपमान करणाऱ्याचा योग्य मार्गे समाचार घेणारे स्वामिभक्त नोकर निघाले पाहिजेत. यजमानांच्या सुखदु:खाबरोबर आपलें सुखदु:ख आहे; यासाठीं त्यांच्याविषयीं पूज्यबुद्धि मनांत राहिलीच पाहिजे. यजमानांच्या कृतीचें गुणदोष पाहून स्वामिभक्ती दाखविणें हा गौण पक्ष होय. कामदारांची जी स्थिति जाहिरनाम्यांत वर्णिली आहे, ती ठरविण्यांत जरी श्री. शिवाजी महाराजांची चुक झाली असेल तरी त्यांनीं स्वत:स वाटणारी गोष्ट लपवून न ठेवतां प्रसिद्ध केली, यामुळें आपल्या स्वामींचा उद्देश समजून वागण्यास व आपापलें वर्तन अधिक चांगलें ठेवण्यास पुष्कळ जागा झाली; आणि अशा रीतीनें महाराजांनीं स्वत:चे मत प्रगट केलें यावरून भाटचे यांनीं मुळे यांच्या स्वभावाची स्तुति करण्यांत "त्यांचें खरें कोणतें व खोटें कोणतें हें समजणें कठीण आहे" वगैरे ह्मटलें आहे, त्याप्रमाणें लपवालपवीचा प्रकार महाराजांस आवडत नाहीं; परंतु ते खरे असून सत्यप्रीय आहेत

असें सिद्ध होतें. जाहिरनाम्यांत ४ थ्या पॅरॅग्राफांत शेवट शेवट हिंदुस्थानांतील रियापती कां गेल्या याचें कारण, मोठ्या मुद्देसूद रीतीनें दाखविलें आहे. आणि राहिलेल्या रियापती कायम राहून त्यांचे हक्क कायम राहवेत असा त्यांत उल्लेख आहे, आणि नोकर लोकांस मालकांचें व राज्याचें हित आहे अशा कामीं दक्ष राहण्यास प्रार्थना सुद्धां केली आहे. राजाला आपले कामगार चांगले राहण्यास प्रार्थना करण्यापुरती वेळ यावी हें त्या कामगारांसच लांछन होय. या प्रार्थना शब्दानें महाराजांच्या मनांत, कामदारांच्या घोटाळ्यामुळें किती वाईट वाटत असेल त्याची कल्पना करतां येईल. महाराजांच्या तर्फे प्रार्थनाकरून घेण्याचें ज्या कामदारांस वाटत असेल ते बेशक राजद्रोही असले पाहिजेत. आलमगीर बादशाहानें मुशाफरींत आपल्या मुलांस ठिकठिकाणाहून पत्रें लिहिलीं आहेत; त्यांचें रुक्केआत् आलमगीरी नांवाचें फारशींत एक पुस्तक आहे; त्यांतील उपदेशांपेक्षां या जाहिरनाम्यांतील उपदेशांच्या गोष्टी प्रत्येक मनुष्यानें, आपल्या हृदयपटावर कोरून ठेवण्यासारख्या आहेत. जाहिरनाम्यांत कामदार मडळींचीं नांवें आहेत तरी त्यांच्या व्यक्तिनिष्ट गोष्टींचा किंवा वर्तनांचा मुळींच विचार न करतां, राज्याच्या संबंधानें त्यांच्या वर्तनाचा उल्लेख केला आहे; आणि राजभक्त राहण्यास व आपापसांतील प्रक्षाभिमान " पार्टी फीलिंग्स्" मोडण्यास व रयतेस न्याय देण्यास उपदेश केला आहे; आणि असें चांगलें वर्तन न ठेविलें तर त्यांचें नुकसान करण्यापेक्षां श्री. शिवाजीराव महाराज स्वत: ईश्वरनामस्मरण करण्यास तयार होण्याची इच्छा दर्शवितात; व ती दर्शविण्याचें कारण प्रजेची सेवा व्हावी तशी कामदारांच्या आपमतलबी व भानगडी स्वभावामुळें होत नाहीं हें दाखविलें आहे.

या एकंदर जाहिरातींत महाराजांनीं स्वत:च्या नोकरांविषयीं आपलें बरें किंवा वाईट जें मत झालें तें त्यांनीं सुधारावें ह्मणून दर्शविलें आहे; आणि प्रजेस सुखी ठेवावें व रियापतीची बदनामी होऊं देऊं नये ह्मणून उपदेश केला आहे. यांत कोठला भाग वाईट आहे हें भाटचे यांस दाखविण्यास जागा सांपडली नाहीं, ह्मणून या जाहिरनाम्यासंबंधानें त्यांनीं नुसत्या शिव्या दिल्या आहेत. जाहिरनाम्यावर टिका करण्यांत बळवंतराव शिंत्रे यांच्यावर महाराजांनीं वृथा आग पाखडली ती वांचकापुढें मांडण्याचें ते अभिवचन देतात; परंतु बळवंतराव शिंत्रे यांची माहिती आह्मी सुद्धां भाटचे यानीं दिल्यावर देणार आहोंत. जाहिरनाम्यांत पांच कामदारांची नांवें आलीं नाहींत असें भाटचे ह्मणतात. परंतु ज्यांचीं नांवें जाहिरनाम्यांत आलीं तितकेच काय ते इंदूर राज्यांत कामदार आहेत असें मुळींच नाहीं. पहा भाटचे यानां इंदूर संस्थानची किती माहिती आहे ! आणि याच माहितीवर ते इंदूर संस्थान लिहितात!!

पृष्ठ ४७ यांत महाराजांनीं मतकर नांवाचे गृहस्थांस हातोदचे अमीन नेमले. या नेमणुकीस रा. ब. बेदरकर प्रतिकूल होते. हा मजकूर आहे. कारभाऱ्यांच्या अधिकारापेक्षां महाराजांचे अधिकार श्रेष्ठ आहेतच. मग यांत भाटचे यांस विपरीत काय वाटलें ? पृष्ठ ४८ यांत म्युनिसिपालिटीचा व कापड जामदारखान्याचा ९ वर्षांचा खर्च महाराजांनीं तपासला व ज्या सालीं कमी खर्च झाला त्या सालाप्रमाणें ९ वर्षांचा हिशेब धरून रुपये १००७२९॥।≈॥ म्युनिसिपालिटीच्या लोकांकडून व तशीच कांहीं रकम कापड जामदारखान्याच्या लोकांकडून घेण्याचा महाराजांनीं हुकूम दिला असा मजकूर लिहिला आहे. परंतु ही गोष्ट खरी असेल तरी ती केवळ डिपार्टमेंटल् आहे. भाटचांचे मतें महाराजांनीं कामदारांच्या ओंजळीनें पाणी प्यावें व त्यांचा वाटेल तसा खर्च महाराजांनीं मंजूर करावा. परंतु असें कसें घडावें ? खरें पहातां हिशेब देणें हें नोकरांचें काम आहे व तो तपासून घेणें यजमानांचें काम आहे. आणि ज्या अर्थीं स्वतः भाटचे ह्मणतात कीं " हिशेब धरून महाराजांनीं ठरविलें " त्या अर्थीं यांत महाराजांच्याविरुद्ध लेख लिहिण्यास, सामाजिक हित पहाणाऱ्यांस तर काय परंतु भाटचांस सुद्धां मुळींच जागा नाहीं. त्या लोकांवर महाराजांची आज्ञा खटला करण्याची आहे, असें जर भाटचे ह्मणतात तर खटला करण्यांत, पक्षकारांस स्वतःची बाजू खरी ठरविण्याचे मार्ग मोकळे ठेविले आहेत. पृष्ठ ४८ व ४९ यांत—कोठीकडील काळूराम ब्राह्मण, मिसरजी व नंदराम या तिघांनीं बदाम, पिस्ते, साखर, तूप वगैरे चोरलें असा आरोप त्यांच्यावर ठेवून त्यांच्यावर खटला करून त्यांस शिक्षा करण्यास महाराजांनीं आज्ञा केली. सिटी माजिस्ट्रेट साहेबांनीं त्यांच्या पायांत बिड्या घातल्या परंतु ते त्यांनां दाहा वर्षांची शिक्षा महाराजांच्या हुकुमाप्रमाणें देऊं शकत नाहींत आणि त्यामुळें त्यांची बदली होण्याचें घाटत आहे. कोठींतील लोक अगदीं निरपराधी असल्याचें समजतें. कदाचित् अपराधी असले तरी अशा क्षुल्लक मनुष्यांकरितां त्यांना इतका त्रास काय ह्मणून ? ही हकीकत देऊन महाराजांच्या तर्फे लेख लिहिणाऱ्यांस भाटचांनीं शिव्या हांसडल्या आहेत. आतां पहा कीं जर चोरांस शिक्षा करण्यास महाराजांनीं अपराध्यांस माजिस्ट्रेटाकडेस पाठविलें तर त्यांत वावगें काय झालें ? भाटचानीं लिहिलेल्या हकीकतीचा विचार केला ह्मणजे महाराजांची इच्छा निरापराध्यांस शिक्षा करण्याची नाहीं आणि महाराजांचे अंमलदारसुद्धां तसें करीत नाहींत हेंच सिद्ध होतें.

पृष्ठ ४९ यांत—महाराजांनीं तोंडीं हुकूम देण्याची युक्ति काढली कारण

लेखी हुकूम बाहेर पडतात आणि आपली बदनामी होते असें महाराजांस वाटतें. असा बायफळ व बनाऊ मजकूर भाटचे यानीं लिहिला आहे. परंतु अशी कल्पना करण्यास भाटचे यांच्याजवळ एखादाही आधार असता तर तो त्यानीं दाखविला असता. कल्पना करून एखाद्यास दोष देण्यास त्याचे सद्गुणसुद्धां दुर्गुण दाखवितां येतात व असें करणें दुर्गुणी मनुष्याचें काम आहे. राजे लोक सर्वच लेखी हुकूम देतात असे नाहीं. त्यांच्या लेखी व तोंडच्या हुकुमाचें महत्व सारखेंच आहे आणि जें महत्व हुकुमानें " by order " ह्मणून लेख लिहिण्यांत सुधारलेल्या राष्ट्रांत आहे, तितकेंच महत्व जबानी हुकुमाचें आहे. भाटचे ह्मणतात कीं लेखी हुकूम बाहेर फुटतात त्यांत महाराजांची बदनामी होते व त्या गोष्टीची महाराजांस भिति वाटूं लागली. परंतु महाराजांस स्वतः दिलेल्या हुकुमाबद्दल भीति बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. मात्र राज्याची बदनामी करूं नये इतकें तत्व लक्षांत घेऊन खोटे लेख लिहिण्याची भाटचे यांस लाज वाटूं लागली ह्मणजे मग राजे लोकांचे लेखी आणि जबानी हुकुमाचें महत्व प्रजा रक्षणांत सारखेंच आहे आणि जबानी हुकूम देण्याची वहिवाट महाराजांनीं नवीन काढली नाहीं हें सुद्धां त्यांना कळेल.

पृष्ठ ४९ व ५० यांत–कृष्णराव नांवच्या इन्स्पेक्टरचें नाक, कान कापण्यास महाराजांनीं हुकूम दिला होता. परंतु तें कापलें नाहीं. परंतु त्याची तनखाच बंद केली. असें लिहिलें आहे. हा मजकूर पहातां महाराजांनीं त्याचें नाक, कान कापण्यास हुकूम दिला होता हें मुळींच खोटें असलें पाहिजे. कारण इंदूर संस्थान ह्मणून खोटे लेख लिहिण्याचे भाटचे यानीं जे प्रयत्न चालविले आहेत त्यां पैकीं एकही जुलुमाची कृती महाराजांच्या हातून अगर मतानें झाली असती तर मग महाराजांस त्या इन्स्पेक्टराचें नाक, कान कापण्यास काय भीति होती ? महाराजांचा जो स्वभाव भाटचे यानीं खो-डसाळपणें दिला आहे त्या स्वभावाला हें कृत्य अगदीं सोपें होतें. शिवाय जेथें जेथें महाराज जातात, बसतात तेथें तेथें भाटचे यांचा बातमीदार असतो हें केवळ अशक्य आणि असंभवनीत आहे. भाटचेच ह्मणतात कीं कोणी नवीन मनुष्य वाड्याच्या जवळून जाण्यास धजत नाहीं व गेल्यास त्यास मार पडतो. मग अशा स्थितींत त्यांचा बातमीदार विचारा कोठल्या धारिष्टानें इन्स्पेक्टराचें नाक, कान पाहण्यास तेथें जाऊं शकला ! महाराजांस जर एखाद्याचें नाक, कान कापावयाचें आहे तर अशा रीतीनें जगासमोर ते कापवतील नरी काय? आणि कापावयाचा हुकूम केला असतां महाराजांच्या जवळच्य मनुष्याचें जें वर्णन भाटचे यानीं बनाऊ केलें, ते लोक तसेच असते तर तो हुकूम तात्काल अमलांत कां आला नसता ? आतां महाराजांनीं कृष्णराव याचें नाक, कान कापण्याचें ह्म-

टलें असून तसें कृत्य झालें नाहीं ही गोष्ट खरी समजून विचार करूं. त्रासाच्या योगें आईकडून "कारटा मेला तर पत्करला, त्याचें काळें कां होईना" वगैरे शिव्या पोटच्या गोळ्यास मिळतात ह्मणून ती आपल्या मुलास मारून टाकण्यास तयार असते कां? अथवा "त्याचें तोंड काळें करा" ह्मणजे त्याच्या तोंडाला खरेंच काजळ लावाव-याचें काय? त्याचप्रमाणें कृष्णरावांच्या अपराधाबद्दल महाराजांनीं त्याचें नाक कान कापा ह्मटलें असलें ह्मणून त्यांनीं तसेंच करण्याचा हुकूम दिला असें होतें काय? आणि त्यांच्या मनांत त्याचें नाक कान कापावयाचे होते असें तरी होईल काय? स्थितीपरत्वें जे उद्गार निघतात त्याचा अर्थ अक्षरशः केला तर किती विपरीत होईल? भाटच्ये यांनीं स्वतःच्या मराठी भाषेचा व खरें पहातां खोडसाळपणाचा उपयोग महा-राजांविषयीं लोकांचीं मनें बिघडवण्यास केला आहे. भाटच्ये यांना त्यांच्या आई बापानीं त्यांच्या अर्थशास्त्राप्रमाणें लहानपणींच त्रासाच्या योगें जे जे उद्गार काढले असतील, त्याप्रमाणें खरेंच मारले असते अथवा निदान त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें भाटच्ये दगड झाले असते तर दगडाचें उपयोग विशेषत्व दाखविण्यास, जो मराठी ह्मण यो-जली जाते त्या अर्थाप्रमाणें जगाला भाटच्याचा उपयोग घडता. अजून तरी भाटच्ये यानीं अर्थ करतांना स्थितीकडे फार लक्ष द्यावें. व नंतर स्वतःच्या अर्थशास्त्राची ऐट दाखवावी. "यावें" याचा अर्थ करतांना, येतांना किंवा जातांना "यावें" ह्मटलें आहे तें समजून त्याचा अर्थ करावा. हेतु रहीत पुष्कळ उद्गार असतात व त्याचें महत्व त्यावेळेस मनाची जी स्थिति असत ती दर्शविण्यापलिकडे मोजलें जात नाहीं. "तुझ्यासाठीं हा प्राण तयार आहे" असें जर भाटच्यास एखाद्या भल्या मनुष्यानें ह्मटलें तर भाटच्ये स्वतःच्या ज्ञानास व सौजन्यास अनुसरून लगेच त्याचा प्राणच घेण्यास तयार व्हावयाचे. श्री. शिवाजी महाराजांस दोष देण्याच्या प्रयत्नांत भाटच्ये स्वतःच्या नीचपणाचें प्रदर्शन करितात यांत बिलकूल संशय नाहीं इतकेंच नव्हे तर भाटच्यांच्या अशा कृतीमुळें "वाघ्याचा झाला पाग्या तरीपण एळकोट जाईना" या ह्मणीप्रमाणें भाटच्ये हे ज्या मंडळींत स्वतः वाढले, त्या मंडळीचा व शिक्षणाचा बाजार लोकांपुढें उघडतात. भाटच्ये सुधारणार नाहींत असें ज्या चांगल्या वर्तमानपत्रांनीं व विद्वान् गृहस्थांनीं खात्रीनें ठरविलें आहे तें आह्मीं विसरलों नाहीं. परंतु सिंहास त्रास देण्यासाठीं भोंकणारा गर्दभ अश्वपंक्तींत न आला तरीपण खेंचराच्या वर्गांत आला तरी त्याला कांहीं किंमत येईल अशा आशेनें व कळकळीनें आह्मीं प्रयत्न करीत आहोंत. पुढें भाटच्यांचें नशीब!

पृष्ठ ९० ते ९४ यांत रावसाहेब धोंडो शामराव गरूड यांच्या इजाऱ्याची

हकीकत आहे. परंतु रा. सा. धोंडो शामरावाचें नुकसान झालें असल्यास त्यांन महाराजांकडेस दाद मागता येते. भाटच्याच्या शिफारसीची जरूर नाहीं. शिवाय महाराजांशीं गरूड साहेबांचा संबंध असा आहे कीं त्यामुळें रावसाहेब धोंडो शामराव यांचें नुकसान महाराजांनीं केलें, असें ह्मणण्यास भाटचे यांस आधार सांपडण्या इतकी श्रीमंती रावसाहेब गरूड यांस महाराजांच्या कृपेनेंच जाह्ली आहे. जोंपावेतों पक्षकार स्वतःआपल्या नुकसानी बद्दल उद्गार काढीत नाहीं तोंपावेतों इतरांस ती वांटाघाट करण्याची जरूर नाहीं. त्यांतून रावसाहेब गरूड यांची कळकळ वाहण्या इतकी शक्ति भाटच्यांच्या अंगीं कोठून असणार? रा. सा. गरूड यांच्या इजाऱ्याचा लेख लिहिण्यांत त्यांचें हित आहे असें मुळींच नसून, महाराजाविषयीं खोटे लेख लिहिण्याची भाटच्याची दुष्टता मात्र दिसून येते. या लेखांत सामाजिक हित नाहीं व दीनाचा कैवारही नाहीं; करितां यापेक्षां विशेष स्पष्टीकरणाचें कारण नाहीं.

पृष्ठ ९४ तें ९६ यांत सांवेरचे गणपतीबुवा यांचा इजारे गांव खालसा केला गेला अशी हकीकत आहे. रा. सा. गरूडाचे संबंधानें आह्मीं जें लिहिलें आहे. तेंच यांच्या संबंधांत लागूं पडतें ह्मणून यावर निराळी टिका करीत नाहीं.

पृष्ठ ९६ तें ९४ यांत सखाराम गणेश शिरसाळकर नांवाच्या मनुष्याची हकीकत आहे.

यांत शिरसाळकर नांवाच्या मनुष्याचें चरित्र दिलें आहे. शिरसाळकर वकील होता, हुषार होता व निस्पृह होता, ह्मणून त्याची तारीफ केली आहे. हा मजकूर स्वतः भाटच्यांचा नाहीं. तो त्यांच्याकडेस कोठून तरी लिहून आलेला आहे. यांत सामाजिक हिताचा एक शब्दही नाहीं. आणि त्यांतील गोष्टी जरी घडल्या असतील तरी त्या स्वतःशिरसाळकरावांचून इतरांस माहीत असण्याचा संभव नाहीं. ह्मणून हा लेख विक्षिप्तात खुद्द शिरसाळकरांनीं स्वतःचा कलंक वालविण्यास लिहिला असावा असें खास होत आहे. कारण ज्या गोष्टी घडल्या त्यांत शिरसाळकराचे असे विचार होते, नसा हेतू होता वगैरे लिहिलें आहे, हें इतरांस लिहितां यावयाचें नाहीं. हा लेख व्यक्तिनिष्ट असल्यानें व भाटच्याप्रमाणें पुस्तक मोठें करण्याचा आमचा मानस नसल्यानें, त्याचा उतारा घेण्याचें प्रयोजन आह्मास दिसत नाहीं. ज्यांनीं तो लेख वाचला असेल त्यांस, त्याच विस्ताराच्या लेखांत शिरसाळकराची आज्ञाभंगता, स्वतःच्या शहाणपणाचा गर्व, राजद्वारीं वागण्याचें अज्ञान वगैरे त्यांचें दुर्गुण कळून येतील. इतकेंच नव्हे तर कांहीं कांहीं कामांत शिरसाळकरानें महाराजांस कळविण्याच्या गोष्टी स्वत च मध्यें दाबल्या आहेत व बदलल्या आहेत असें सिद्ध होतें; आणि शिर-

साळकर जर इंग्रजी राज्यांत तशा प्रकारें वागते तर त्यांना बिनभाड्याचें घर राहण्यास मिळाल्यावांचून राहतें ना.

पृष्ठ ९४ यांत-दोन वर्षां पूर्वी ह्मणजे इसवी सन १८९३ च्या सालांत एका स्वारानें इंदुराहून सिवनीस जातांना मार्गांत एका शेतकऱ्याच्या तरूण स्त्रीवर बलात्कार केल्याचें लिहिलें आहे; परंतु त्या स्वाराचें व शेतकऱ्याचें नांव भाटचे यास लिहितां आलें नाहीं; आणि गोष्ट सुद्धां कशी जुनी ह्मणून बनाऊ लिहिली आहे, असें मानलें कीं एखाद्या स्वारानें ही गोष्ट केली तर त्यांत महाराजांकडेस काय शब्द येतो ! शेतकऱ्यानें योग्य मार्गे स्वारावर फिर्याद करावयाची होती व दाद मागावयाची होती. भाटचे ह्मणतात कीं त्या शेतकऱ्यांनीं पंचवीस लोक मिळवून सरकारांकडेस अर्ज केला परंतु त्यांना घालवून दिले. खोट्या गोष्टी रचण्यासाठीं त्यांनीं असें लिहिलें तरीपण भाटचे यांना, त्या शेतकऱ्यांस महाराजांनीं फिर्याद करण्याम मनाई केली असें ह्मणतां आलें नाहीं. जे मार्ग फिर्यादीचे ठरले आहेत त्या मार्गे फिर्याद झाली पाहिजे. या वृत्तांतांत भाटचे यांस दोन वर्षांची गोष्ट ह्मणून मोघम लिहिण्याची जी प्रवृत्ति झाली त्यावरून त्यांच्या तर्कटी स्वभावाची लोकांस ओळख होईल.

पृष्ठ ९४ तें ९५ यांत पन्नालाल नांवाच्या पाणक्या ब्राह्मणास व रामधन नांवाच्या खासबरदारास शिक्षा दिल्याचें वर्तमान आहे. त्याची हकीकत भाटचे लिहितात ती अशी " ता. २७ आगष्ट १८९४ रोजीं महाराजांनीं पाणी पिण्यास मागितल्यावरून, ब्राह्मणानें पाणी दिलें व महाराज तें पाणी प्यालें तरी पण त्यांची तोंडची कोरड गेली नाहीं ह्मणून त्याला व त्याच्या बरोबरच्या खासबरदारास, त्यांनीं पाण्यांत कांहीं तरी घातलें असेल असें मानलें व त्यांना मिनिस्टरकडून शिक्षा देवविली. " आतां या संबंधांत विचार केला तर राजे लोकांच्या पाण्याचा जो बंदोबस्त व त्या प्रित्यर्थ जो खर्च असतो त्याचा विचार केला ह्मणजे आणि भाटये यांच्या खोटे लेख लिहिण्याच्या कौशल्याची कल्पना केली तर वाईट पाणी महाराजांच्या पिण्यांत आलें असें भाट्यांच्याच लिहिण्यांत " महाराज पाणी प्याले तरी पण तोंडाची कोरड गेली नाहीं " यांत निष्पन्न होतें; आणि या हयगईसाठीं अथवा स्वतःच्या नोकरीविषयीं ठेवण्याची दक्षता मुद्दाम ठेविली नाहीं ह्मणून पाणक्या व खासबरदार यांस शिक्षा झाली असें मानतां येतें. पाणी, खाणें ह्या गोष्टी महाराजांच्या प्राणाशीं संबंध ठेवणाऱ्या आहेत. त्यांत बदल होणें आणि बदल होण्याचें विशेष कारण पाणी आणणाऱ्यांस सांगतां न येणें इतकेंच कोणासही, विशेषतः राजे लोकांस वहीम येण्यास पुरे आहे. आणि अशा वहिमावरूनच सुधारलेल्या राष्ट्रांत वहीम असलेल्या

लोकांस मोठी शिक्षा होते. महाराजांनीं भाटचे यांच्या ह्मणण्याप्रमाणें त्या लोकांस बिड्याची शिक्षा मिनिस्टरकडून देववीली, तेव्हां अर्थातच चौकशी होऊन ती शिक्षा त्या ब्राह्मणास व खासबरदारास दिली गेली. यांत वावगें काय झालें? वहीम हा प्रत्येक मनुष्यास आहे आणि भ्रमनिरसनाच्या १ ल्या भागांत महाराजांच्या गृहक्लेशांस ज्या लोकांनीं सुरवात केली, त्याविषयीं जें विधान आह्मीं मांडलें आहे, त्याचा विचार केला तर खाणें पिणें यांत बदल वाटल्यास महाराजांनीं त्या कामीं खर्च ठेवून राखलेल्या नोकरास शिक्षा देऊं नये, ही कोठल्या मृष्टींतील मनुष्यवृत्ती भाटचे वांचकांस दाखवूं पहातात हें आह्मांस समजत नाहीं. आपल्या खाण्यापिण्याच्या पदार्थांत बदल झाल्याचें आपणास वाटल्याबरोबर आपला जो संताप होतो, तो भाटचे कसे विसरतात ?

पृष्ठ ९५ तें ९६ यांत अशीच एक पाण्याची गोष्ट दिली आहे आणि ती १८८८ इसवींत ह्मणजे विक्षिप्ताच्या जन्माच्या ६ वर्षां पूर्वींची आहे. भाटचे ह्मणतात कीं महाराजांनीं पाणी पिण्यास मागितलें आणि तें मळकट होतें ह्मणून श्रीधर मैराळ नांवाच्या कारकुनास त्याचें कारण विचारलें. त्यानें ह्मटलें कुव्यास कोरड पडली आहे यामुळें पाणी कुव्यांतच मळकट आहे. या बोलण्यानें महाराजांची त्याच्यावर खप्पा मरजी होऊन त्याला ७ महिने कारागृहांत ठेविले आणि इंदूरांतून काढून दिला व त्याचें घर खोदून टाकलें. त्याच पाण्याच्या कामांत पाणी आणणाऱ्या ब्राह्मणास जिन्यावरून खालीं लोटून दिला; व त्याला माजिस्ट्रेट वर्ग २ सिटी इंदूर यांनीं ६ महिने सक्त मजुरीची कैदेची शिक्षा दिली. आतां भाटचे यांनीं हें वृत्त लिहितांना मुद्दाम खोट्या गोष्टी लिहिल्या आहेत त्या ह्या कीं, राजवाड्याच्या जिन्यावरून खालीं लोटून दिलेल्या ब्राह्मणास कैद करून त्याला माजिस्टेटा समोर मुकदम्यासाठीं नेला. परंतु राजवाड्याच्या जिन्यावरून ज्याला खालीं लोटले जाईल तो कितीही सावधगिरीनें खालीं गडबडत आला तरी पण त्याला सक्त इजा झाल्या वांचून राहणार नाहीं आणि त्याला माजिस्ट्रेटाकडेस पाठविण्याच्या अगोदर हॉस्पितळांत ठेविला पाहिजे. यावरून अर्थात त्या ब्राह्मणास जिन्यावरून लोटला नाहीं हेंच खरें ठरतें. खरी गोष्ट अशी आहे कीं महाराज, कर्नल कुवा ह्मणून कुवा आहे त्याचें पाणी पितात; व त्या कुव्याचा योग्य बंदोबस्त ठेवण्याचा खर्च महाराज सोसतात. श्रीधर मैराळ हा पोषागाचा कारकून होता आणि पाण्यासंबंधानें देखरेखीचें काम त्याचेंही होतें. कुव्यास जर कोरड पडली होती आणि त्यांतलें पाणी मळकट झालेलें होतें आणि याची माहिती या कारकुनास होती. पाणी मळकट होतें हें

स्वत: भाटचेच कबूल करितात, तर तसें पाणी महाराजांस देण्याच्यापूर्वी कारकुनानें आणि ब्राह्मणानें त्याविषयीं त्यांना असलेली माहिती कां कळविली नाहीं ? महाराजांनीं तें पाणी कांचेच्या ग्लासांत घेतलें नसतें तर या कारकुनानें आणि ब्राह्मणानें तसेंच मळकट पाणी महाराजांस पिण्यास दिलें होतेंच; आणि विशेष हें कीं त्या लोकांस कुण्याचें पाणी बिघडल्याचें महाराजांस पाणी देण्याचें अगोदर माहीत होतें. इतकेंच नव्हें तर महाराजांनीं स्वत: होऊन पाणी मळकट आहे असें पहाण्यापूर्वीं या दोघांनीं त्यांना तसेंच पाणी पाजलें आहे हें ही भाटचांच्याच लेखांत, जरी तो लेख श्रीधर भैराळ आणि पाणक्या ब्राह्मण यांच्यातर्फेचा व महाराजांस दोष देण्याच्या इराद्यानें लिहिला आहे, तरी त्यांतच उघड होत आहे. या सर्व गोष्टींवरून भाटचेसारख्या राजद्रोही मनुष्यानें स्वतःच्या दुष्ट बुद्धीनें लिहिलेल्या लेखांत जर अपराध्यांचा अपराध इतका मोठा दिसतो, तर वास्तविक तो अपराध घडला तेव्हां त्याचें स्वरूप कोठल्या विलक्षण प्रकारचें असेल याची वाचक कल्पना करूं शकतील. अपराध नसतां शिक्षा दिली असें यांत होत नाहीं. अपराध्यावर खटला होऊन शिक्षा झाली असें भाटचे ह्मणतात; आणि ती शिक्षा जास्त होती तर अपराध्यांस अपिलाचे मार्ग मोकळे होते. या अपराध्यांस अमुक शिक्षा करावी असें महाराजांनीं फर्माविल्याचें भाटचे लिहूं शकत नाहींत; आणि त्याचप्रमाणें ज्याच्यावर अपील नाहीं अशा कोर्टांत त्या अपराध्यांस पाठविलेंहा नाहीं. जर महाराजांस त्या लोकांना त्रास द्यावयाचा होता तर पाण्याची सुद्धां सबब कशाला पाहिजे होती? उभयतां अपराधी महाराजांचे खासगत नोकर होते आणि त्यांच्यावर शेंकडों कामाची जबाबदारी होती, त्यांतच त्यांना शिक्षा दिली असती. शिक्षा करण्यासाठीं पाणी मळकट आहे असें दिसून येई पावेतों वाट पहाण्याची जरूरी नव्हती. या पाण्याच्या गोष्टींत एक आणखी विचार करण्यासारखा मुद्दा आहे तो हा कीं, महाराजांनीं नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें सोन्याच्या प्याल्यांत पाणी न घेतां तें कांचेच्या ग्लासांत घेतलें त्यावरून वाचकांस असा तर्क करतां येईल कीं, त्यापूर्वीं महाराजांच्या पिण्याच्या पाण्यांत त्यांना बदल झालेला वाटला असावा, आणि ह्मणून त्यांनीं स्वत:ची खात्री करून घेण्यासच पाणी कांचेच्या ग्लासांत घेतलें. राजे लोकांच्या खाण्यापिण्याच्या पदार्थांत फरक झाल्याबरोबर त्या कामासाठीं ठेवलेल्या नोकर लोकांस सुधारलेल्या देशांतसुद्धां किती कडक शिक्षा होते याची कल्पना करतां येण्यास इतिहास बस आहेत, हें आह्मीं वर सुद्धा सांगितलें आहे. श्रीधर भैराळ यांचें घर या पाण्याच्या संबंधांत खोदलें गेलें नाहीं हें भाटचांच्याच लेखांत निघत आहे. तें पान ९१

च्या दुसऱ्या कॉलम मधील २४ ते ३० पावेतोंच्या ओळींत ते ह्मणतात "तेव्हां त्यास कैद करून ७ महिनेपावेतों कारागृहांत पाठवून दिला. पुढें त्यांस इंदुरांतून काढून दिला. शिवाय त्याचें १० हजार रुपयाचें वडिलोपार्जीत घर होतें तें एका रात्रींत अगदीं खोदून टाकलें" अर्थात भाटच्याच्या ह्मणण्याप्रमाणें श्रीधर मैराळचें घर खोदलें गेलें असेल तरी तें पाण्याचा मुकदमा झाल्यावर ७ महिन्यानंतर खोदलें गेलें असें होतें. अपराधास शिक्षा कमी किंवा जास्त हा प्रकार देश परत्वें असतो. त्याविषयीं येथें विचार करण्याची जरूर नाहीं. भाटचे यांच्या लेखांचा झोंक कोणाचा कांहीं अपराध नसतां महाराज त्याला शिक्षा देतात असा आहे; त्याचा विचार येथें केला आहे. भाटच्याच्या लिहिण्यांत आणखी असें आहे कीं, ह्या पाणक्या ब्राह्मणास माजिस्त्रेट वर्ग २ यांनीं दिलेली शिक्षा जास्त आहे आणि रीतीची नाहीं, असें त्या वेळचे मिनिस्टर रावबहादूर कितने यांस कळल्यावर त्यांनीं महाराजांस त्याविषयीं कळविलें, व दुसरे दिवशीं महाराजांकडेस त्याला सोडण्याचा निरोप पाठविला, व महाराजांनीं त्याला सोडून दिलें. या लेखावरून तर महाराजांनीं त्या ब्राह्मणास झालेली शिक्षा कमी केली, आणि ब्राह्मणानें जर माजिस्त्रेटच्या ठरावावर अपील केलें असतें तर त्याला कांहींच प्रतिबंध नव्हता, ही गोष्ट उघड होत आहे. महाराजांच्या मनांत जुलूम करावयाचा असता, अथवा त्यांच्या स्वभावांत जुलमीपणाची छाया असती, तर मग मिनिस्टरच्या निरोपास आणि त्यांतून अशा क्षुल्लक कामांत त्यांना भिण्याचें कांहीं कारण नव्हतें. कडक स्वभाव खरा असतो, आणि कडक स्वभाव जुलमी नसतो. जुलूम करण्यास कारण लागत नाहीं, आणि कडक स्वभावास थोडकीशी गोष्टसुद्धां सहन होत नाहीं, हा केवढा मोठा भेद आहे. खोटें बिलकूल सहन होत नाहीं असा यजमान मिळणें किती मोठें भाग्य समजावयाचें; आणि असा खरा यजमान मिळाला असतां, व त्याचा खरेपणाचा कडक स्वभाव माहीत असतां, नोकरांनीं लपंडाव खेळावे काय ? श्रीधर मैराळ व पाणक्या ब्राह्मण यांची वाटेल तशीं बनावटी उदाहरणें दिलीं तरी पण भाटचे हे लबाडच ठरले आहेत.

पृष्ठ ९७ यांत सोलापुरचे 'कल्पतरू,' 'बडोदा वत्सलां'तील 'प्र,' व मुंबईतील एक साप्ताहिक वर्तमानपत्र या सर्वांस भाटचानें शिव्या दिल्या आहेत. आणि कोणीही इंदूर संस्थान अथवा होळकर महाराज यांच्या संबंधानें विक्षिप्तांतील नंबरवारी मजकूर मुद्देसूद रीतीनें खोडून काढल्याशिवाय एक अक्षरही बोलूं नये, असें भाटचे लिहितात; व स्वतःचें लिहिणें कोणासही खोडतां येत नाहीं ह्मणून ते अभिमान वाहतात. परंतु दोन्ही पक्ष पुढें आल्यानें यावर वाचक विचार करूं शकतील.

पृष्ठ ९८ यांत "असें कळतें" या जोरावर महाराजांनीं इंदुरांतून कोठें तरी हवा बदलण्यास जावें असें हिंदुस्थान सरकाराकडून शिफारस झाल्याचें लिहिलें आहे. परंतु भाटचे यानें त्या शिफारशीचा नंबर तारीख मुळींच दाखविली नाहीं.

पृष्ठ ९९ व १०० यांत बक्षिस अळि, सफरीभैया, नंद्या तेली, ओमकार अहीर, व गोपाळरावभैया यांनां महाराजांनीं श्रीमंत बनिवले ह्मणून व महाराजांस पैलवान बाळगण्याविषयीं या फाजील भाट्यानें दोष दिला आहे. परंतु मोठे झालेले वृक्ष प्रथम लहानच असतात, अथवा जी श्रीमंत घराणीं आज आहेत त्यांचें मूळ पुरूष गरीबच होतें, अथवा मोठ्या नदीचा उगम लहान असतो, ह्या गोष्टीचा विचार केला तर व हे सर्व लोक मानकरी ह्मणून आहेत व खऱ्या कळकळीचे व जिवाचे लोक राजे लोकांजवळ होऊन गेले व असतात ते प्रथम असेच गरीब घरांतले असतात असें ऐतिहासिकदृष्ट्या सिद्ध होत असल्यानें, ह्या लोकांस महाराजांनीं थोर माणसें केली यांत वावगें काय झालें ? श्री. छत्रपति शिवाजी महाराजांजवळ तानोजी मालुसरा होता तो गरीब स्थितींतला होता. गरिबी निंद्य नाहीं. खरें पहातां भाटचे यानीं इंदूर संस्थान ह्मणून लेख खरडण्यांत स्वतःच्या दुष्टतेची कमाल केली आहे. तथापि महाराजांच्या वरील मानकऱ्या संबंधानें एकही वाईट गोष्ट लिहिण्यास त्याला जागा सांपडली नाहीं. इतकेंच नव्हे तर या सर्व लोकांपैकीं एखाद्या विषयींसुद्धां इंदूर रयतेपैकीं कोणाचेंही मत वाईट नाहीं. ही सर्व मंडळी सात्वीक व मोठी स्वामिभक्त आहे. आणि हे दोन गुण अलिकडील विद्वानांतच नव्हेपण पूर्वींच्याही विद्वान् लोकांत फार कमी असतात. या दोन गुणांत अग्रगण्य झालेली मंडळी बहुतकरून गरिबीपासून श्रीमंत बनलेल्या लोकांत सांपडते. हिरा कोळशांत सांपडतो, हें जितकें खरें आहे तितकेंच सत्यत्व आमच्या वरील विधानांत वसत आहे. चांगले गुण जातीवर किंवा श्रीमंतीवर अवलंबून नसतात. शिवाय मानकरी लोक त्यांच्या व्यवसायावरून पाहिलें तर राजे लोकांचे खरे बॉडीगार्डस् आहेत; व मानकऱ्यांच्या जागा स्वतःच्या विश्वासाच्या माणसांस देण्यास राजाला पूर्ण अधिकार आहे. श्री. होळकर महाराजांच्या ह्या मानकऱ्यांचा संबंध राजकिर्दींतल्या कोठल्याही कामाशीं नाहीं. अर्थात ह्या मानकऱ्यांविषयीं भाटचे यानें लिहिलें तें केवळ गंजीवरच्या कुत्र्याच्या गोष्टींतल्या कुत्र्याच्या अंगच्या दुर्गुणाप्रमाणें स्वतःच्या दुर्गुणास अनुसरून लिहिलें आहे.

पृष्ठ १०० यांत एक्या हुजऱ्यास फार मारला ह्मणून समजतें व मिसरजी ब्राह्मण आणखी कांहीं कैद्यांकडून बागेंत रूळ ओढवला ह्मणून कळतें, असें लिहिलें

आहे. मिळून ह्या दोन्हीं बातम्या "समजतें" व "कळतें" याच वाऱ्यावर वाहणाऱ्या आहेत. भाटच्याचें लिहिणें खरें मानलें तरी पण कैद्यांकडून रूळ ओढविल्यास काय जुलूम आहे ? सर्व ठिकाणीं कैद्यांकडून सख्त मजुरी करविली जाते. कैद्यांकडून सख्त मजुरी घेऊं नये असें भाटें याचें ह्मणणें असावें. आणि त्यानें स्वत:ची भावी स्थिति कल्पून तशा स्थितींत स्वत:ला सख्त मजुरी पडूं नये ह्मणून एव्हांपासूनच या मुद्यावर हळूच लिहिण्यास सुरवात केली आहे. परंतु त्यानें हें लक्षांत ठेवावें कीं अपराध्यांची संख्या व अपराधांचें मान जसजसें वाढत जाईल तसतशी शिक्षाही कडक होत जाईल.

पृष्ठ १०१,१०२ व १०३ यांत महाराज सायंकाळीं छावणींत जातात व मारकीट जवळच्या पुलावर बगी उभी करून तेथूनच शहारातील कोण लोक छावणींत आहेत व बडे साहेबांकडेस अर्ज करण्यास कोण जातात वगैरेचा तपास करतात. त्यांनीं एकदां सरकारी बागेंतील माळ्यास बोलाऊं पाठविलें; परंतु माळी महाराजांकडे गेला नाहीं, व त्यानें ती गोष्ट बडे साहेबांस कळविली. पुलावरील पहारेकऱ्यानें तेथें बगी उभी करूं नये म्हणून महाराजांस सांगितलें. ता. ३० अक्टोबर सन १८९५ रोजीं गुलाबखां नांवाच्या एका मुसलमानास छावणींतील पुलाच्याखालीं तो महाराजांची बगी पाहून लपला असतां त्याला महाराजांनीं वर आणविलें आणि शिव्या दिल्या व हुंकलून दिला. त्याच दिवशीं शहरांत परत येतांना इंदुरांत राणीपुरा कोतवालीच्या जवळ, एक पोलीसचा शिपाई उभा होता, तो बगी पाहिल्यावर एके बाजूस लपला. "तूं कां लपलास ? आह्मी काय कोणास खातों कीं मारतों" ह्मणून महाराज त्याला ह्मणाले "महाराज माझा ड्रेस चांगला नव्हता, कपडे मळके होते ह्मणून मी सरकारांच्या दृष्टी आड झालों" असें शिपायानें सांगितलें. त्याचें बोलणें खोटें समजून त्याला मारहाण करून कैद करून हिंगळाज गडास पाठवून दिला.

इंदुरांतून पळून छावणींत रहाणाऱ्या पगडबंधास शहरांत परत आणण्यास एका मिनिस्टरखेरीज बाकी जितके ऑफिसर होते ते त्याची समजूत करण्यास त्याचे येथें जाऊन चुकले. महाराजांच्या एका राणीस मूळ नक्षत्राच्या दुसऱ्या चरणावर मुलगा झाला असें मुद्दे लिहिले आहेत. यांत महाराज छावणींत जातात, ते बागेंत हवा खाण्यास जात नसून कोण कोण मनुष्य बडे साहेबांकडेस जातो येतो यांचा तपास करण्यास जातात असें मानणें किती क्षुद्र बुद्धिचे आहे ! भाटचे ह्मणतात कीं महाराजांजवळ अमूक मुखबीर ( हेर ) आहेत; मग स्वत: महाराजांस अशा तपासासाठीं जाण्याचें काय कारण आहे ? अर्थात भाटच्यांचें लिहिणें परस्पर विरोध आणणारें

आहे, आणि तें शुद्ध बनाऊं आहे. पुलावर बगी उभी राहिली असतां बडेसाहेबांकडेस जाणारा येणारा दिसतो असें मानणें, मुंबईच्या माहितगारांनीं मुंबईच्या क्राफर्ड मार्केटाच्या मनुष्यास ग्रँटरोड स्टेशनावरचा मनुष्य दिसतो, हें मानण्यासारखें होय. ज्यांना छावणींतील मारकिटाजवळच्या मारुती नजिकचा नदीवरचा पूल माहीत आहे, तो भाटचे यांच्या तर्कटाची सीमा त्वरित समजेल. पुलावरील पहारेवाल्यांनीं महाराजांस गाडी उभी ठेवण्यास मनाई केली, असें कदापि मानतां यावयाचें नाहीं. पुलावरील मार्ग राजमार्ग असून चांगला रुंद आहे. इंग्रजी छावणींतील रस्ते महाराजांस कमीपणा आणण्यासाठीं अरुंद होऊं शकत नाहीं. आणि महाराजांचा जो सन्मान हिंदुस्थान व सर्व सरकार ठेवितात त्याचा विचार केला तर एक शिपाई महाराजांची बेअदबी करूं शकेल काय? गुलाबखां याला बोलाविला आणि शिव्याच दिल्या असें मानण्यास विक्षिप्ताच्या बातमीदाराच्या अंगीं महाराजांच्या बगी बरोबर जेथें जेथें ती जाईल तेथें तेथें पळत राहण्याचें सामर्थ्य आहे, ही गोष्ट प्रथम ठरली पाहिजे. वास्तविक अशा गप्पा लिहून, महाराजांच्या राज्यव्यवस्थेविषयीं जाणत्या पुरुषांचा कल भलताच होऊं शकावयाचा नाहीं. ज्या गोष्टी खऱ्या ह्मणून दाखविण्यास भाटचे यानीं स्वतःच्या ज्ञानबलानें हुकुमाचे नंबर तारीख व माणसांचीं चरित्रें लिहिलीं आहेत, तें ज्ञान छावणींतील पुलावरील ज्या पहारेवाल्यानें महाराजांची गाडी तेथें उभी रहाण्यास मनाई केली, त्या शिपायाचें नांव देण्यास, त्यांच्या कामीं आलें नाहीं यावरून ढोलकीवाले तमासगीर मातीचे रुपये करून, शेवटीं कवड्या मागण्यास प्रेक्षकांपुढें टोपलें घेऊन तोंड पसरीत फिरतात, यांत त्यांनां त्यांच्या हातचलाखीचा जो उपयोग होतो, तोच उपयोग भाटच्यास, त्याच्या ज्ञानाचा झाला आहे. इंदुरांतील जुलमापासून बचाव करण्यास लोक छावणींत राहतात असें भाटचे यांनें पुष्कळ ठिकाणीं ह्मटलें आहे; आणि छावणींत महाराजांचे कांहीं चालत नाहीं असेंही त्यानें ह्मटलें आहे; आणि आतां भाटचे ह्मणतात कीं, लपलेल्या गुलाबखांस पुलाखालून वर आणिवला व त्याला शिव्या देऊन हंकलून दिलें; त्याच्या अशा लिहिण्यांत परस्पराशीं जो विरोध आहे, त्याचा विचार केला ह्मणजे **मिस्टर भाटयाच्या** अंतरंगाचें खरें रूप दृष्टीस पडून ते एडीटर आहेत किंवा पुण्यांतील बुधवारांतील भांग्या मारुतीचा गटार आहेत हें सिद्ध होईल.

आतां क्षणभर राणीपुऱ्यांतील कोतवाली जवळच्या शिपायाविषयीं भाटचे ह्मणतात तें खरेंच मानून विचार करूं. या लिहिण्यांत शिपायाचें नांव नाहीं, आणि हिंगळाजगडास पाठविण्याचा हुकूम दिला तो कोणास दिला हा खुलासा व त्या

हुकुमाचा उतारा नाहीं; लपणाऱ्या शिपायाची व महाराजांची पूर्वींची ओळख होती कीं काय हें हीं नाहीं आणि शिपाई या शब्दावरून त्या स्थितींतल्या मनुष्याच्या अंगांत मळके कपडे नसतात हें ही माटच्यानें सिद्ध केलें नाहीं. मळके कपडे होते ह्मणून त्याची लाज वाटून शिपायाला लपण्याचें कारण नव्हतें; अथवा त्याच्या अंगांतील मळकट कपड्यांपेक्षां विशेष मळकट कपडे घालणारे लोक महाराजांच्या दृष्टीस पडत नाहींत असेंही नाहीं. ड्रेस चांगला नव्हता तर तो ड्रेस सरकारी असल्यानें, त्याची लाज शिपायाला वाटण्याचें कारण नव्हतें. "ड्रेस चांगला नव्हतां, कपडे मळके होते." या माटच्याच्या लिहिण्यांत तो ड्रेस घालून उभा होता किंवा ड्रेस विरहित मळक्या कपड्यांनीं होता हें ठरत नाहीं. यावरून लपणारा शिपाई, चांदण्याला पाहून भिणाऱ्या चोरांपैकीं कोणीतरी चोरच असला पाहिजे, असेंच अनुमान होऊं शकतें; आणि माटच्यानें लिहिल्याप्रमाणें जर त्याला कैद करून हिंगळाजगडास खरेंच पाठविण्यांत आलें असेल, तर तो मनुष्य मोठाच अपराधी असला पाहिजे. एक विशेष मुद्याची गोष्ट ही आहे कीं, गुलाबखांस पुलाखालून आणिवलें ही गोष्ट तारीख ३० आक्टोबर १८९१ ची आहे, असें माटचे लिहितात; व त्याच दिवशीं छावणींतून परत जातांना राणीपुरा कोतवालीवर लपणाऱ्या शिपायाची गोष्ट घडली असेही माटचे ह्मणतात, तेव्हां त्यांचा बातमीदार बगीच्या बरोबर धांवत फिरतो आणि त्यानें महाराजांच्या तोंडचेच शब्द व शिपायाचें ह्मणणें अक्षरशः लिहिण्याजोगें टिपून घेतलें, यांत कोठली संभवता व शक्यता आहे, याचाही वाचकांनीं विचार करावा. सखाराम पगडबंधाच्या संबंधांत एका मिनिस्टरांखेरीज सर्व ऑफीसर त्याचें घरीं त्याचे समजुती करितां गेले असें माटच्यानें लिहिले तें अगदीं खोटें आहे असें मानण्यास एक जबर कारण आहे, तें हें कीं पुस्तक मोठें करण्याचें जें ज्ञान माटचे याच्या अंगीं खिळून राहिलें आहे, त्या ज्ञानाचा उपयोग पगडबंधाच्या येथें जाणाऱ्या ऑफिसरांचीं नांवें देण्यांत झाला नाहीं. ऑफिसर गेले असते तर लठ्ठ पुस्तककर्ते माटचे यानें आणखी एक दोन पानें नांवनिशीची यादी देऊन पुस्तक अधिक मोठें करून कचराटोपलीची क्षुधा शांत केली असती. आतां ज्या अर्थीं सखाराम पगडबंध, महाराजांचें पागोटें बांधित होता, आणि त्याचें बांधलेलें पागोटें महाराजांस आवडलें असेल, आणि दुसऱ्यांनीं बांधलेलें. पागोटें त्यांच्या मनाजोगतें बांधले जात नसेल, त्याअर्थीं त्याला बोलावण्यास पाठविलें असेल पुष्कळ वेळां असें घडतें कीं, झालेली इतराजी फार वेळ राहत नाहीं; व वाईट मनुष्यांचीसुद्धां त्यांच्या एखाद्या विशेष गुणासाठीं जरूर लागते. अशा मुळें जर पागोटें

बांधण्यासाठीं जर सखाराम पगडबंधास, त्याचे अपराध विसरून जाऊन महाराजांनीं बोलावण्यास पाठविलें असेल तर त्यांत महाराजांची उदार बुद्धि, क्षमा, व आश्रितां-विषयीं मनाचा कोंवळेंपणा ह्या थोर गुणांचें दिग्दर्शन होत आहे; व सखाराम पगडबंध जर महाराजांच्या बोलावण्यानें इंदुरांत परत आला नसेल, तर त्यांत त्याचा नीचपणा स्पष्ट दिसून येत आहे ज्या धन्यांच्या अन्नावर देह पोसला गेला, लौकीक झाला, व निरुद्योगीं राहूनही अन्नपाण्याची ददात पडत नाहीं अशीं साधनें, ज्यांच्या छाये खालीं प्राप्त झालीं, व ज्यांच्या राज्यांतील आपण एक पिढीजाद प्रजा व आश्रित आहोंत, त्या धन्यानें प्रसंग विशेषीं आपला अपराध नसतांही आपणास अप्रिय रीतीनें वागविलें ह्मणून त्यांच्याशीं स्वामीद्रोही होणें किती भयंकर पाप आहे! सखाराम पेगडबंध हा महाराजांच्या आज्ञेनें इंदुरास परत गेला नसेल, आणि त्याच्या न जाण्याविषयीं भाटचे त्याची पाठ थोपटीत असतील, तर पुनर्जन्म न मानणारांसही पगडबंध व भाटचे ह्यांची ह्याच जन्मांत अंतस्थिती किती किळसवाणी होईल याची कल्पना करतां येईल!

मूळ नक्षत्रावर मुलगा झाला ह्मणून महाराज दुःखी झाले हें सिद्ध करण्यांस भाटचे यानें एकपान काळें केलें आहे; परंतु यांत कोठला सामाजीक विपय ते समजले? ज्योतिपासंबंधानें लोकांचे जे निरनिराळे ग्रह आहेत त्यामुळें कोणांचे काय नुकसान आहे हें सिद्ध केल्यावांचून त्या मतभिन्नतेविषयीं विवेचना करणें गौण पक्ष होय. भाटच्याचाही जन्मकाल त्याच्या वडलांनीं टिपला असेल व भाटचाचे व्यवहार विधि मुहूर्त पाहूनच झाले असतील मग ते स्वतः परमहंस दिक्षा धारण करण्याचें ढोंग कां दाखवितात!

पृष्ठ १०४ ते १०५ यांत—पेमरतन बागडी यांजकडून मथुरादास भगवान-दासचें घेणें ह्मणून ८ हजार रुपये स्पेशल माजिस्ट्रेट यांनीं वसूल केलें. त्यानें मिनिस्ट-राकडेस अर्ज केला व त्यांनीं त्याला उत्तर दिलें कीं मथुरादासावर तुला फिर्याद करण्यास मोकळीक आहे. त्यानें मथुरादासावर उलट फिर्याद केली व स्पेशल माजि-स्ट्रेट यांनीं मथुरादास भगवानदासचा भाचा सरदारमल गुलाबचंद नांवाचा एक वाणी आहे, त्याची दुकान निराळी आहे ती मथुरादासच्या पुंजीवर चालत असेल असें मानून, त्या दुकानाची जप्ती केली. त्या दुकानावर सरदारमल्लासह पांच पंचवीस वाणी लोक कारभारी साहेबांकडेस अर्ज घेऊन गेलें. कारभारी साहेबांनीं सांगितलें कीं, सरदारमल यानें एकट्यानें अर्ज करावा; असे मुद्दे असून भाटचे यानें इंदुरच्या न्यायास दोष दिला आहे. वास्तविक् ज्या व्यक्तीस न्याय मिळाला नसेल त्यानें

अपील करावयाचें आणि हीच रीत इंग्रजींत अथवा वाटेल त्या सुधारलेल्या न्यायी देशांत न्याय मागण्याची आहे. आणि अर्जदारानें जमाव करून येऊन अर्ज केल्यास त्याचें महत्व विशेष मानावें असें कोठेंच नाहीं. अशा कामांत अर्ज करण्याचा अधिकार ज्या त्या व्यक्तीचा आहे असें असतां जमावानिशी अर्जकरणाऱ्या सरदारमल्लास मिनिस्टरनें दिलेलें उत्तर वावगें ह्मणण्यास भाटचे यांच्याजवळ काय आधार आहे?

पृष्ठ १०९ ते १०६ यांत—महाराजांचे लहानपणचे शिक्षक कॅपटन् फ्रॅन्क, महाराजांच्या बोलावण्यानें विलायतेहून इंदुरास आले. त्यांना त्यांचा दोन वर्षांचा पगार महाराजांनीं दिला असा लेख "असें कळतें" या आधारावर लिहिला आहे; आणि त्यांनीं इंदुरचा बंदोबस्त नीट करावा अशी सुचना केली आहे. या लिहिण्यांत विचारकरण्यासारखें कांहीं नाहीं. जे कोणी आले गेले त्यांचें वृत्त ल्याहावें व त्यावर कल्पना करीत रहावें हा कित्येकांचा स्वभाव असतो त्यातलेंच हे.

पृष्ठ १०६ यांत—रात्रींच्या पहाऱ्यांवर पहाऱ्यावरील शिपायास खोकला आला आणि तो आवाज महाराजांचे कानावर गेल्यामुळें जंगी फौजेकडील तीन शिपायांस, त्या कारणावरून नोंकरींतुन वजा केलें असें लिहिलें आहे. येथें जरी "असें कळतें" नाहीं, तरीपण शिपायांचीं नांवें व तारीख महिना नाहीं. भाटचे याचें लिहिणें खरें मानिलें तर शिपायांस झालेली शिक्षा फार कमी झाली असें ह्मणतां येईल. निजावयाचें ठिकाणीं खोकणारे लोक बोलणारे घोडे व जेणें करून आपली झोंपमोड होईल असा प्रकार घडला तर आपण त्या संबंधांत फार रागावतों; आणि जर खुद्द महाराजांची झोंप मोडण्यासारखें कृत्य होऊं नयें अशी सावधगिरी ठेवण्याचें व्यवहारज्ञान अंगीं असून आणि अशा वेळीं, अशा ठिकाणीं पहारेकऱ्यांस फार सावध राहण्यास हुकूम असतो त्या विरुद्ध त्यांनीं वर्तन केलें तर त्या आज्ञाभंगतेबद्दल, अथवा त्या निष्काळजीपणाबद्दल, अथवा त्रास उत्पन्न होण्याचें कृत्य करण्याबद्दल, अथवा अशा कृत्यांचे वर्जन करतां येण्याचें टाळल्याबद्दल त्या लोकांस नोकरींतून काढण्याची तात्कालिक शिक्षा राजाकडून झाली, यांत मनुष्य स्वभावाविरुद्ध कांहीं झालें नाहीं. शिवाय ही शिक्षा त्या लोकांसाठीं किती दिवस राहते हें पाहिल्या वांचून एकदम कांहीं तरी बहकणें, भाटच्यासच शोभतें हें मात्र खरें आहे. लेखकास परिणामावर दृष्टी द्यावी लागते, आणि झालेल्या गोष्टींत बदल होण्याचा योग्य काल निघून जाई पावेतों शांत राहिलें पाहिजे. शिक्षा कमी करण्याचे जे अधिकार स्थानपरत्वे राहिले आहेत, त्याचें हेंच कारण होय. उतावळीपणा दुष्टता नाहीं हें आह्मीं कबूल करतों; परंतु भाटचे

याचा दुष्टपणा उतावळा झाला आहे, हें गोष्टी रचून त्यांत महाराजांस दोष देण्याच्या त्यांच्या प्रकारांत स्पष्ट दिसून येत आहे.

पृष्ठ १०६ यांत दुसरा जुलूम ह्मणून हकीकत लिहिली आहे. कोणी अर्जदारणी बाया वाड्यासमोर उभ्या होत्या. त्यांनां फार वेळ तेथें कां उभ्या राहूं दिल्या? आह्मांस वर्दी कां दिली नाहीं? एवढेंच कारण धरून पोलीसचे तीन शिपाई नोकरातून वजा केले व त्यांनीं शहरांतून काढून देण्याचा सिटी फौजदार यांस हुकूम दिला असें लिहिलें आहे. परंतु भाटच्याच्या या लिहिण्यावरून महाराज अर्जदारांविषयीं किती काळजी घेतात हें सिद्ध होत आहे. शिपायांस शहरांतून काढून देण्याचा हुकूम दिला ही गोष्ट भाटच्याच्याच लिहिण्यावरून खोटी ठरते. "आह्मी शहरांतून जात नाहीं बेलाशक महाराजांना हें कळवा" असें शिपायांनीं शहर फौजदारास सांगितलें व त्यावर त्या शिपायांस जाण्याची सक्ती झाली नाहीं असें भाटचे ह्मणतात. यावरून आपणांस काढून देण्याचा हुकूम महाराज करणार नाहींत. इतका विश्वास महाराजांच्या न्यायाविषयीं शिपायांचा होता, ह्मणूनच त्यांनीं तसें उत्तर दिलें असावें; अथवा महाराजांनीं दिलेला हुकूम स्थितीपरत्वेच्या रागांत दिला असेल; त्या हुकुमाची बजावणी झालीच पाहिजे अशी महाराज आज्ञा करणार नाहींत; इतका भरंवसा त्या शिपायांचा महाराजांचे ठिकाणीं असला पाहिजे. जर भाटच्याच्या ह्मणण्याप्रमाणें महाराज जुलमी असते, अथवा महाराज जुलूम करतात असें निदान इंदुरांतील लोकांस वाटत असेल तर तशा महाराजांच्या हुकुमाला आह्मी जात नाहीं ह्मणून शिपायांच्यानें उत्तर दिलें गेलें असतें काय? यावरून हेंच सिद्ध होतें कीं, अपराध घडल्यावांचून महाराज कोणास कांहीं ह्मणत नाहींत. कारण याच उदाहरणांत अर्जदारणी बायांची वर्दी शिपायांनीं, महाराजांस न देतां त्यांनां रस्त्यांत तिष्ठत उभ्या ठेवल्या, हा अपराध त्या शिपायांनीं केला असें दिसून येतें. जर या शिपायांचें काम वर्दी देण्याचें नसतें, अथवा या कामांत या शिपायांचा कांहीं संबंध नसता, तर ज्यांनीं महाराजांच्या हुकुमास आह्मी जात नाहीं असें ह्मटलें, त्यांनीं स्वतःचा अपराध नाहीं असा अर्ज करण्याचें धैर्य धरलेंच असतें. भाटचेसुद्धां असें ह्मणूं शकत नाहीं कीं, ह्या शिपायांचा त्या कामाशीं संबंध नव्हता. शिपायांचीं व त्या बायांचीं नांवें व ही गोष्ट घडली तो दिवस भाटचे यांस दाखवितां आला नाहीं. यावरून ज्याप्रमाणें पुष्कळ गोष्टी भाटचे यानीं खोट्या रचल्या आहेत, तशीच ही गोष्ट आहे; आणि ही गोष्ट त्यांनीं लोकांस राजद्रोहाचें शिक्षण देण्यास लिहिली आहे. कारण त्यांनीं ही गोष्ट लिहि-

तांना शिपायांनीं " आह्मीं जात नाहीं " ह्मणून ह्मटलें याबद्दल त्याची पाठ थोपटली आहे. अशा रीतीचें शिक्षण पूर्ण प्रजासत्ताक राज्यांतसुद्धां बंडावे माजिवणारें आहे.

पृष्ठ १०७ पासून ११३ पावेतों रावबहादूर बेदरकर यांस दूषणें दिलीं आहेत; आणि तीं दूषणें वामन सिताराम यांस न सोडण्याबद्दल आहेत. या पलीकडे कांहीं लिहिलें नाहीं. विचार केला तर वामन सिताराम यास न्याय देण्याचा अथवा अन्यायापासून त्याचा बचाव करण्याच्या कायद्याच्या मार्गांत बेदरकर साहेबांनीं बिलकूल अडथळा केला नाहीं.

पृष्ठ ११३ यांत महाराजांची स्वारी बढवाईस गेली, आणि हिंदुस्थान सरकारांच्या हुकुमावरून ते तेथें गेले, व पंचवीस लक्षापेक्षां कमी नाहींत इतके रुपये गोकुळदास वल्लभदास जबलपुरवाले यांच्या पेढीवर जमा केले, ते रुपये बडेसाहेबांनीं परत घ्यावे हें उत्तम असें लिहिलें आहे. या लिहिण्यांत रुपये जमा केले आहेत हा लेख " असें कळतें " या आधारावर आहे. रुपये जमा केलें हें खरेंच मानलें तर त्यांत काय वावगें आहे हें कळत नाहीं. भाटचे यानीं बडेसाहेबांनीं रुपये परत घ्यावे ह्मणून ह्मटलें आहे तें ह्मणणें उकरड्यावरील कावळ्यानें हंसाला नीति ह्मणून अन्याय शिकिवण्यासारखें आहे. महाराज बढवाईस गेले ते हिंदुस्थान सरकारच्या हुकुमानें गेले ही गोष्ट निव्वळ खोटी आहे. कारण तसा आधार भाटचे यांस दाखिवतां आला नाहीं; इतकेंच नव्हें तर सरासरी पंधरा दिवसानें महाराज बढवाईहून पुनः इंदुरास आले व तदनंतर महाराजांस वाटलें तेव्हां पुनः ते बढवाईस गेले व वाटेल तेव्हां इंदुरास परत आले. बढवाई महारजांचा तालुका आहे, व ज्या प्रमाणें इंदुरापासून कांहीं अंतरावरचीं ठिकाणें महाराजांस राहण्याचीं आहेत, तसेंच बढवाई आहे; व बढवाईस जाऊन राहाण्याचा थोरल्या महाराजांपासून चांगला परिपाठ आहे; बढवायास महाराजांनीं राहण्यास पूर्वींपासून बंगले बांधविले आहेत, व जसें लालमंडळ, सुखविलास, रणभंवर, वगैरे गांवीं व ठिकाणीं महाराजांचीं मृगयास्थानें आहेत त्यांपेक्षां विशेष प्रिय व सावजांनीं व वनसौंदर्यांनीं शोभलेलें असे अंधारीबाग नांवाचें मृगयास्थान बढवाई जवळ आहे तेथें महाराज शिकारीसाठीं नेहेमीं जातात.

पृष्ठ ११३ पासून ११७ पावेतों निस्पृह ह्मणून कोणी आहेत त्यांना भाट्यांनीं शिव्या दिल्या आहेत, परंतु त्यांचें लिहिणें कोठें चुकलें आहे हें दाखविण्यांत त्या पांच पानांत एकही वाक्य सांपडत नाहीं. पृष्ठ ११७ पासून १२२ पावेतों महाराजांच्या जुलुमांचीं उदाहरणें ह्मणून दिलीं आहेत; त्यांतील सारांश—महिपतराव

कनसरवेटर यांस महाराजांनीं एकेचाळीस गांवचा नवीन जमाबंदीचा ठराव करण्यास सांगितलें; त्यांनीं तहसीलदारांनीं जो जमावंदीचा ठराव केला होता त्याचेपेक्षां दुप्पट आकार लोकांवर लागू केला; ते लोक इंदुरास चार पांचशें शेतकरी आपले मुलाबाळांसह येऊन आठ दिवस राहिले; परंतु महाराजांनीं त्यांचें ऐकलें नाहीं व त्यास हंकलून लावलें; त्या एकेचाळीस गांवांपैकीं बहुतेक लोक त्रासून पर इलाख्यांत निघून गेले आणि कांहीं नादार झाले; त्या एकेचाळीस गांवचा वसूल अमिनानें जी जमाबंदी केली होती तिच्या अर्ध्या इतकाही येत नाहीं.

रामप्रताप हरविलास नांवाचें इंदुरास दुकान आहे त्या दुकानाशीं सरकारी दुकानाचा देववेवीचा व्यवहार झालेला आहे. या दुकानाकडेस चार लाख रुपये व्यापारी शिरस्त्यानें त्यांना देऊन त्या पेटें त्या दुकानाची पांच लाखांची अफू तारण ठेवली होती ती सव्वातीन लक्षांस विकली व त्याच्या मिळकतीची जप्ती केली; शेवटीं त्याला इंदुरांतून जाण्यास सांगितलें, व त्याला कोतवालींत कैद ठेविलें होतें. दुकानचे मालक रामप्रताप हे मोठे संभावित गृहस्थ होते, व त्यांच्या श्रीमंतीबद्दल कर्नल बार साहेब यांना माहिती आहे.

रामभाऊ अग्निहोत्री याच्याकडेस शंमर वर्षांपासून मल्हारराव होळकर यांनीं स्वतःचे वडिलांचे उत्तरकार्यांत पिंडावर दान केलेला गांव होता तो जप्त केला; इतके मुद्दे लिहिले आहेत. आतां या प्रत्येक मुद्याचा विचार करूं. प्रथम महिपतरावांनीं जमाबंदीचे दर वाढविलें, ते खोटे वाढविले आणि त्यामुळें लोक पळाले व वसूल कमी येणार ह्या गोष्टी सिद्ध करण्यास, भाटच्यांनीं या मोहोगेर्म लिहिण्या वांचून इतर कोठलाही आधार दिला नाहीं. रावबहादूर गरूड यांच्या इजाऱ्यासंबंधानें चालू सालचे आंकडे दाखविण्याचा भाटचे यांनीं जो प्रयत्न केला तसा प्रयत्न यांनीं या बाबतींत वसुलाचा आंकडा दाखविण्यांत केला नाहीं, यावरून भाटच्याची लबाडी वाचकांस कळेल. दुसऱ्या मुद्याविषयीं विचार करतां रामप्रतापजीचा पंचवीस लक्षांचा रोकड व्यापार दर वर्षास होता तर त्याच्याकडेस सरकारी जे चारलाख रुपये भाटच्यांच्या ह्मणण्याप्रमाणें घेणें होतें, तें रामप्रतापजी यांनीं कां दिलें नाहींत? श्रीमंतीच्या डौलाखालीं अफिमीच्या पेट्या " ऊपरसे खूबबनी अंदरकी रामजाने " अशा थाटाच्या तारण ठेवून कांहीं इतर सावकारांनीं सरकारांस व्यापार खात्यांत फसविलें आहे; रामप्रतापजीवर जुलूम झाला असल्यास भाटचे यानीं त्यांची जी श्रीमंती मानली आहे ती श्रीमंती पाहून त्यांच्याविषयीं कींव करण्याचें कांहींच कारण नाहीं. ते स्वतः झालेला जुलूम सहन करण्यास किंवा त्याविषयीं दाद मागण्यास समर्थ असले पाहिजेत.

राममाऊ अग्निहोत्री यांचा गांव जप्त झाला त्याचें कारण, त्यांचेकडेस सरकारी घेणें नाहीं, अथवा जाहगीर गांव खाण्यास अमूक लेखी आधार आहे, अथवा सरकारची जाहागीर उपभोगण्यास रामराव स्वतःच्या कृतीनें अयोग्य ठरले नाहींत, असें एखादें कारण साधार लिहिलें पाहिजे होतें, तें भाटचे यानीं दाखविलें नाहीं. वास्तविक या घरांत चालत आलेला गांव अग्निहोत्रा प्रीत्यर्थ होता. रामरावच्या घरांत अग्निहोत्र नाहीं आणि या साठीं त्याला गांव खाऊं देणें योग्य नाहीं. ज्या शर्तीवर गांव होता त्या शर्ती रामराव याणें मोडल्या आहेत.

पृष्ठ १२३ यांत लोकांवर झालेल्या अन्यायांची चौकशी करण्याकरितां एक कमिटी नेमली आहे " असें समजतें " या आधारावर लिहिलें आहे. परंतु नेमली जाणारी किंवा नेमलेली कमिटी, लोकांवर झालेल्या अन्यायांच्या चौकशीसाठीं नसून, लोकांच्या कामाचा निकाल लौकर लावण्याच्या विशेष सोईसाठीं आहे.

पृष्ठ १२३ पासून १२८ पावेतों मि. गुप्तेसाहेब यांनीं राज्यांत ज्या ज्या निरनिराळ्या खात्यांत ते बदलले गेले त्यांत त्यांनीं सुधारणा केली व ते कोणाची भिड व पक्ष न धरतां स्वतःचें काम दक्षपणें करतात वगैरे त्यांच्या संबंधानें लिहिलें आहे.

पृष्ठ १२८ पासून १३२ पावेतों—वामन सितारामा संबंधानें लेखी पुरावा ह्मणून त्याच्या वरील खटल्यांत झालेल्या जाबजबाबीं कागदाचे उतारे आहेत. विचार करण्यासारखें कांहीं नाहीं.

पृष्ठ १३२ पासून १३३—यांत निस्पृह ऊर्फ "धनुर्धारी" यांस त्यानें "विक्षिप्ता" चे विरुद्ध लिहिलें ह्मणून दोष दिला आहे. या पलिकडे कांहीं नाहीं.

पृष्ट १३३ यांत हिंदुस्थान सरकाराकडून महाराजांस एक खलिता आला आहे, असें " ह्मणून कळतें " या आधारावर लिहिलें आहे. त्यांत भाटचे यानीं आणखी जें लिहिलें आहे त्यांत **नवीन खलिता** या सदराखालीं लिहिलेला लेख अक्षरशः घेतों.

" अलीकडेस हिंदुस्थान सरकाराकडून महाराजांस एक खलिता आला आहे ह्मणून कळतें; त्यांत मुख्यत्वें तीन गोष्टी आहेत. ( १ ) तुमचेकडून जो खलिता आला त्यांत हिंदुस्थान सरकाराकडून विचारलेल्या गोष्टींचें समर्पक व समाधानकारक उत्तर आलें नाहीं. ( २ ) तुमचेविरुद्ध जे अर्जदार आहेत त्यांचा एक महिन्याचे आंत त्यांना न्याय देऊन निकाल करावा. ( ३ ) इंदूर संस्थानचा कसा व

काय बंदोबस्त करावयाचा याविषयीं आमचे एजंट कर्नल बार यांस आह्मीं पूर्ण अधिकार दिला आहे. या मुख्य तीन गोष्टी शिवाय आणखीही कांहीं मुद्दे त्यांत आहेत."

या लेखांत सत्यता आहे असें मानलें तरीपण त्यांत ज्याप्रमाणें प्रत्येक राज्यांत राज्याविरुद्ध खटपटी करणारे लोक राजाविरुद्ध खोटे नाटे अर्ज हिंदुस्थान सरकारांकडेस पाठवितात, व हिंदुस्थान सरकार त्यावर अर्जदारांचा योग्य निकाल करावा ह्मणून जो ठरीव शेरा देतात, त्यापेक्षां यांत कांहीं विशेष महत्व नाहीं. परंतु हिंदुस्थान सरकासंकडून आलेला खलिता इतर कोठल्याही मनुष्यास न कळतां भाटचे यांसच कळला, ही गोष्ट खरी मानतां यावयाची नाहीं. असेंही गृहीत धरून चालूं कीं, हिंदुस्थान सरकारांनीं असाच खलिता पाठविला, तरी तेवढ्या वरूनच इंदूर संस्थानांत अन्याय होत आहे, असें मानणें चुकीचें होईल. नेटीव संस्थानिकांची काळजी हिंदुस्थान सरकारांस नेहमीं कांहीं तरी कारणानें वाहवी लागते, हें आपणास माहीत आहे. वरिष्ठ सत्ताधिशास हाता खालील अधिकाऱ्यांची चूक नेहेमीं दाखवितां येते; आणि चुकी दाखविण्याचे प्रकारांत पुष्कळ प्रकार सत्ताविशेषत्व दाखविण्या पलिकडचे नसतात. या गोष्टींचा विचार केला ह्मणजे हिंदुस्थान सरकारांच्या अशा खलित्यावरून होळकर सरकारांचें राज्य अन्यायी ठरत नाहीं. हिंदुस्थान सरकारांस संस्थानिकांची काळजी वाहावी लागते, आणि हिंदुस्थानाचें राज्य इंग्लिश लोक परोपकारार्थ चालवितात यामुळे नेटीव संस्थानिकांनीं अन्यायानें वागूं नये ह्मणून "वाघाचे अगोदर आरोळी" या न्यायानें अन्याय होण्याचें अगोदर राजे लोकांनीं सावध राहण्यास त्यांना जागृत करण्याची स्वत:ची परोपकार बुद्धि दाखविण्याची हिंदुस्थान सरकारांस संवयी लागलेली आहे.

पृष्ठ १३४ ते १३६ यांत—महाराजांनीं ६ गृहस्थांची कमिटी नेमली व हुकूम दिला कीं, या लोकांची चौकशी करून कारभारी साहेब व राय नानकचंद या उभयतांकडे त्या संबंधीं रिपोर्ट करावा, नंतर त्यांनीं तें प्रकरण अभिप्रायासह हुजूर पाठवावें; मग शेवटचा हुकूम आह्मीं देऊं. कमिटींत ६ मेम्बर आहेत ते चीफ् जस्टिस धुरंधर, लाला बिसेसरनाथ, केशवराव धोंडदेव, जनरल सखाराम मार्तंड, बळवंतराव पांडुरंग व बाळकृष्ण आत्माराम गुप्ते. या कमिटीनें काम सुरू केलें आहे. महाराजांनीं कमिटी नेमली यांत कांहीं अर्थ नाहीं. आंतून कमिटीचे लोकांस व कारभारी साहेबांस आपल्या मर्जीविरुद्ध निकाल न करण्याविषयीं ताकिदी दिली असेल असें ह्मणण्यास आह्मांस दोन तीन कारणें कळलीं आहेत, असें लिहिलें आहे. या लिहिण्याचा विचार केला तर भाटचे यांनीं स्वत:चें ठकबाजीचें ज्ञान सुरेख दाख-

विलें आहे; व त्यांतच लोकांस फितूर करण्याचें कसब लढविलें आहे असें दिसतें. कारण एकाच लेखांत ते कबूल करितात कीं, महाराजांनीं असें ठरविलें आहे कीं या मेंबराच्या कमिटीनें चौकशी करून ती मिसल कारभारी साहेब व राय नानकचंद यांजकडेस पाठवावी, व त्यांनीं अभिप्रायासह हुजूर पाठवावी व शेवटचा हुकूम हुजुरांतून होईल, असें असून आपल्या मर्जीविरुद्ध निकाल न करण्याविषयीं महाराजांनीं कमिटींतील लोकांस व कारभाऱ्यांस हुकूम दिला असेल, असें लिहून कळलेलीं कारणें प्रसिद्धीस न आणणें हें भाट्याचें कृत्य किती नीचपणाचे आहे, याचा विचार वाचकांनीं करावा. हिंदुस्थानांतील देशी राज्यें बुडण्यास खऱ्याचें खोटें भासवून देणारे लोक भाटच्या प्रमाणेंच निपजले होते. पुष्कळ ठिकाणीं भाटचे यांनीं चीफ जस्टिस धुरंधर, लालाविसेसरनाथ वगैरे ऑफिसरांची तारीफ केली आहे, व जेव्हां जेव्हां स्वतःच्या कोटीक्रमानें महाराजांस दोष देण्याचा यत्न करण्यांत आला तेव्हां तेव्हां वरील ऑफिसरांची असलेली खरी योग्यता, विरुद्ध रुपाची ठरवूं पाहिली आहे. यावरून तर भाटचे हे शुद्ध बाटे बनले आहेत.

पृष्ट १३६ तें १३७ यांत—बढवायचा अमीन गोविंद शंकर यांस, त्याला खाटेवर घालून घरीं पोंचवावा लागला येथ पावेतों मारला. गोविंद शंकर यांस महाराजांनींच प्रथम पंधरा रुपयांची नोकरी दिली; नंतर त्याला आपले बरोबर विलायतेसही नेला; त्या दरम्यान त्याच्यावर नाराजी होऊन त्याला मारपीट करून त्याला नोकरींतून काढून दिला होता; पुनः त्याला इसवीसन १८८८सालांत बोलावून महेश्वरी अमीन नेमला; त्या वेळेस अमिनीचें काम करण्याचें ज्ञान त्याला नव्हतें; तेथून चार महिने झाले त्याची बदली बढवायास केली होती; बढवायास त्याला मारून नोकरी वरूनही काढला, असें लिहिलें आहे. आतां घटकाभर भाट्याचें लिहिणें खरें मानून प्रथम विचार करूं. भाटच्याच्या लिहिल्याप्रमाणें गोविंद शंकर हा महाराजांच्या आश्रितांपैकीं एक होता असें ठरतें; आणि त्यानें स्वतःचें बरें वाईट महाराजांच्या मर्जीवर सोंपविलें होतें; इतकेंच नव्हें तर महाराजांच्या वाटेल तशा वागणुकीविषयीं त्याला स्वतःला वाईट वाटत नव्हतें; आणि ज्या अर्थीं त्याच्या अंगीं अमिनीचें काम करण्याचें ज्ञान नव्हतें असें असून महाराजांनीं त्याला त्या कामावर मुकरर केलें, व त्यानें तें काम पत्करलें त्या अर्थीं त्याला त्रास देण्यापेक्षां सुखविण्याचेच महाराजांचे प्रयत्न होते. अर्थात महाराजांच्या कृपेचा त्यांनीं दुरुपयोग केल्यामुळें महाराजांनीं त्याला स्वतःचे घरचा मनुष्य समजून शिक्षा केली नसेल हें कशा वरून ? आणि त्याला शिक्षा करण्यांत त्याच्याविषयीं महाराजांचा कळवळा व त्यानें योग्य वागावें ही महाराजांची इच्छा होती हेंच खरें. श्रीमं-

तांच्या कृपेंत असणारे लोक अपराध करीत नाहींत असें कोठें आहे ? गोविंद शंकर याला महाराजांनीं शिक्षा केली त्या संबंधांत त्याचे स्वतः खेरीज इतरांस विचार करण्याचें कांहीं कारण रहात नाहीं. आणि त्याचा व महाराजांचा निकट संबंध कळला असून भाटचे यानें ही गोष्ट लिहिली आहे, तेव्हां या लिहिण्यांत भाटचे यांचा बनाऊ लिहिण्याचा स्वभाव मात्र दिसून येतो. आह्मी ह्मणतों त्याला एक मोठें प्रमाण हें आहे कीं, गोविंद शंकर यांस पुनः बढवाईच अमिनीवर महाराजांनीं मुकरर केलें आहे असें स्वतःभाटचेच कबूल करितात.

पृष्ठ १३८ यांत नानाजी केशव यांस सस्पेंड केल्याचें समजतें असें लिहिलें आहे, यांत कोठला मुद्दा ह्मणून भाटचे यांनीं हें लिहिलें ? नोकरी करणारा व नोकरी देणारा परस्परांच्या खुषीवर नोकरी सोडणें व नोकरी करणें आहे. जबरदस्तीनें कोणी कोणाकडून नोकरी घेऊं शकत नाहीं.

रावजी जनार्दन भिडे हुजूर खजानची यांच्यावर ताशेरा झाडला गेला व त्यांना महेश्वराहून परत इंदुरास पाठविलें; त्यांना कांहीं मारपीट केली व मागाहून पांच हजार रुपये बक्षीस देऊन त्यांची समजूतही केली, पण या बातमीवर आह्मी विश्वास ठेवीत नाहीं, असें भाटचे यांनीं लिहिलें आहे. या लिहिण्यांत ज्या बातम्या स्वतःला खऱ्या वाटत नाहींत त्या प्रसिद्ध करून महारांजाविषयीं द्वेष व स्वतःचा राजद्रोह हे दोन दुर्गुण भाटचे यांनीं जगापुढें ठेविले आहेत त्याचा विचार वाचकांनीं करावा. निंदकांना निंदा करण्यास कारणें लागत नसतात, तशीच स्थिती विशेषतः समजून उमजून खोटें लिहिण्याची भाटचे यांची आहे. याशिवाय आणखी एका ब्राह्मणास मारला, एका बॉडीगार्डाच्या स्वाराला मारला, अशा दोन गोष्टी "समजतें" या आधारावर मोहोगम दिल्या आहेत, हें भाटच्याचें कर्तबगारींचें चित्र आहे.

महेश्वरीं दिपोत्सव केला; आतसबाजी सोडली; व ब्राह्मणांस भोजन दिलें तें लोक ह्मणतात महाराजांवर येणारें संकट दूर झालें ह्मणून हें केलें " असें लोक ह्मणतात " असे भाटचे यांनीं लिहिलें आहे. कितीही चांगलें काम केलें तरी दुष्ट लोकांस त्या बद्दल वाईटच वाटावयाचें, व वाईट लोक चांगलीं कामें पाहून त्याविषयीं वाईट कंड्या पिकवितात, कारण त्यांना चांगल्यांचा उत्कर्ष अथवा चांगुलपणाच आवडत नाहीं. पहा बरें महाराजांनीं उत्सव केला, परंतु त्या विषयीं सुद्धां " लोक ह्मणतात या आधारावर कुत्सितपणा दाखविल्या वांचून भाट्यास रहावलें नाहीं.

महेश्वराहून, इंदुरांतील साहशें रुपये दरमाहाच्या एका अमलदारास दोन दि-

वसा करितां तरी बिड्या घालून कैद करण्याची चिठ्ठी महाराजांनीं पाठविली आहे; असें " कळतें " या आधारावर भाट्यांनीं लिहिलें आहे. याचा विचार तरी काय करावयाचा ? वाटेल त्या वेळेस एक गोष्ट रचावी, नांवनिशीचा पत्ता लागूं देऊं नये, व " कळतें " ह्मणून ती प्रसिद्ध करावी, असा भाट्यांचा क्रम पडला आहे; आणि त्यांच्या अशा लेखावरून ते शतमूर्ख नव्हे तर शतदुष्ट आहेत इतकेंच ह्मणणें बस आहे.

पृष्ठ १३९ यांत महाराज महेश्वराहून बढवाईस जाणार, रावबहादूर बेदरकर इंदुरास साक्षीभूत असल्याप्रमाणें आहेत व चांगलें काम करीत नाहींत. वामन सितारामाला जामिनावर सोडला इतक्याच मुद्यावर भाटचे यांनीं एक पान रंगविलें आहे; व वामन सिताराम यांस जामिनावर सोडला तो स्वतःचे लेखन चातुर्यामुळें सोडला असें भाटचे गुरगुरतात. या सर्व मुद्यांत विचार करण्यासारखा एकच मुद्दा आहे. तो हा कीं, भाटचे यांच्या लिहिण्यानें वामन सिताराम जामिनावर सुटला कीं काय. कोणीही वाचक ही गोष्ट कबूल करील कीं स्पेशल माजिस्ट्रेटाच्या ठरावावर, कोर्ट उपकोर्टांतून रीतीचे अर्ज कारभारी साहेबांकडेस गेल्या मुळें, व त्यांना वामन सितारामास जमानतीवर सोडणें योग्य वाटल्यामुळें त्यांनीं त्यांस सोडला. भाटचे यांनीं स्वतःची फुशारकी मारली आहे. तिचें कारण लोकांकडून स्वतःस पैसे मिळत जावे व लोकांस वाटावें कीं भाटच्यांच्या लिहिण्यावरून आपली सुटका होईल हेंच होय.

पृष्ठ १४० ते १४१ यांत–भाटच्यांनीं बापुजी नारायण महिदपूरचे मुनीम यांसही मुक्त केलें जावें असें लिहिलें आहे; व दिनकर गोपाळ यालाही सोडून देण्याची प्रार्थना केली आहे. दिनकर गोपाळ याच्याविषयीं लिहितांना भाटचे यांनीं महाराजांच्या हुकूमावरून त्याला दोन वर्षांची शिक्षा जास्त झाली असें दाखविण्यास त्या हुकुमावरून झालेल्या हुकुमाचे उतारे दिलें आहेत; आणि त्यांत त्यांनीं जरी महाराजांचा दोष दाखविण्यास प्रयत्न केला आहे तथापि त्याच लेखांत त्यांनीं हें कबूल केलें आहे कीं, त्याच्याकडे सरकारी घेणें होतें. या शिवाय इतर भाग भाटच्यांनीं लपविला आहे; तरीपण तेवढ्यावरून हें अनुमान करतां येतें कीं, सरकारी रुपये न देण्यासाठीं, इसम मजकुरांनीं स्वतःचीं इस्टेट लांबविली असावी, अथवा इजारे करण्यांत अथवा सरकाराशीं व्यापार करण्यांत स्वतःचा नफा अन्यायानें करून घेतला असावा, आणि त्याला योग्य कोर्टांतून शिक्षा झाली ती शिक्षा महाराजांकडे, ती मिसल गेल्यामुळें महाराजांनीं वाढविली असावी, आणि हा अधिकार शेवटचें अपील कोर्ट या नात्यानें जर दरबारास आहे तर तो महाराजांस कां नसावा ?

पृष्ठ १४१ ते १४४ यांत—माधवराव रघुनाथ नांवाचा गरोठचा कारकून होता यावर, रतनचंद घाशीराम चौधरी गरोठकर नांवाच्या एक मनुष्यानें अर्ज दिला; त्या वरून नाथुराम भेरजी इंदूर येथील फर्स्टक्लास सिटी माजिस्ट्रेट यांनीं त्या कारकुना जवळ असलेली ९७५ रुपयांची हुंडी जप्त केली आणि रतनचंद यास हुकूम केला कीं तुमच्या अर्जावरून माधवराव रघुनाथानें अन्यायानें मिळविलेल्या पैशाची हुंडी जप्त केली आहे, परंतु तुह्मी एक महिन्याचे आंत योग्य कोर्टांत किंवा श्रीमंत महाराज साहेबांकडेस अर्ज करून, हुंडी जप्त ठेवण्याविषयीं हुकूम न आणिला तर ती ज्याची त्यास परत देऊं; आणि माधवराव यास हुकूम दिला कीं या हुंडीमुळें तुमचें लग्नाचें काम अडत असेल तर तितक्या रुपयाबद्दल शाहाजोग जमानत मिळत असल्यास तसा अर्ज करावा. त्यावर माधवरावानें रा. ब. बेदरकर साहेबांस अर्ज केला, परंतु कारभारी साहेबांनीं त्याला उत्तर दिलें कीं, अपील कोर्टांत अर्ज करून तिकडील दाखल्यानिशीं अर्ज करावा. हे दाखले नसल्यामुळें अर्ज नामंजूर करण्यांत येत आहे, अशी हकीकत लिहून अन्याय झाला आहे ह्मणून माटचे स्वतःचें डोकें फिरवून घेतात. या हकीकतीवरून विचार करण्यास बरीच जागा आहे. रतनचंद घाशीराम चौधरी गरोठचा राहणार व माधवराव रघुनाथ हा गरोठेस राहणार आणि कारकुनीच्या कामावर असून ९७५ नऊशें पंच्याहत्तर रुपयाची एकदम हुंडी घेऊन इंदूरास आला त्यावरून रतनचंद याला त्या पैशाबद्दल संशय येऊन त्यानें अर्ज दिला. आणि चौकशीसाठीं माजिस्ट्रेटनें ती हुंडी जप्त केली; तरी पण ती हुंडी कशा रीतीनें घेतली याची शाहनिशा माधवरावानें केली अशी हकीकत माटचे देत नाहींत. त्या अर्थीं त्या हुंडीच्या मुळांत किती काळें असेल ह्मणून उभयतां पक्षकारांस आपापलें ह्मणणें खरें करण्यास माजिस्ट्रेट यानें १ महिन्याची मुदत दिली यांत काय वावगें झालें? ज्याला ९७५ रुपयाची हुंडी मिळूं शकते त्याला शाहजोग जमानत कां मिळाली नाहीं? आणि कारभारी साहेबांनीं परस्पर माधवरावाच्या अर्जावर मधलीं कोर्टें बाजूस ठेवून हुकूम तरी काय करावयाचा? या प्रश्नाचा विचार केला ह्मणजे गोष्ट जशी घडते तशी माटचे न देतां स्वतःच्या मनाप्रमाणें गोष्टी बनविण्या पुरती ती घेतात व त्यावर स्वतःचे अकलेचे तारे तोडतात हे सिद्ध होतें. त्यांच्या लिहिण्यांत एकही गोष्ट अशी सांपडत नाहीं कीं जींत तिच्या खरेपणाविषयीं शंका घेण्यास जागा राहत नाहीं.

पृष्ठ १४९ ते १४८ यांत मल्हार अनंत नांवाच्या मनुष्याची हकीकत दिली आहे. त्यांत माटचे ह्मणतात कीं ते फार हुषार होते व त्यांनीं सरकारांच्या गांवाचें

उत्पन्न वाढविलें, त्यांनाही इंदुरांतून काढून दिलें व त्यांचे सर्वस्वी लुबाडून घेतले. त्यांनीं सरकारी काम चांगलें केलें याबद्दल त्यांच्यापाशीं सुभ्यांचे व नायब सुभ्याचे दाखले होते ही हकीकत दिली आहे. परंतु त्या मल्हार अनंताकडेस सरकारी घेणें किती होतें हा आंकडा व त्यांचें वर्तन या महाराजांच्या संबंधानें कशा प्रकारें राहिलें, ह्या गोष्टी कां दिल्या नाहींत ! त्यांच्या जवळच्या दोन दाखल्या वरून भाटचे त्यांची तारीफ करतात परंतु त्या मल्हार अनंत गृहस्थांस महाराजांकडून चांगला दाखला कां मिळवितां आला नाहीं ! ज्याचें अन्न आपण खातों त्या राजपुरुषाचें सरटिफिकेट मिळवितां आलें नाहीं अथवा स्वतःच्या कामाच्या सचोटीविषयीं त्यांस खात्री करून देतां आली नाहीं तर, त्या अमलदारांच्या दाखल्यांस काय धुवून प्यावयाचें आहे ! ही हकीकत देण्यांत भाटचे यांनीं पृष्ठ १४६ च्या दुसऱ्या कॉलम मध्यें एक उदाहरण लिहिलें आहे तें येथें अक्षरशः देतो; ह्मणजे भाटच्याच्या घाणेरड्या व हलकट लोकांच्या सहवासाचें व बाजारबुणग्या भटक्या अवस्थेचें चित्र वाचकांस चांगलें दिसेल. ते ह्मणतात राजे लोकांचे हातून पराक्रम होण्याचे दिवस गेले तथापि स्वतः करितां ते दिवस आहेत असें दाखविण्यास, महाराज स्वतःच्या प्रजेवर जुलूम करून स्वतःचा शूरपणा दाखवितात; कारण ". बरोबरच आहे कीं एखादा शंढ आपली खरी स्थिति लोकांस न समजावी ह्मणून अनेक युक्त्या योजून, वेळीं दुसऱ्याची घाणेरडी लसहीं अंगास लावून आपलें पौरुषत्व व्यक्त करून दाखवितो ". आपले लेखाचें सत्यत्व स्थापीत करण्यास उदाहरण, उपमा, अलंकार वगैरे देण्यासाठीं जो तो लेखक स्वतःच्या शिक्षणानुसार उदाहरणें देतो. आणि ज्या अर्थी भाटचे यांस या खेरीज दुसरे उदाहरण सुचलें नाहीं त्या अर्थी त्याच्या समजाची, गृहस्थितीची व मनाची चांगलीच परीक्षा होत आहे

पृष्ठ १४९ व १५० यांत भाटचे ह्मणतात, शेतकरी लोकांस इंदूर संस्थानांत सुख आहे, असें कोणी ह्मणतात तें अगदीं खोटें आहे. आणि महाराजांनीं २–२॥ लाख रुपायांची बाब रयतेवरची कमी केली त्यापासून रयतेस फायदा झाला नाहीं. इंदूर शहराजवळ हवा बंगला ह्मणून बंगला बांधला आहे, त्याचे आसपास मैदान आहे तेथें हरणें आहेत; तीं ८–९ वर्षांत ४०० वर झालीं आहेत तीं १८ गांवांची उजाडी करतात व महाराज त्या गांवच्या रयतेची दाद घेत नाहींत व त्यामुळें ते लोक धार इलाख्यांत निघून गेलें तरी महाराजांस कांहीं वाटत नाहीं इतकी हकीकत दिली आहे. या संबंधांत खरी हकीकत अशी आहे कीं हवा बंगला येथें महाराजाचे शिकारीसाठीं हरणाचें राखलेलें रान आहे. सर्व राजे

लोकांनीं आपापलीं जंगलें शिकारीसाठीं राखलीं आहेत; आणि हीं जंगलें राखण्याची हौस अथवा रीत पूर्वीपार आहे. इंग्लंडांत सुद्धां आपापलीं मृगया स्थानें राखण्याची रीत आहे. या रानाच्या समोंवतीं असणाऱ्या गांवच्या जमिनीस हरणामुळें होत असलेल्या नुकसानीचा विचार करून त्या जमिनीस दर कमी ठेविला आहे. आणि त्या गांवाची लोक वस्ती व शेतकऱ्यांची संख्या जी पूर्वीं होती, ती या हरणाच्याच कारणानें कमी झाली असें मुळींच नाहीं. असें होतें तर भाटचे यांनीं तिचें प्रमाण कां दाखविलें नाहीं? जमिनीची स्थिति जेथें हरणें नाहींत तेथें सुद्धां १२ वर्षांनीं पालटत राहते. शिवाय ज्या लोकांस हरणाचा त्रास होत असेल त्यानें शेती केलीच पाहिजे असा त्यांच्यावर दाब मुळींच नाहीं. राजपुरुषांचे मृगयेकरितां आबादींत असलेलीं गांवें सुद्धां रानांत घेतलीं जातात हे इतिहासांत स्पष्ट आहे; आणि राजे लोकांनीं अशा कामीं कांहीं गांवें जरी उजाड केली तरी पण त्यांना दोष देतां येत नाहीं. भाटच्याच्या अंगीं राजवैभवांतील एखाद्या, त्यांतून मृगयेसारख्या विषयाची कल्पना तरी कोठून असावयाची!

पृष्ठ १९१ यांत भाटचे यांस कांहीं लिहिण्यास नाहीं म्हणूनच कीं काय महाराज इंदुरास तारीख २४ रोजीं गेले व महाराजांनीं महेश्वर व रामपुरा जिल्ह्यांतील कारकूनांची बदली अरसपरस करण्याचा हुकूम दिला हेंच लिहिलें आहे. आणि १९१ व १९२ यांत सखाराम गणेश शिरसाळकर यांच्या आतेचा मुलगा गेल्या १९ वर्षांपासून मंडलेश्वरच्या जज्ज कोर्टांत नोकर होता त्यास महाराजांनीं नोकरींतून दूर केला; व बळवंतराव नांवाचा एक कारकून जज्ज कोर्टांत होता तो रावजी गोरे यांचा शालक होता त्यास वजा केला; व हा मनुष्य पूर्वीं शिवराम बल्लाळ खासगी जज्ज यांच्या हाताखालीं होता म्हणून शिवरामपंतावरही गदा आली असें लिहिलें आहे. महाराज इंदुरास गेले आणि कारकुनांची बदली एका जिल्ह्यांतून दुसऱ्या जिल्ह्यांत केली यांत निंदकाखेरीज इतरांस विचार करण्यासारखी तर काय परंतु लक्षांत घेण्यासारखी सुद्धां गोष्ट नाहीं. आतां शिरसाळकरांच्या आतेभावास व रावजी गोरे यांच्या शालकास नोकरींतून वजा केल्या बद्दलच्या हकीकतीचा विचार करूं. शिरसाळकरांच्या वगैरे यांच्या आप्तांपैकीं कोणकोण कोठें नोकर आहेत याची यादी मागें पुष्कळ वर्षां पूर्वीं महाराजांनीं सरक्युलर हुकूम करून मागितली होती. त्याप्रमाणें अमलदारांनीं यादी पाठविली, त्या यादींत या दोघांचीं नांवें घातलीं गेलीं नव्हतीं व गोरे यांचा शालक ज्या वेळेस शिवराम बल्लाळ यांच्या हाताखालीं खासगी जज्जाच्या कोर्टांत नोकर

होता, त्याच वेळेस रावजी गोरे यांच्या आप्तवर्गातील लोकांची यादी सरक्युलरें करून हुजूर मागविली गेली होती. त्या वेळेस ह्या बळवंतरावाचें नांव त्या यादींत कोणीं दाखविलें नाहीं. त्या वेळेस खासगींत ना. दिवाण रा. रा. नागो भिकाजी व जज्ज रा. रा. शिवराम बल्लाळ होते आणि शिवराम बल्लाळच्या हाताखालीं बळवंतराव नोकर होता; तेव्हां पासून हा नोकरींत राहिला आणि रावजी गोरे यांच्या आप्ताविषयीं माहिती द्यावयाची ह्मणून गोरे यांच्या लांबच्या नातेवाईकांचीं सुद्धां नांवें कळविलीं गेलीं आणि खासगींतील अमलदारांनीं गोरे यांच्या प्रत्यक्ष शालकाचें नांव कळविलें नाहीं. इतकेंच नव्हे तर रा. शिवराम बल्लाळ यांस महाराजांकडेस सुनावणीस जाण्याची संधी येत होती, असें असतां त्यांनीं महाराजांस हा मजकूर श्रुत केला नाहीं, हें महाराजांस नुकतेंच मंडलेश्वरीं कळलें तेव्हा त्यांनीं शिवराम बल्लाळ यांजला नोकरींतून वजा करण्याची आज्ञा केली. राजरहस्याच्या गोष्टीमुळें किंवा राजद्रोहामुळें गोरे यांस व त्यांचे आप्तांस नोकरींत ठेवणें नाहीं अशी आज्ञा महाराजांनीं सरक्युलरांनीं केली आणि त्याच सरक्युलरानें बारीक सारीक नातेवाईकांची नांवनिशी महाराजांस कळविली व गोरे यांचा प्रत्यक्ष शालक व तो त्यांचा शालक आहे हें त्याच्या अमलदारांस माहीत असतां हुकूमाप्रमाणें त्याचें नांव कळविलें नाहीं या राजाज्ञा भंगतेबद्दल फक्त नोकरींतूनच दूर करण्याची शिक्षा फारच कमी झाली असें सुधारलेलीं राष्ट्रें सुद्धां कबूल करतील. आतां शिवराम बल्लाळ यांनीं हें नांव कळविलें नाहीं असें आह्मी ग्रहीत धरतों किंवा महाराजांनीं ग्रहीत धरलें, त्यास आधार, सरक्युलर झालें तेव्हां गोऱ्यांचा शालक बळवंतराव हा शिवराम बल्लाळ यांच्या कोर्टांत होता व त्याला गोऱ्यांच्याच शिफारसीनें नोकरी दिली होती व तो गोऱ्यांचा शालक होता हें त्यांस माहीत होतें हें होय; आणि हीं नांवें व झालेलें सरक्युलर माहीत नव्हतें असें रा. रा. शिवराम बल्लाळ कदापि सांगू शकावयाचें नाहीं. त्यांचें ह्मणणें आह्मांला चांगल्या आधारें कळलें आहे तें हें कीं रा. रा. नागो भिकाजी यांनीं खासगींतल्या सर्व कारकुनांस समक्ष बोलावून त्यांच्याविषयीं तपास करून हुजूर रिपोर्ट केला, त्यामुळें स्वतंत्र रीतीनें रिपोर्ट करण्यास त्यांना कारण पडलें नाहीं. आणि रा. रा. नागो भिकाजी यांनीं रिपोर्टांत बळवंतरावाचें नांव घातलें नव्हतें हें त्यांना माहीत नव्हतें असें जरी आहे तरी पण बळवंतराव हा गोऱ्याचा शालक आहे आणि नागो भिकाजींनीं कारकुनांस ह्या नात्याची चौकशी करण्यास समक्ष बोलाविलें होतें व तदनंतर कांहीं दिवसांनीं गोरे यांच्या आप्तांस नोकरींत ठेवूं नये ह्मणून ठरलें व ते लोक नोकरींतून दूर केले गेले, ह्या गोष्टी

रा रा. शिवराम घल्लाळ यांस माहीत होत्या; आणि इतर नातेवाईक नोकरींतून वजा झाले असतां गोरे यांचा प्रत्यक्ष शालक नोकरींत राहिला त्यावरून रा. रा. नागो भिकाजी यानें त्याचें नांव कळविलें नसेल हें समजण्याजोगें, त्यांचें डोकें व त्यांचा हुद्दा होता; आणि ह्मणून ही बातमी त्यांनीं महाराजांकडेस ते जात येत होते त्यावेळेस महाराजांस कळविली पाहिजे होती. शिवाय इतकी मोठी गडबड वाटण्या जोगी आप्तांची चौकशी झाली आणि ती महाराजांच्या हुकुमानें झाली व त्या आप्तांतून बळवंतराव हा नोकरींत राहिला असें कळल्या नंतर रा. रा. शिवराम यांस स्वाभाविक रीतीनें रा. रा. नागो भिकाजी यांनीं, याचें नांव कळविलें कीं नाहीं हें कळून घेण्याची इच्छा झाली पाहिजे; आणि ती झाली नसेल व त्यावर त्यांनीं माहिती मिळविली नसेल असें मानतां यावयाचें नाहीं. यावरून बळवंतराव हा गोरे यांचा शालक आहे आणि जरी त्याचें नांव रा. रा नागो भिकाजी यांनीं कळविलें नाहीं तरीपण शिवरामपंतानीं तें कळविण्याचें होतें तें टाळलें आणि महाराजांची आज्ञा भंगलेली पाहून स्वस्थ बसले आणि या दोषापासून सहज मुक्त होतां येण्याचे मार्ग टाळले असें तरी निदान ह्मणतां येईल.

पृष्ठ १९२ ते १९४ यांत दिवाण बहादूर आर. रघुनाथराव हे जेव्हां इंदुरास होते तेव्हांच्या त्यांच्या कारकिर्दीविषयीं तारीफ करून ते हिंमतबाज मिनिस्टर होते ह्मणून लिहिलें आहे. आणि त्यांच्या हिंमतबहादरीची एक गोष्ट दिली आहे ती अशी कीं एकदां दिवाण बहादूर २० दिवसांचे रजेवर गेले होते; त्यांच्या मागें एका अर्जदारानें एका महाल ऑफिसराविरुद्ध अर्ज महाराजांकडेस दिला. महाराजांनीं त्या अर्जा संबंधीं चौकशी करण्यास एका जज्जास हुकूम दिला; त्या जज्जानें चौकशी करून डिपार्टमेंटल रिपोर्ट केला; तो रिपोर्ट दिवाण बहादूर रजेवरून परत आल्यावर त्यांच्या पुढें सुनवायीस निघाला. तेव्हां काय प्र[illegible]ा आहे, असें शिरस्तेदारांस त्यांनीं विचारल्यावर, त्यांनीं त्यांना सर्व हकीकत सांगितली ती ऐकून दिवाण बहादुरांनीं तें प्रकरण दाखल दप्तर करण्यास हुकूम दिला. पुष्कळ लोकांनीं व सरकारी वकिलांनीं दिवाण बहादुरांनीं तें प्रकरण पाहवें ह्मणून विनंती केली व सांगितलें कीं, "एकवेळ अर्जदारास समक्ष बोलावून पहावें; त्याला पहाण्या बरोबर तो फार खरा आणि चांगला आहे अशी आपली खात्री होईल." तेव्हां कारभारी साहेबांनीं त्यांना उत्तर दिलें कीं, "डोळ्यांनीं केवळ पाहून मनुष्याची परीक्षा मला करतां येत नाहीं. ती परीक्षा आमच्या महाराजांना उत्तम आहे." ही हकीकत माटचे यांनीं "विक्षिप्तांत न आलेला मजकूर

ह्मणून शिरो लेखाखालीं दाखल केला आहे. त्याचा विचार अवश्य झाला पाहिजे. प्रथम तर ही गोष्ट घडलीच नाहीं. कारण त्यांत एका अर्जदारानें एका महाल अम्मलदाराविरुद्ध अर्ज दिला आणि त्याची चौकशी करण्यास एका जज्जाकडेस हुकूम दिला. अशी उडवा उडव आहे. शिवाय स्वतः रजेवर गेल्या दरम्यान महाराजांनीं अर्ज घेतला आणि त्यावर हुकूम दिला ह्मणून झालेल्या चौकशीचें महत्व, निदान तो वांचून पहाण्या पुरतें सुद्धां नाहीं असें दिवाण बहादुरांनीं कधींही ह्मटलें नसावें. कारण महाराजांचा श्रेष्ट अधिकार व वाटेल तेव्हां अर्जदारांचे अर्ज ऐकण्याचा अधिकार रघुनाथरावांस माहीत नसावा असें ह्मणणें निःव्वळ मौर्ख्य आहे. वरिष्ट कोर्टास खालच्या कोर्टाचे अधिकार आहेत हे दिवाण बहादुरांच्या कायद्याच्या एकीकरणांत स्पष्ट आहे आणि ही गोष्ट साधारण अकलेच्या मनुष्यास सुद्धां करण्यासारखी आहे. अर्जावर चौकशी करण्या पलिकडे महाराजांनीं विशेष हुकूम दिला नव्हता, त्या अर्थी तर त्यांत कोठलेंच प्रोसीडिंग बिघडलें नव्हतें; आणि मोठी मुद्याची गोष्ट ही आहे कीं स्वामिभक्त दिवाण बहादूर, वकील व इतर लोकांपुढें महाराजांच्या निंदेपर वाक्य बोलले हें कधींच खरें मानतां यावयाचें नाहीं. दिवाण हा राज्यस्तंभ आहे आणि प्रसंग विशेषीं तो राजास दाबणारी व्यक्ति आहे आणि ज्याअर्थी दिवाण बहादूर वयांत व अनुभवांत महाराजा पेक्षां श्रेष्ट होते त्याअर्थी त्यांना महाराजांस दाबतां येत होतें व ते त्यांच्याकडून होणाऱ्या चुकीची दुरुस्ती करीत होते अशा सर्व गोष्टी मान्य करतां येतील. परंतु भाटचे यांचे बनावटी लिहिलेलें वाक्य दिवाण बहादूरच्या मुखांतील आहे हें ह्मणणें कदापि शोभत नाहीं. आतां भाटचे यांची समजूत करूं. असें मानूं कीं दिवाण बहादुर तें वाक्य बोलले तर त्यांत त्यांनीं महाराजांची स्तुती केली नाहीं हें कशावरून ? कारण राजेलोक ईश्वरांश आहेत; निदान ते आपापल्या राज्याचें प्रभू आहेत आणि त्यांना जितके प्रसंग माणसांच्या परिक्षेचे असतात तितके इतरांना नसतात. आणि त्यामुळें दिवाण बहादुरांनीं ह्मटलें असेल तर तें वाक्य महाराजांच्या स्तुतिपर ह्मटलें असलें पाहिजे. सामुद्रिक शास्त्र वगैरेचें महत्व भाटचे यांच्या लिहिण्यावरून नाहींसें होत नाहीं; आणि तोंडावरून परीक्षा करण्यांत पुष्कळ गोष्टी जुळत्या येतात हेंही ठरून चुकलें आहे. कदाचित् दिवाण बहादूर यांनीं तें वाक्य स्वतःच्या पोक्तपणामुळें आणि त्यांच्या मनांत महाराजाविषयीं जी भक्ति होती त्यामुळें ह्मटलें असेल तरी त्यांत त्यांचा हेतु त्या वाक्याचा अर्थ निंदापर मानला जावा अथवा त्याचा उपयोग, भाटचे यांच्याकडेस लिहून पाठविणाऱ्या क्षुद्र बुद्धिचे लेख-

कानीं दर्शवूं पाहिला आहे, तसा करावा असा मुळींच नसला पाहिजे. अतएव माटचे यांच्या निंदक स्वभावास चांगल्या गोष्टी सुद्धां वाईट दिसतात हें त्यांचे दुर्भाग्य तर खरेंच पण त्यांतल्या त्यांत त्यांच्या मानसिक सुधारणेचेंही प्रतिरूप दिसत आहे. सामुद्रिकाचें ज्ञान इतकें खरें आहे कीं, तेणेंकरून 'विक्षिप्त' पत्रांत खुर्चीवर बसून समोरच्या टेबलावर ठेविलेल्या कांटचाकडे पहात असलेल्या चित्रावरून वाटेल तो साधारण अकलेचा मनुष्य माटचांची किंमत समजूं शकेल. पृष्ठ १५४ व १५५ यांत तेच शहाणे लेखक लिहितात कीं महाराजांच्या " विक्षिप्तांत आलेल्या ११ गोष्टी कोणी खोट्या कां ठरवीत नाहींत? त्यांनीं दिलेल्या ११ गोष्टी त्या ह्या.

१ महाराजांनीं कोणासही इंदूर शहरांतून निघून जाण्याचा हुकूम केला नाहीं.

२ कोणासही मारपीट कधींही केली नाहीं.

३ कोणा एकासही स्वतःचे हुकुमानें कैदेंत पाठविलें नाहीं.

४ दरबारांतून किंवा कोणत्याही योग्य अधिकाऱ्याच्या अभिप्राया वांचून कोणा एकाच्याही मालमत्तेची जप्ती केली नाहीं. व जी केली ती न्यायानें व इनसाफानें आणि कायद्याप्रमाणें योग्य कारणांकरितां केली..

५ इंदुरास जे कायदे चालू आहेत व त्यावरून ज्या सरकारी अधिकाऱ्यांस जे अधिकार दिले आहेत ते आपल्या अधिकारांत हुजूर शिरस्त्याप्रमाणें अपील किंवा दरबारनें योग्य विचार केला नाहीं ह्मणून अर्जदारांस हुजूर अर्ज करणें भाग पडलें आणि तसा अर्ज आल्या वांचून कोणच्याही कामांत महाराजांनीं कधींच हात घातला नाहीं.

६ नाव्ही, धोबी, शिंपी, यांच्या वाईट काम करण्यामुळें वाणी सावकार लोकांपासून ३५ हजार किंवा कमी जास्त रुपये वसूल करण्याचा जो वेडेपणाचा आणि मूर्खपणाचा हुकूम केला गेला तो महाराजांनीं केला नाहीं.

७ महाराजांनीं जे कामवाले लोक इंदुरास व महालीं नेमिले आहेत ते त्या त्या कामाच्या लायक व हुशार असे नेमिले आहेत.

८ जुने किंवा आजपर्यंत जे सरकारी नोकर लोक नोकरींतून वजा केले ते ज्याच्या हाताखालीं किंवा दरबारच्यां ताब्यांत ते नोकर होते त्यांच्याकडून ते कामास लायक नाहींत असा रिपोर्ट आल्यावांचून किंवा हुजूर समक्ष त्याची योग्य चौकशी केल्या वांचून कोणाएकासही नोकरींतून वजा केलें नाहीं.

९ सापत्न मातुश्रीकडेस पायपोस वगैरे अमंगळ वस्तूंचा नजराणा पाठविला नाहीं.

१० इंदुरचा राज्य कारभार तेथील कायद्याप्रमाणें तंतोतंत चालतो व कायद्याविरुद्ध जें एखादें काम होतें ते केवळ न्यायाकरितांच होतें.

११ महाराजांनीं जे ४ जाहिरनामे छापले ते शहाणपणानेंच छापले आहेत.

या अकरा कलमा वाचून 'विक्षिप्तांत' लेख लिहून पाठविणारे हे विक्षिप्तच आहेत हें ठरतें. कारण ह्या अकरा गोष्टी खोट्या ठरल्या नाहींत असें मानण्यास त्यांनीं स्वतःचा आधार दिला नाहीं व केवळ 'विक्षिप्तांत' आलेल्या लेखावरूनच स्वतःची अक्कल वाहविली आहे. तथापि त्यांच्या लेखांचाही विचार करूं. त्यांचे ११ प्रश्न मोघम असल्यानें त्यांस आह्मीं जें रूप देतों तें:—

१ कोठलें राष्ट्र असें आहे कीं, जेथील राजानें स्वतःचे राज्यांतून कोणासही निघून जाण्याचा हुकूम केला नाहीं ? उत्तर—अपराध्यांस हद्दपाराची शिक्षा राजे लोक देतात.

२ कोठला राजा असा आहे कीं ज्यानें कधींही कोणास मारिलें नाहीं ? अथवा कोठला पिता असा आहे कीं ज्यानें स्वतःच्या प्रिय मुलांसही मारिलें नाहीं ? उत्तर—अपराध्यास राजे लोक शिक्षा करितात.

३ कोठला राजा असा आहे कीं ज्यानें स्वतःचे हुकुमानें [illegible]ासही कैद केलें नाहीं ? उत्तरः—कैद करण्याचा व करविण्याचा अधिकार राजाचा आहे.

४ व ५ कोठला राजा असा आहे कीं त्यानें अर्जदाराचा प्राथमिक अर्ज कधींच ऐकला नाहीं ? व हाताखालच्या अमलदारांच्या मार्फती वांचून एखाद्या कामांत हात घातला नाहीं ? उत्तर—हाताखालच्या लोकांस असलेले अधिकार वरिष्ठांस आहेत व प्रसंग विशेषी अथवा मरजी प्रमाणें वाटेल तें काम वाटेल त्यावेळीं वाटेल त्या स्थितींतले पाहण्यास राजाचा अधिकार आहे.

६ एकानें केलेल्या नुकसानींत दुसरे साह्यकारी असतात काय ? व त्यांच्या कडून नुकसान घेतलें जातें काय ? उत्तर—चोरांस व अपराध्यांस जाती महत्व नाहीं व अपराध्यांस साह्यकारी लोकांसही शिक्षा दिली जाते.

७ जेथें सर्व अमलदार कामावर नेमण्या बरोबरच कामाच्या योग्य असतात किंवा नेमलेले नोकर स्वतःचे कामाला कधीं नालायक ठरत नाहीं असें राज्य कोठलें आहे ! उत्तर—कामावर नेमले जाणारे सर्वच लोक प्रथम कामाला नवीन असतात. लायकी नालायकी काम करण्यांत समजतें आणि गुलाबालाही कांटे असतात.

८ दरबारच्या मध्यस्ती शिवाय अथवा अमलदारांनीं चौकशी करून कळविल्या शिवाय राजांस स्वतःच्या मतानें एखाद्या नोकरांस नोकरींतून दूर करतां येतें काय ?

उत्तर—प्रत्येक मनुष्य स्वतःच्या मताप्रमाणें एखादी गोष्ट वाईट अथवा बरी ठरवितो आणि राजास स्वतःची खात्री होण्या पुरती चौकशीकरून एखाद्यास नोकरींतून वजा करतां येतें.

९ जी रीत आह्मांस बरी वाटत नाहीं ती रीत इतर जातींत असावी काय? उत्तर—जातीच्या रीती भाती निरनिराळ्या आहेत. उच्च ब्राह्मण जातींत सुद्धां नवरा नवरी एकमेकाच्या अंगावर गुळण्या टाकतात व वाणी जातींत बायका परस्परांस लाडानें शिव्यांचीं गाणीं गातात; व कांहीं गोष्टी ज्यांचा आपण एरव्हीं धिक्कार करतों त्या आपणांस मंगलकार्यांत अजून कराव्या लागतात. राजभेट ह्मणून लग्नांत विहिणींच्या भेटी होतात परंतु त्या भेटीच्या वेळेस, सुप, घुंघुरमाळ, जोड्यांची माळ, केरसुण्या, राखेच्या पुरचुंड्या, अशा जिनसा बरोबर नेतात. ज्या गोष्टी सामाजिक नसून केवळ गृहकुटुंबाच्या आहेत व बाहेरील मनुष्यानें ज्यांचा विचार करावयाचा नाहीं त्यामध्यें तिऱ्हाइतानें आपलें ज्ञान दाखविणें मौर्ख्य होय.

१० असें राज्य कोठलें आहे कीं जेथें प्रत्येक बाबतींत तंतोतंत न्याय होत असतो? उत्तर—एकही नाहीं. काळा गोरा हा भेद खुद्द इंग्लिश राज्यांत कधीं कधीं दृष्टीस पडतो, मग नेटीव्ह संस्थानांतील लहानशा गोष्टींत घडलेली विसंगतता पाहून त्यावर अन्याय अन्याय ह्मणून अकांड तांडव करण्यांत काय अर्थ आहे? चांगल्या शहरांतही महारवाडा असतो ह्मणून तो सर्व गांव महारांचा ह्मणवेल कीं काय? लोकांचें उणें पहाण्याची वाईट बुद्धि ज्याच्या अंगीं आहे, त्यासच असें बहकणें शोभलें तर शोभेल!

११ छापलेले जाहिरनामे चांगले किंवा कसे? उत्तर—त्यांतील मुद्दे पाहून व ते कोठल्या लोकस्थितीस उद्देशन प्रसिद्ध केले हें पाहून त्यांचें चांगूलपण अथवा वाईटपण ठरावयाचें आहे.

वरील ११ प्रश्नांचा उलगडा केला आहे त्यावरून इंदुराधिपतिविषयीं माटच्यांचा साथीदारांनीं लिहिलेल्या ११ गोष्टी किती खोटच्या व उणें पहाण्याच्या दृष्टीनें लिहिल्या याचा विचार वाचकांनीं करावा.

पृष्ट १९९–१९६ व १९७ ह्यांत महाराजांवर मोघम दोष लादला आहे आणि ह्मटलें आहे कीं आतां इंदुरच्या प्रजेनें जो त्रास सहन केला आहे तसा त्रास इतर कोठलीही प्रजा सहन करणार नाहीं. या लिहिण्यांत एकही मुद्दा नाहीं कीं त्याच्यावर विचार केला पाहिजे. "वगैरे" व "इत्यादि" या शब्दांच्या महत्वा प्रमाणेंच या पानांत लिहिलें आहे.

पृष्ट १९७ तें १७४ यांत शिवाजीराव महाराजांची वागणूक ह्मणून भाटचे यांनीं लिहून आलेला मजकूर या शिरोलेखाखालीं, खोटचा गोष्टी यथेच्छ लिहिल्य आहेत. आणि त्यांत भाटचे यांनीं जे खोटे लेख विक्षिप्तांत आणि त्यांच्या इंदूर प्रकरण भाग१ यांत लिहिले आहेत, तेच्या तेच निराळ्या वाक्य रचनेंत लिहिलेले आहेत. लिहिणारांचें नांव नाहीं व गांव नाहीं. फक्त अडाणी लोकांस असें वाटावें कीं भाट्यां खेरीज इतर लोकही असें लिहितात, ह्मणून " लिहून आलेला मजकूर " या झोंकावर पुस्तक मोठें करण्यासच भाटचे यांनीं हीं पानें रंगविलीं आहेत. ह्या पानांत खोटें व फितुरी लिहिण्याची त्यांनीं कमाल केली आहे. भाटचे ह्मणतात " महाराजांनीं स्वत:चे सापत्न बंधूंस आपल्या कापटच प्रभावानें या जगांतून नाहींसें केलें. " कां कमाल आहे कीं नाहीं या नीच लेखकांच्या व तो प्रसिद्ध करणाऱ्या भाटचांच्या फितुरीपणाची ? आपलीं पोटें जाळण्यास राजे लोकांवर खोटे आरोप आणण्यास व त्यांच्या विरुद्ध खोटचा साक्षी देण्यास तयार होणारे लोक हे असेच असतात. बिच मल्हारराव गायकवाडा विरुद्ध, त्यांनीं कर्नल फेअर यांस विष देण्याचा प्रयत्न होता ह्मणून खोटी साक्ष देण्यास महाराजांचेंच अन्न खाऊन भिकाऱ्यांचे श्रीमंत बनलेले लोक तयार झाले होते, त्यांचे वर्गांत भाटचे व त्यांच्या बातमीदारांची गणना केली असतां बिलकूल अडचण नाहीं.

पृष्ठ १७९ ते १७८ यांत भाटचे यांनीं लिहिलें आहे कीं महाराज इंदुरास आले होते ते पुन: बढवाईस गेले. इंदुरास कर्नल बार साहेब त्यांना भेटण्याकरितां आले होते. काय बोलणें झालें तें समजलें नाहीं. नथु दफेदार मालेकरी बेडा, रखमाजी जमादार, युसूफ जमादार, गणुलष्करी कामाठी, लछमन कामाठी, खंडू कामाठी, मुलकी अय्या व एक इसम हे आठ पूर्वींच कैद होते, ते त्या वेळपासून शागीर्द पेशा कचेरींत कैद आहेत व त्यांच्या पायांत बिड्या घालण्याचा विचार चालू आहे. ह्या लोकांना बिड्या घालण्यास महाराजांनीं शागीर्द पेशा कामदार रा. रा. बळवंतराव पांडुरंग यांस सांगितलें, त्यांनीं महाराजांजवळ लेखी हुकूम मागितला; मग महाराजांनीं खुद बेदरकरांस बोलावून तसें करण्यास सांगितलें, पण त्यांनीं ही गोष्ट नाकारली. त्यांना महाराजांनीं असेंही सांगितलें होतें कीं रा. रा. बळवंतराव पांडुरंग यांच्याही पायांत बिड्या घाला, परंतु बेदरकरांनीं हें साफ नाकारिलें' ता. २८ रोजीं बेदरकर सुरतेस त्यांच्या कुटुंबांच्या आजारिपणा बद्दल निघून गेले. बेदरकरांच्या जागीं राय नानकचंदजी यांस तूर्त रुपये १६०० दरमहा करून कारभारी नेमलें आहे व त्यांना मृगजलवत् अधिकार दिले आहेत. बेदरकर पुन: इंदुरास कामावर येणार नाहींत. रायनानकचंद-

[illegible] कारभार [illegible] तु त्या जागेच्या लायक ते नाहींत. तुरुंगांत जें कैदी महाराजांच्या हुकूमानें पाठविले जातात त्याबद्दल लेखी वारंट जेलरनें मागितलें, यामुळें त्याला नोकरींतून वजा करून पलटूसिंग उर्फ पलटणसिंग नांवाच्या मनुष्यास जेलर नेमिले; त्यांनीं तीन चार दिवस तें काम केल्यावर त्याचे जागीं उस्ताजी सुपरिन्टेंडंट पोलीस यांस नेमिले आणि पलटणसिंगास सुप्रिटेंडेन्ट नेमिले अशा खबरा भरकटल्या आहेत.

माटच्यांनीं हें जे लिहिलें आहे त्यांत असें साफ निष्पन्न होतें कीं महाराजांच्या खासगत नोकरांस सुद्धां ते त्यांची चौकशी केल्या वांचून शिक्षा करूं इच्छित नाहींत. आणि तों पावतों त्यांना शागीर्द पेशा कचेरींत ठेविले आहेत. जर महाराज जुलुमी असते तर मग कामाठी, आचारी अशा लोकांवर त्यांनीं केव्हांच आग पाखडली असती. ज्या सात इसमांचीं नांवें दिलीं आहेत ते महाराजांच्या अगदीं खासगत नोकरांपैकीं होत आणि त्यांचा संबंध कोठी कारखान्याशीं असल्यानें [illegible]ंत जें सरकारी नुकसान झालें त्यांत त्यांचें अंग असण्याचा पूर्ण संभव आहे. आणि त्यांची चौकशी करण्यासाठींच त्यांना सस्पेंड करून शागीर्द पेशांत ठेविले आहेत असें खास ठरत आहे. रा. रा. बळवंतराव पांडूरंगांस बिड्या घालण्याचे महाराजांनी सांगितलें हें निव्वळ बनाऊ लिहिणें आहे. कारण जर महाराजांच्या मनांत तसें करावयाचें असतें तर मग निदान बळवंतराव पांडुरगांस नोकरींतून तरी काढलें असतें. परंतु तसें झालें नाहीं. राय नानकचंदांचा कारभार पाहिल्या वांचून ते योग्य कारभारी नाहींत असें कशावरून ह्मणतां येईल ? त्यांनीं या राज्यांत निरनिराळीं मोठ मोठीं कामें केलीं आहेत व चीफ रेव्हिन्यू ऑफिसरांचें व नायब कारभारीचें काम पुष्कळ वर्षे केलें आहे; शिवाय त्यांनीं कारभारी साहेबांच्या गैर हजरींत पुष्कळ वेळां कारभाऱ्यांचें ही काम केलें आहे. व संस्थानाविषयीं पूज्य बुद्धि वास करण्याचें जें मोठें कारण असतें, तें यांच्या संबंधांत पूर्ण आहे. कारण ते या संस्थानचे एक पिढीजाद जाहगीरदार आहेत. व इंग्लीश लोकांत सुद्धां ते नांवाजलेले आहेत. अर्थात ते चांगला कारभार करतील अशी सर्वांना आशा आहे. आणि त्यांनीं कामही चांगलें चालविलें आहे. पलटनसिंगास जेलसुप्रिटेंडन्ट व नंतर पोलिस सुप्रिटेंडन्ट नेमिलें यांत कोठला मुद्दा विचाराचा आहे ? नेमणूक करण्याचा महाराजांचा अधिकार आहे; आणि चांगली नोकरी करणें नोकरांचें कर्तव्य आहे.

पृष्ठ १७९ व १८० यांत काय तें सखाराम मार्तंडचें व महाराजांचें भांडण

झालें व त्यांच्याकडचे सरकारी घोडे महाराजांनीं परत घेतली या कर्नल " साहेब एजंट साहेब दोऱ्यावर गेल्या बरोबर अर्जदारांच्या निकालासाठीं नेमलेला कमिटी मोडून टाकली. रामराव काळे नांवाच्या मनुष्याकडेस सरकारी घेणें काढून त्याचें घर लिलांव करण्यास आरंभ केला. आणि त्याचें १५० रुपये गोपाळराव भैय्यांनीं लाविलें. रामराव याला सरकारी देणें नव्हतें. परंतु त्यांच्या जागेचा लिलांव दोन वर्षांपासून होत आहे. ता. २७ रोजीं त्याला महाराजांनीं समक्ष बोलावून त्याला शिव्या दिल्या व त्याला कैद केला व मग इंदुरांतून काढून दिला. तो छावणींत बंड साहेबांकडेस गेला एवढेंच वृत्त आहे. यांत सखाराम मार्तंडांचें व महाराजांचें भांडण झालें आणि महाराजांनीं त्यांचे येथें असलेले सरकारी घोडे परत घेतले या वरून सखाराम मार्तंडांच्या येथें सरकारी घोड्यांचा बंदोबस्त पाहिजे तसा राहिला नसेल ह्मणून महाराजांनीं घोडे मागविले असतील असें कां समजूं नये? कारण इतर कारणानें महाराज त्यांच्यावर नाराज झाले असते तर घोड्या खेरीज सखाराम मार्तंड यांच्याकडून सरकारी कामें व लवाजमासुद्धां मागविला गेला असता. बंडसाहेब दोऱ्यावर गेल्या बरोबर कमिटी मोडून टाकली ही गोष्ट मात्यांच्या ह्मणण्याप्रमाणें खरी असली तर माटचे यानीं पूर्वीं ह्मटलें आहे कीं कमिटी नेमली तो एक फार्स केला आहे हें खोटेंच ठरतें; कारण जर कमिटी नुस्ता फार्सच होता तर बंडसाहेब दोऱ्यावर गेल्या बरोबर ती मोडून टाकण्याचें तरी कारण नव्हतें. कारण तो फार्सच होता. अर्थात माटचे, याची जीभ त्याच्या तोंडांत वास करीत नाहीं.

रामराव काळे यांचें घर दोन वर्षांपासून जर लिलांवांत होतें तर ती मुदत त्याला स्वतःकडे सरकारचें घेणें नाहीं ही गोष्ट सिद्ध करण्याला कमी नव्हती. त्याच्याकडील घेण्यासाठीं त्याचें घर दोन वर्षांपावेतों लिलावांत राहिलें ह्मणजे त्याची पूर्ण किंमत येण्यास अथवा दीडशें १५० रुपयाहून जास्त रुपयांच्या योग्यतेचें तें घर होतें अशी रामराव काळे यांचीच खात्री असती, तर कोणास सांगून त्यानीं किंमत वाढविली असती अथवा १५१ रुपयाला स्वतः तरी तें परत घेतलें असतें. आणि ही कृती करण्यास त्याला दोन वर्षांची मुदत कमी नव्हती. आणि या मुदतींत त्याला किती तरी नोटीसा झाल्या असतील आणि ज्या कोर्टांतून सरकारी घेण्या पेटे हें घर लिलांव करण्याचा ठराव झाला असेल त्यावर अपील करण्यास त्याला पुष्कळ मुदत होती. रामरावजीकडच्या सरकारी घेण्याच्या संबंधांत त्याचे आणखी कितीएक अपराध, त्याला हंकलून देण्या पुरते दिसल्या वांचून महाराजांनीं त्याला घालवून दिला नसेल. जर महाराजांच्या मनांत त्याला उगाच काढून द्यावयाचें

दोन ... ने त्याच्या घराचा लिलांव होत राहण्याची तरी मु-
...असती ?
...दित कां मिळालें ते १८४ पावेतों " धनुर्धारी " नांवाच्या लेखकांत भाट्यांनीं दोष
पृष्ट ...णे महाराजां विरुद्ध भाटचे यांनीं जी द्वेष बुद्धि खोटे लेख लिहून
दिला आहे अ..., त्याची गोळा बेरीज केली आहे. नवीन वृत्त कांहीं नाहीं.
दाखविली अ...८४ ते १८९ यांत भाटचे यांच्या कोणा मित्रांनीं स्वतःचा तमास-
...द्दा व्यक्त करण्यास कीं काय, महाराजांच्या निंदापर लावण्या लिहिल्या
गिरीचा धं... नवीन वृत्त वगैरे नाहीं मोघम दोषारोप आहेत. त्यांच्या पुस्तकांची
आहेत त्यं... आहेत ती सांपलीं आणि त्यांतील लेखांवर आह्मी- त्या लेखां पुरतेंच
१८९ ए...तही दिलें आहे. दोन्हीं पक्ष वाचकांपुढें तयार आहेत. या सर्व पानांत
आमचें ! समजतें " कळतें " लोक ह्मणतात " " असें ऐकण्यांत येतें " या आवा-
" अ... लिहिलेले लेख शेंकडा नव्याण्णव आहेत. डोळ्यांनीं पाहिलेली, खऱ्या
नांवानीं पुढें आलेली, दोन्हीं पक्ष समजून घेऊन टरविलेली अथवा निदान साधारण अकलेचा उपयोग करून समजून घेतलेली अशी एकही गोष्ट लिहिली नाहीं. बऱ्याच ठिकाणीं कोर्टांतील मुकद्दमे घेऊन त्यावर अपील कोर्टांतून होणाऱ्या ठरावाची वाट न पहातां लिहिलेले लेख आहेत. एकूण सर्व लेख व्यक्तिनिष्ठ असून ते एक-पक्षीय आहेत; आणि त्या पक्षाला भाटचे मिळालेले आहेत. पुनःपुनः त्याच्या त्याच बनाऊ गोष्टी "लिहून आलेला मजकूर" " एका मित्राकडून " "एका गृहस्थाकडून" अशा शिरोलेखाखालीं खूब लांबच्या लांब लिहून स्वतःचें पुस्तक मोठें झाल्या-बद्दल भाटचे ऐट मिरवितात. या पलिकडे या पुस्तकांत कांहीं सार नाहीं असें वाचकांच्या दृष्टोत्पत्तीस येईलच.

भ्रमनिरसन भाग १ ला निघाल्यानें भाटचे यांस एक शिक्षण मिळालें आहे असें आह्मीं समजतों. कारण त्या पुस्तकासंबंधानें लिहितांना भाटचे ह्मणतात कीं त्या पुस्तकांत त्यांना शिव्या लिहिल्या आहेत. जर त्यांना शिव्या कशा असतात हें भ्रम निरसन पुस्तकानें कळलें तर आह्मी ह्मणतों, त्यांना सुधारण्यास फार जागा झाली परंतु त्यांनीं आमचा दोष पाहूनही स्वतःचें वर्तन सुधारलें नाहीं. पहा जर भ्रम निरसन पुस्तकांत त्यांना शिव्या वाटल्या तर ते स्वतःच्या पुस्तकासंबंधानें काय समजतात ? ५० पन्नास पानाचें चोपडें होतें, मग पन्नासापेक्षां कमी पानांत मावणारा मजकूर पुनःपुनः लिहून एकशें पंच्यायशीं पानें केलीं ह्मणजे पुस्तक होतें काय ? "लड्ड रेड्यापेक्षां किडकिडीत घोडा बरा " हें भाटचे यांनीं लक्षांत ठेवावें. " परोपकारः

अन्याय पापाय पर पीडनं" हीं व्यासांचीं दोनच वचनें ... साहेब

एउकांपेक्षां विशेष महत्वाचीं आणि सार रुपाचीं होत. यासाठ लेला कामिटी

पृष्ठ संख्येच्या प्रमाणावर, त्याचें महत्व नाहीं. भ्रमनिरसन पुस्तकामुळें खरें, त्याचें थर

कळण्यास साधन झालें हा लोकांस फायदा आणि तें पुस्तक सबंध उ नीं लाविलें.

कांहीं दिवस पत्र चालवून पोट भरण्यास भाटचे ह्यांस साधन झालें, हा वर्षांपासून

यदा झाला आहे. भाटयांनीं जें पुस्तक त्यांना फार तर चार आण्यास वि दिल्या

असतें तें इंदूर संस्थान भाग २, त्याची किंमत १२ बारा आणे ठेविली आणि इचांकडेस

तुंबडी भरली. त्याप्रमाणें भ्रमनिरसन पुस्तक पैसे न देतां सत्य प्रसारार्थ गलें आणि

विलें जात आहे, असें मानण्यास त्याच पुस्तकांत आणि इतर वर्तमानपत्रांत मार्तंडां

असतां लोकांनीं तें घेण्यांत पैसे खर्चू नये असें विधान मांडून स्वतःच्या पत्र राजांनीं

केली आहे. या त्याच्या कृत्यावरून त्याना ठगी डेकॉयटीचा धंदा उत्तम त्या-

येईल असें ठरतें. भाटचे यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं त्याच्या पुस्तकाला लोक...

जर बारा आणे दिले असतील तर तें इंदूर संस्थानचें पुस्तक या नांवामुळेंच

दिले असावेत. मात्र तें पुस्तक वांचून आपले बारा आणे व्यर्थ गेल्यानें शेवटीं

ते बिचारे फसले आहेत. अशा रीतीनें आह्मी फसलों ह्मणून सांगणारे लोक तयार

आहेत. आणि अशा रीतीनें कां होईना भाटचे यांना पुस्तकाचे जे पैसे मिळून नफा

झाला हा शिवाजीमहाराजांचा प्रताप. " अजितनामं वदों भलत्या मिषें, सकल पातकं

भस्म करीतसें." या वाक्याप्रमाणें श्री. शिवाजी महाराजांविषयीं जरी भाटचे यांनीं

खोटे व कुत्सित लेख लिहिले तरी पण त्यामुळें भाटयांच्या कुटुंबाचा निर्वाहच

होत आहे.

समाप्त.